# नीचोच्चजाति-विवाह

## नाटक.

लक्ष्मण गोपाळ देशमुख.

# नीचोच्चजाति-विवाह नाटक.

लेखक व प्रकाशक

लक्ष्मण गोपाळ देशमुख.

पेन्शनर स्टॉ. सी. एस्.

मुद्रक


अच्युत चिंतामण भट.

पुणें "यशवंत" प्रेस.

सन १९११.

किंमत ८ आणे.

( सर्व हक्क लेखकानें राखून ठेविले आहेत. )



# प्रस्तावना.

या नाटकास लिहिण्यास सुरुवात केली तेव्हां नामदार बसु यांचें बिल कौंसिलांत आलें नव्हतें. त्याची व याची मध्यंतरी गांठ पडली हा केवळ दैवयोगच समजावयाचा आहे.

या नाटकांतील मुख्य गोष्ट नीचजातित्वाचें बंड मोडण्यास तोंडी ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी किंवा शाळा आणि स्कालरशिपा पुरे नाहींत, परंतु अन्नव्यवहारात्मक व वैवाहिक नियमांतच फेरफार होणें जरूर आहे. नवीन कोणतीही गोष्ट होऊं लागली म्हणजे आक्षेपक वर्गाची चालच आहे कीं, अत्यंत हलकटपणाची भाषा वापरून न होणारे परिणाम होतील असें दाखवावयाचें. आम्हांस जर एखादा खप्पी भेटेल आणि म्हणेल "काय हो! मग आपली इच्छा काय? दर एकानें एकएका वेश्येच्या मुलीशीं लग्न करावें आणि कुलशीलवान् पोरींना घाव्यात हाकून रस्ते झाडण्याच्या कामास. असें आहे तर?" तर आम्हांस नवल वाटणार नाहीं. दुसऱ्याची पसंत न पडणारी गोष्ट खोडावयाची इच्छा प्रबल झाली म्हणजे असा हलकटपणा आणि खोडसाळपणा करणारे बरेच लेखक व वक्ते असतात. यांची जरी बुद्धि शुद्ध असते, तरी

त्यांत शांतता कमी झाल्यामुळें वादळ उत्पन्न झाल्या- वेळीं जसें दृष्टीला अंधत्व येतें, तसें यांच्याठिकाणीं होतें. माझें विनंतिपूर्वक असल्यामंडळीस इतकेंच सांगणें आहे कीं, भोजनात्मक व वैवाहिक नियमांत फेरफार झाल्यानें एकदम सर्व लोकांच्या वृत्ति पालटत नाहींत. एकदम कोणते अनर्थ होत नाहींत व हलके हलके गोष्टी होऊं लागल्या म्हणजे त्यांतील अनर्थत्व व भीतिच कमी होते. इंग्रजी शिकणें व विलायतेस जाणें हें ६० वर्षापूर्वीं कोठें बरें वाटत होतें? असेच अनर्थ होतील, धर्म बुडेल, अशा लोकांच्या समजुती नव्हत्या का? होत्या. परंतु तसे परिणाम झाले नाहींत. उलटें या दोन्ही गोष्टी चांगल्या, असें आतां बहुतेक लोकमत झालें आहे. नीचजातित्वाचें बंड मोडण्याची किंवा अन्नव्यवहारात्मक व वैवाहिक नियमांत अंतर होण्याची गोष्ट देखील अशीच.

या नाटकांत ह्या फेरफारास सरकारचें अनुमोदन मिळून जातिवंत व जातिहीनाचें लग्न झाल्याचें दाख- विलें आहे. ना. बसु यांचे बिलांत नाहींत, असल्याही पुष्कळ सुधारणेच्या गोष्टींचा या नाटकांत उल्लेख आहे. जरीआमची व नामदारांची गाठ दैवयोगानें वाटेंत पडली तरी त्यांचे लोककल्याणबुद्धीबद्दल अभि- नंदन करणें माझें काम आहे. तसेंच कांहीं दिवसापूर्वीं बईत प्रथम थोड्या व नंतर पुष्कळ लोकांनीं अगर

इतर ठिकाणीं ज्यांनीं नामदारांचे बिऌास आपली सर्वांशीं किंवा अंशतः संमतिदाख विली त्यांचेंही मनःपूर्वक अभिनंदन करितों. जे सर्वांशीं विरुद्ध आहेत ते अभिमानाचे किंवा इतर वादळांत सांपडलेले लोक आहेत. वादळ कमी झालें म्हणजे त्यांसही नीट दिसेल. अथवा " जानन्तितेकिमपि तान्प्रति मास्तुयत्नः"

नाटककर्ता.

# पात्रांची यादी.

## अंक १ ला.

| | |
|---|---|
| शेटजी .... .... | बापूसाहेबांचा स्नेही. |
| बापूसाहेब .... .... | नारायणरावांचा मुलगा. |
| शांताबाई .... | एका सरदाराची क्षेत्रज कन्या. |
| गोविंदराव, धोंडोपंत | मास्तर. |
| जांबुवंतराव .... .... | बापूसाहेबांचा मित्र. |
| केशवराव .... .... .... | एक वकील. |
| गणपतराव .... .... .... .... | गवई. |
| बाबासाहेब .... .... | नारायणरावांचा स्नेही. |
| नारायणराव .... .... | बापूसाहेबांचे वडील. |

## अंक २ रा.

| | |
|---|---|
| धनाजीराव .... .... .... .... .... | |
| ग्यानु .... ... | धनाजीरावाचा नोकर. |
| दत्तोपंत .... .... | ,, कारकून. |
| सरस्वतीबाई .... .... | बापूसाहेबांचें कुटुंब. |
| गीताबाई .... .... .... | एक मास्तरीण. |
| विठूजी .... .... | धनाजीरावाचा नोकर. |
| विश्वासराव .... .... .... | दुसरे वकील. |

अंक ३ रा.

जज्जसाहेब .... .... .... .... ....
पहारेकरी .... .... जज्जसाहेबांचा नोकर.
शंभुराव .... .... .... तिसरे वकील.
संस्थानिक .... .... .... .... ....
सदाशिव शास्त्री, पं. भागचंद भेटीस आलेले गृहस्थ.

अंक ४ था.

यशवंतराव नायक (धनाजीरावाचा मुलगा.
शंकर .... .... .... यशवंतरावाचा मित्र.
अक्का } यशवंतरावाच्या बहिणी.
यमुताई }
यशोदाबाई .... .... धनाजीरावांचें कुटुंब.

अंक ५ वा.

सरकारी अधिकारी, पुराणीक वगैरे मंडळी, वामन-बोवा, अहमदखा, खंडोबा, मदनिका (नायिका.)

# नीचोच्चजातीविवाह नाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थळ**—बापूसाहेबांचें रहातें घर.

[ सीन—शेटजी आणि बापूसाहेब एके ठिकाणीं दिवाण-खान्यांत बसले आहेत. असा. ]

शेटजीः—गांवांत बरेच लोक बोलूं लागले आहेत कीं, ज्या गृहस्थास पूर्वीं वारांगनेचें वारें देखील खपत नसे, त्याच गृहस्थास तिचा समागम दुर्निवार झाला आहे; तेव्हां हा काय वयाचा, कीं कामदेवाचा, का- ऐश्वर्याचा, कशाचा महिमा समजावयाचा ? मला तर त्यांचे म्हणण्याचा पुर्ता अर्थच लागला नाहीं. परंतु तें कोडें स्वतःच सोडवित बसण्यापेक्षां म्हटलें आपणा-जवळ येऊन समक्षच खुलासा काढावा. आपल्याला या दुरपवादाची कांहीं खबर लागली आहे किंवा नाहीं ? आणि ह्यांतील सत्य काय व आपण त्याचा प्रतिकार कसा करण्याचें योजिलें आहे ?

बापूसाहेबः—आपण समक्ष आलांत हें उत्तम केलेंत. लोकांच्या बोलण्यांत कांहीं सत्य हें असतेंच

आणि कोणाच्याही झालें तरी, प्रामाणिकपणाच्या बोलण्यांत किंवा समजुतींतही कांहीं सत्य असतेंच. परंतु त्याच्याच बरोबर अज्ञानानें किंवा द्वेषबुद्धीनें त्यांत असत्याचेंही पुष्कळ मिश्रण झालेलें असतें; तेवढें खेरीज करून जो बोलणाराला किंवा ऐकणाराला विचार करावा लागतो, तसा करण्याची त्यांना संवय नसते. म्हणून प्रथम गैरसमजुतीनें आणि मागाहून हट्टानें विरोध उत्पन्न होतात आणि ते वाढतात. वारांगनांचे धर्म आणि त्यांशीं वागणारांचे धर्म हे तरी सर्वांना कोठें ठाऊक आहेत? वारांगना झाल्या तरी त्यांस पातिव्रत्य धर्म नाहीं असें नाहीं, व त्यांशीं संबंध ठेवणारांस पतिधर्म पाळावे लागत नाहींत असेंही नाहीं. फरक इतकाच कीं, पतिपत्नींना आमरणांत अव्यभिचारानें रहावें लागतें, तसें वारांगनांना व तद्वल्लभांना रहावें लागत नाहीं.

वारांगना म्हणजे जशा अविवाहित राहून विषयसुख अनुभविणाऱ्या स्त्रिया, तसे अविवाहित राहणारे पुरुषही कांहीं थोडे नाहींत. परंतु असल्या स्त्रिया जशा कांहीं लोकांस अवमान्य झाल्या आहेत, तसे असले पुरुष त्यांस अवमान्य झालेले दिसत नाहींत. इतकें तर खचित आहे कीं, अविवाहित राहून कांहीं व्यवसाय जसे स्त्रियांस करतां येतील तसे विवाहित होऊन करतां येणार नाहींत. तेव्हां असले व्यवसाय करण्या-

साठीं अविवाहित राहण्याची मोकळिक सर्वच स्त्रियांची काढून घेणें योग्य दिसत नाहीं.

शेटजीः—विवाहित पुरुषांचा अविवाहित स्त्रियांशीं संबंध घडला म्हणजे पत्नीच्या सुखाचें मातेरें झाल्या-शिवाय रहात नाहीं, असाबहुतेक अनुभव आहे. तेव्हां असले संबंध लोकांना मान्य कसे व्हावेत ?

बापूसाहेबः—जेव्हां मातेरें होत नाहीं, तेव्हां तरी मान्य होतात कां ?

शेटजीः—कांहीं अंशानें होतात. परंतु मातेरें होण्याचा संभव नेहेमीं दिसत असल्यामुळें असल्या प्रकारांस मुळीच बंद करण्याची लोकप्रवृत्ति आहे. आपल्याला जरी आपल्या संबंधानें असा संभव दिसत नसला तरी लोक समजुतीस मान देऊन आपण असल्या अपवा-दास पात्र होऊं नये असें मला वाटतें.

बापूसाहेबः—बायकांस गर्भवती दशेंत व प्रसूती-नंतर कामशास्त्राच्या नियमांनीं ब्रह्मचर्य आवश्य आहे. तसा स्वभावतः पुरुषांस प्रसंग नसल्यानें त्यांस तशी अवश्यकता नाहीं. ह्यामुळें दोनी पक्षीं सारखे नियम असणें एका पक्षास जड नाहीं का ? अशा वेळीं पुरु-षांस कांहीं मोकळीक नसेल तर शास्त्राच्या नियमांचे उल्लंघन होऊन उलट स्त्रियांचें आरोग्य बिघडण्याचा संभव नाहीं का ?

शेटजीः—आपण म्हणतां ह्या गोष्टी खोटया नाहींत. परंतु लोकरीतीपुढें कांहीं इलाज नाहीं. शिवाय, मोकळीकेच्याच अडचणी ब्रह्मचर्यापेक्षां अधिक ठरतील. आपण असें समजा कीं, आपल्यापासून वारांगनेस अपत्यप्राप्ती झाली, म्हणजे एका घराचीं दोन घरें झालीं. त्या दोनीही घरांचे संसार नीट चालणें अवश्य झालें. स्त्रीत्व, पुत्रत्व ह्याचें मान वाढलें गेलें. प्राप्तीची वाटणी झाली. तेव्हां इतक्या अडचणी सोसण्यापेक्षां ब्रह्मचर्याचीच अडचण सोसणें हें जास्त हितावह नाहीं का? कधीं कधीं तर वारांगनेच्या ठिकाणीं जडलेल्या अतिदाट प्रेमानें पुरुषांनीं आपल्या विवाहित बायकांशीं फारकती—होत नसूनही—केल्या आहेत. तेव्हां इतक्या अडचणी ज्या मार्गांत निघण्याची भीति आहे, त्या मार्गाला लोक गौण समजतात, ह्यांत त्यांची चूक कोठें आहे?

बापूसाहेबः—वारांगनांचे पोषणमार्ग जर बंद झाले, तर त्यांस विवाहमार्ग तरी मोकळे असले पाहिजेत. तसें नसणें ही हीन जातीचे लोक उच्चस्थितीवर आणण्याचे प्रयत्न करणारांची चूक नव्हे कां?

शेटजीः—होय. पण त्यांस सांगावें कोणी? आणि ते कबूल करतात कशाला? यामुळेंच हीन स्थितीचे लोक अधिकाधिक हीन स्थितीप्रत पोंचतात. कांहीं शहाणे लोक असें आहेत कीं, साधारण सम-

जुतीच्या मनुष्याच्या अंगीं जे दुराग्रह नाहींत, ते त्यांच्या अंगीं असतात. यामुळें ज्या वर्गासंबंधानें त्यांचे दुराग्रह आहेत, त्यांची स्थिति सुधारण्यांत स्वतःची खराबी न होईल अशी समंजसता असेल तरच सुधारण्याचा हेतु खरा. बाकी लोकांची आणि विशेषें करून दुराग्रही लोकांची समजूत कधीं पटावयाची नाहीं.

**बापूसाहेबः**—आतां तुमची आमची समजूत एक झाली. पहा! या दुराग्रही लोकांची स्थिति अशी आहे. ते वारांगनांस दुराचाराचें मूळ असें समजतात. खरी स्थिति त्या दुराचाराच्या बळी झाल्या आहेत. त्यांना सदाचाराचा रस्ता दाखवावयाचें सोडून:—

## पद.

[ राग हमीर–ताल त्रिवट. ]

गणिती दोष वारांगनाचे। न करिती एकहि उपाय
कोणी त्यांची स्थिति सुधारण्याचे ॥ धृ० ॥
दर्शन यांचें निंद्य समजती गायन अश्रवणीय तसें।
नृत्यकलाराक्षसी मारण्या सज्ज चमू करिती हे।
दान जरि दिलें सत्कार्यासी अग्राह्यची ह्यांना दिसते।
नीचजातिवध ह्यास म्हणावें किंवा सुधारणा ही।
लोक हे उलट विचाराचे। गणिती दोष वारांगनांचें
॥ धृ० ॥

**शेटजीः**—बरें आहे, आतां माझ्या लक्षांत थोडी गोष्ट आली. परंतु वहिनीसाहेब येतील, तेव्हां ह्या नवीन हकीगतीबद्दल त्यांची खात्री कशी होणार?

बापूसाहेबः—अहो! जशी तुमची झाली तशीच. माझ्या मनांत माझ्या प्रियेबद्दल जर कधींच भिन्नभाव आला नाहीं, तर तिच्या तरी मनांत तो कोठून येणार? त्यांतून तिला जर कांहीं दोष दिसलाच, तर तिच्याचपासून मी क्षमा मागणार. मग आमचें बिघडणार कोठें?

शेटजीः—ठीक आहे. तो प्रकार कसा काय घडतो, तें थोड्या दिवसांत दिसेलच. आपण नवीन आणलेल्या बाईची व आमची भेट तर करवा, म्हणजे त्यांच्या समजुती काय आहेत, हें तरी मला कळेल.

बापूसाहेबः—बरें आहे. मींच त्यांना बोलावतों.

[ उठून जाऊन शांताबाईसह येतात. शेटजी उठून उभे राहतात. सर्व बसतात. ]

शेटजीः—माझी आपली ओळख नाहीं. परंतु बापुसाहेबांच्यासंबंधानें झाली आहे. तेव्हां आपण आह्मांवर यजमानाप्रमाणेंच लोभ करावा.

शांताबाईः—मी जातीची अबला, परंतु जातिहीन. वर्ण मात्र गोरा खरा, पण वर्णहीन. चरित्र सतीचें, परंतु कुल असतीचें. माझ्यावर ज्यांची कृपा, त्यांच्यावर जगाची अवकृपा. त्यांत दुराग्रही लोकांची विशेष. अशा या पामर जनाबद्दल आपण दर्शनौत्सुक्य दाखविलें यावरून आपल्या अंगीं उदारपणा मोठा आहे असें दिसतें. अथवा महाराजांच्या स्नेह्यांच्या अंगीं तो असल्यास नवल तरी काय!

श्लोक.

मानसीं तरी हंस राहती ।
जान्हवीतटीं पुण्यवनतती ॥
हिमगिरीवरी देवतालयें ।
असति जरि तरी नवल कासये ! ॥

शेटजीः—वः ! आपला स्वर आणि स्वभाव हे तर एकमेकांची चांगलेपणाविषयीं स्पर्धाच करतात असें दिसतें. बरें, वहिनीसाहेब थोड्या दिवसांत येणार हें तर आपल्याला ठाऊक आहेच. त्यांचा स्वभाव जरी मानी आहे, तरी यजमान साहेबांच्या मर्जीबाहेर नाहीं. ह्यासाठीं त्यांच्याकडून आपलें मन दुखविलें जाणार नाहीं. परंतु लोकापवाद टाळण्याकारितां आपण येथें फार दिवस राहणें मला प्रशस्त दिसत नाहीं.

शांताबाईः—मला आपलें म्हणणें कबूल आहे. महाराजांच्या इच्छेनेंच मी येथपर्यंत आले. त्यांचें त्यांच्या पत्नीवरील अलोट प्रेम पाहून मला सहज त्यांच्या पत्नीच्या दर्शनाचा लाभ होईल हीच माझी इच्छा आहे. ती पूर्ण झाली म्हणजे मी महाराजांचीच आज्ञा घेऊन जाईन. मग लोकापवाद कशाबद्दल राहणार ? मी जशी महाराजांची दासी आहे, तशीच त्यांच्या पत्नीची आहे, असें समजतें.

शेटजीः—वः ! आपल्या शहणपणाची तर कमाल आहे. जेथें इतकी लीनता वास करते, तेथें प्रत्यक्ष

कलि येऊन तरी करणार काय? बरें आहे बापूसाहेब! आतां मला रजा द्यावी. पुनः मी भेटेनच. ( उभयतांस नमस्कार करून निघून जातो. )

बापूसाहेबः—आपण जरा विश्रांति घ्यावी. मीहीं आपलें कामकाज पहातों.

शांताबाईः—जशी आज्ञा.

( दोघे निघून जातात. )

---

## प्रवेश २ रा.

स्थळः—मित्र मंडळीचा क्लब अथवा विहाराची जागा.

[ सीनः—कांहीं मंडळी खेळत-बोलत बसली आहेत असा. ]

शाळामास्तर } गोविंदराव } अहो! ह्या बापूसाहेबांना तर समाजाची किंवा कुलाची किंवा धर्माची कशाची लाजच नाहीं. वेश्या काय घरांत आणली आहे? आणि तिच्या सुखासमाधानांत अंतर पडूं नये म्हणून काय यत्न करित असतो? बायको किती सद्गुणी! तिला ही गोष्ट कशी खपावी? वडिलांचा लौकिक काय? त्यांस कळलें म्हणजे तो म्हातारा काय म्हणेल? [ जांबुवंतरावाकडे पाहून ] तुम्ही त्यांचे जर मित्र आहां, तर त्यांस कळवा कीं, असले चाळे त्यांच्या मागील सुनीतिमत्तेला हरताळ लावतात. ह्यासाठीं थोडक्यांतच समजुतीवर या, नाहींतर जसें आजपर्यंत लक्षावधि लोक या छंदांत दुर्दशेला लागले, तसें तुम्हीही लागाल.

दुसरे मास्तर—धोंडोपंत—तसें काहीं नाहीं. मला त्यांची बरीच माहिती आहे. त्यांना छंद म्हणाल तर कसलाच नाहीं. परंतु ते आहेत मनाचे भोळे; पैशाचे खर्चिक; आणि स्वभावाचे उपकारी. तेव्हां त्यांच्या मनाला एखादें मनुष्य आवडलें म्हणजे त्याजविषयीं त्यांस आदरभाव वाटून लोकरीतीला सोडून कांहीं वर्तन होतें. मी त्यांस भेटून सर्व हकीगत एकवेळ कळविलीच आहे. पुनःही कळवीन. ( जांबुवंतरावाकडे पाहून ) तुम्ही जर मज बरोबर येत असाल, तर आपण बरोबरच जाऊं.

जांबुवंतरावः—त्यांतल्यात्यांत कांहीं भोजनपानाचा योग जुळला तर चांगलें. नाहीं तर फुकट हेलपाटा पडावयाचा.

गोविंदरावः—वः! तुम्हाला तर मित्राबद्दल फारच काळजी आहे बुवा ! आम्ही बोलतों आहों त्यांच्या नवीन छंदाबद्दल, आणि तुम्ही काढता गोष्टी खाण्याच्या ! तेव्हां तुमचें लक्ष्य आहे तरी कोठें ? अहो ! या तुमच्या मित्र बापूसाहेबांनीं सुधारणेचा कळस केलेला नाहीं कां तुम्हाला ठाउक ? सदाचरण राहूंद्या एकीकडे, परंतु जाति-धर्माविरुद्ध लोकांच्या डोळ्यांदेखत अशी वर्तणूक म्हणजे ही लोकांत खपावी कशी ? आजपर्यंत सुधारक ऐकण्यांत किंवा पाहण्यांत येत होते, ते फक्त तोंडानें बोलणारे. मूर्तिपूजा न करण्यास, पुनर्विवाह

व परदेशप्रवास करण्यास, जातिभेद मोडण्यास यांचे नेहेमीं अनुकूल अभिप्राय पडावयाचे. परंतु स्वतः कोणाचें मन दुखविण्यासाठीं म्हणा किंवा आपल्यावर सामाजिक अडचणी न याव्यात म्हणून म्हणा, हे सभेच्या बाहेर आले कीं जसे मोठे कर्मठ लोक, तसें ह्यांचें वर्तन.

दुराचारी लोकांची हीच तऱ्हा. दुराचार केला कीं नाहीं ह्याची ओळख तिसऱ्याला नाहीं. अशा प्रकारानें लोकांची बाह्यात्कारी समजूत सांभाळली म्हणजे समाजांत बोभाट न होता, स्वतः मनास वाटेल तसें बोलण्यास किंवा वागण्यास सांपडतें. परंतु बापूसाहेबांचें तें कांहींच नाहीं. त्यांचा आपला सगळा प्रामाणिकपणा ! असा कोठें जगांत चालतो का ?

**जांबुवंतराव:**—अहो ! कां नाहीं चालत ? आम्ही तर जेवणांत जास्त पाहिजे असेल तें प्रामाणिकपणानें सांगतों. लोकांनीं आग्रह करण्याची देखील वाट पहात नाहीं. प्रामाणिक मनुष्याला लोकांची भीडभाड कशाला पाहिजे ? 'मनः पूतंसमाचरेत्' हें शास्त्र.

**केशवराव वकील:**—मला तर वाटतें कीं, आम्ही प्रामाणिकपणा नसल्यानेंच इतकें मागे पडत आहों. शिवाय, जुन्या गोष्टीबद्दल घातुक अभिमानही आम्हांस नको आहे. ज्या बायकोबद्दल आपण कांहीं दोष बापूसाहेबांस ठेवतां, त्यांची व माझी थोडी ओळख आहे.

आणि ती बायको कांहीं अशीं नांवें ठेवण्यासारखी नाहीं. कुलाला कोण काय करतो ? परंतु आचाराचा विचार केला तर ती बायको कांहीं घर बुडविणारी अशी नाहीं. मला ही गोष्ट कबूल आहे कीं, एका स्त्रीवर जोंपर्यंत दुसरी स्त्री त्याच मानाची अधिकारी नसेल तोंपर्यंत चांगलें. परंतु सर्वच अविवाहित राहणाऱ्या स्त्रिया, मग त्या कला जाणत असोत किंवा नसोत, इतर काम-धंदा करित असोत वा नसोत, सर्वच सारख्या; असें मी कधीं समजणार नाहीं. आणि गुणपरत्वें एखाद्या स्त्रीचा समागम एखाद्यानें केला तर त्यालाही नेहेमींच्या परंतु पडद्या आडच्या दुराचरणी लोकांच्या बरोबरीचाही मी समजणार नाहीं. कुलानें एखाद्याला दुःस्थिति प्राप्त झाली, म्हणजे त्यास कधींच उच्च स्थितीला येण्यास मार्ग नसावा किंवा तो मार्ग कोणी आणीत असेल तर त्यास लोकांनीं नांवें ठेवावीं, हें योग्य होणार नाहीं. विवाहित पुरुषांचा आश्रय मात्र त्यांनीं करूं नये. अविवाहित किंवा विधुर पुरुषाच्या आश्रयानें राहिल्यास समाजाचें त्यांत हितच आहे. आतां त्यांच्या जातीविषयीं प्रश्न उत्पन्न होतो. आणि तो सोडविण्याचें काम या देशांत जसें अवश्य आहे तसे इतर देशांत, म्हणजे जेथें जाती नाहींत तेथें नाहीं. परंतु आमच्या येथें हीन जातीचाच भेद विवाहापर्यंत मोडण्याचा कोणी यत्न करीत नाहीं, तर तो वारांगनेच्या उद्धारापर्यंत कसा जाणार? मला

वाटतें आमच्या देशांत संयुक्त हिंदुजाति म्हणून निघाली पाहिजे. आणि त्यांचें धर्म, आचार ठरविण्याचें काम एखाद्या निवडलेल्या आचार्यानें किंवा सभेनें केलें पाहिजे. आणि ज्या लोकांचें मत जातिभेद मोडून टाकण्याविषयीं आहे, त्यांनीं ह्या जातींत दाखल होण्यासाठीं आपलें नांव दिलें पाहिजे. जसें राष्ट्रीय कामांत कमेटी किंवा अध्यक्ष निवडून नेमला जातो, व इतर कामांतही नेमला जातो; तसा धर्मसंबंधी प्रश्न सोडवावयास पाहिजे. असें झाल्यानें हल्लीं येत असणाऱ्या सर्व धर्मसंबंधी अडचणी मोडतील, आणि नुसत्या सभेंत सुधारणा प्रतिपादून आपल्या गृहस्थितींत व व्यवहारांत अंतर न पडूं देण्याची ही वहिवाटही बंद होईल. मीच बापूसाहेब व शांताबाई ह्या दोघांसही सांगणार आहे कीं शांताबाईची पतिधर्मानें राहण्याची इच्छा आहे, ही चांगली आहे आणि बापूसाहेब त्यांस कांहीं आश्रय देत असतील तर तोही योग्य आहे. परंतु हा संबंध शांताबाईनीं अविवाहित किंवा विधुर मनुष्याशीं करावा म्हणजे लोकापवाद न राहतां कार्य होईल.

गोविंदरावः—अहो! अशा गोष्टी होतील, जातील, त्याला पाहिजेत ५०० वर्षें! शिवाय राष्ट्रीय गोष्टींची आणि धर्मसंबंधी गोष्टींची एक स्थिति नाहीं. तेव्हां तुम्हाला आचार्य मिळावा कसा? आणि संयुक्तजाति

व्हावी कशी? हें कांहीं मला तर समजत नाहीं. असेंच कल्पनासृष्टींत वाहवणारे लोक मनोराज्यें करतात आणि इसापाच्या गोष्टींतील शेखमहंमदाप्रमाणें तरंगरूप भांड्यांचा हारा फुटला म्हणजे मग शुद्धीवर येतात!

**केशवराव**—अहो! कल्पनासृष्टि कशाची? आलीकडे पुष्कळ लोकांनीं अशी संयुक्त हिंदुजाति किंवा वर्ग काढला आहे. आणि त्यांत त्यांचीं नांवें आहेत व कमेटींत आचार्यांचीही योजना झाली आहे. आतां जातिभेद मोडून टाकणाऱ्या गप्पा राहिल्या नाहींत समजलात? आणि नीच जाती वर आणण्याच्याही नुसत्या सभा राहिल्या नाहींत, तर प्रत्यक्ष गोष्टी होऊं लागल्या आहेत. त्याला अझूनपावेतों रूप आलें नाहीं, म्हणून त्याचा व्हावा तसा विस्तार अद्याप झाला नाहीं, तो लवकरच होईल. मग हिंदु धर्माच्या संयुक्तजातीची संख्या पहा कशी झपाट्यानें वाढेल. ज्यांना विभक्त जातींतच राहणें असेल त्यांनीं खुशाल रहावें. त्यांची संख्या कमी कमी होऊन हल्लीं हिंदूचें ऐक्यरूप जें नाहींसें झालें आहे तें पहा कसें पुनः त्यांस येतें तें!

**गवई गणपतराव**—आज तर आपल्या या बोलण्यांत आमचें गाणेंही राहिलें आणि मंडळीचे खेळही पण राहिले. परंतु ही नवी कल्पना मात्र ऐकण्यासारखी

आहे, ह्यांत संशय नाहीं. मी तर बोवा आपलें नांव संयुक्तसमाजांत देण्यास तयार आहे. अहो, आम्हांला तर नेहमीं गाणार मंडळी बरीच भिन्न जातीची भेटते व एखाद्या अन्य जातीय स्त्रीशीं जरी विवाह करावा असें मनांत आलें तरी मार्ग नाहीं. मग चोरीचा धंदा. वागणुकींत एकजात, आणि अंतरंगांत दुसरी. या सर्व चोरट्या चाली बंद होऊन राजरोस विवाहित युग्माप्रमाणें राहणें घडेल तर दोन्ही पक्षीं कितीतरी संभावितपणा वाढेल. गाणाऱ्या स्त्रिया म्हणजे सर्वच वेश्या, हा समज देखील मोडेल. बरें पण मर्जी असेल तर एखादी चीज ह्मणतों, मग आपला वेळही संपत आला आहे.

**केशवराव**—हें एक पद्य जातिभेद मोडण्याविषयीं रचलेलें आहे. हेंच म्हणा म्हणजे झालें. (खिशांतून काढून दाखवितो.)

**गवईबोवा**—कसें काय जुळलें आहे पाहूं. राग, ताल समजला, म्हणजे आह्माला काय? बाकी तयारी आहेच. (केशवरावजींनीं दिलेला कागद मनन करून) जुळणी तर बरी आहे. [ तंबूरा तबला जुळवून ] अं ! अं ! अं ! [ म्हणूं लागतो. ]

### पद.

**जातिभेद सोडा। जनहो शीघ्र सौख्य जोडा ॥ध्रु०॥**
**प्लेगाहुनिही अधिक भयंकर हा खुप तुह्मी समजा।**
**टाकुन द्याया नका उपेक्षा करूं करा मग मजा ॥ १ ॥**

याच्या पायीं अनेक दुःखें समाजांत शिरली ।
हिंदूंची संख्या प्रतिदिवशीं कमी होत चालली ॥ २ ॥
वैदिकधर्मा कंटाळुनि किति बुद्ध जैन जाहले ।
लिंगाइत किति शीख आर्य प्रार्थना समाजवाले ॥ ३ ॥
अस्पृश्यांचा समाज मोठा हिंदुत्वासोडी ।
रमाबाइपंडितेसारखी ख्रिस्तधर्म जोडी ॥ ४ ॥
याकारितां हिंदूंची सत्वर करा जाति संयुक्त ।
सह्या देउनि करा प्रसिद्धी कळुंद्या सर्वां मत ॥ ५ ॥
नुसतें बोलुनि होत नसतें कार्य कुणाचें कधीं ।
तुम्हां न सूचे मार्ग दूसरा असे कसे मंदधी ॥ ६ ॥
निवडुनि नेमा आचार्यातें चाला त्यांचे मतें ।
पाहूं या मग कसें चालतें हेंच बरें दिसतें ॥ ७ ॥
याहुनि दुसरी असेल शुभतरि युक्ति तुह्मी काढा ॥८॥
जनहो शीघ्र सौख्य जोडा ॥

**गोविंदराव**—अहो, याप्रमाणें सह्या देण्याला पुढें यावें कोणी ? आणि खटपट करावी कोणी ?

**केशवराव**—सभेमध्यें कळकळ दाखवून बोलतात त्यांनीं.

**धोंडोपंत**—बरें आहे. आह्मीं तर आतां जांबुवंतरावाबरोबर बापूसाहेबांकडे जातो.

**जांबुवंतराव**—आपल्याला गाण्यांतलें कांहीं कळत नाहीं. परंतु श्लोक, आर्या, जशा जेवणांत म्हणतात. तशा चालीचे सूर कांहीं यांत आले नाहींत.

**धोंडोपंत**—अहो ! त्या ताल-रागांतील चिजा केवळ श्लोक आर्येसारख्या कशा वाटतील ? तुह्मी जरा गवईबोवांजवळ शिका म्हणजे समजूं लागेल.

**जांबुवंतराव**—थोडथोडा अभ्यास केला पाहिजे खरा. काहो गवईबोवा! आह्माला तुमच्यासारखे गातां येईल काहो?

**गवईबोवा**—–वः! आमच्यापेक्षां जास्ती! आमची काय कथा?

**जांबुवंतरावः**—बरें आहे. इतकें जर तें सोपें असेल तर आह्मी इतके दिवस सुरवात केली नाहीं ही आमची चूकच म्हणावयाची. अहो, बाकी विद्या जर आह्माला लवकर आल्या, तर हीच कां न यावी?

**गवईबोवाः**—हो; मग तशीच हीही यावयाची. [ सर्व हासतात. ]

**धोंडोपंतः**—[ जांबुवंतरावाकडे पाहून ] तुम्ही निघाला होता, मग हें काय मध्येंच काढलेंत. चला, उठा.

**जांबुवंतरावः**—बरें बोवा, चला.

[जांबुवंतराव व धोंडोपंत निघून जातात.]

**केशवराव वगैरे मंडळीः**—आपणही आतां जावें. वेळ बराच झाला आहे.

[ असें म्हणून सर्वजण जातात. ]

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—नारायणराव ( बापूसाहेब यांचे वडील ) ह्यांचा दिवाणखाना.

[ **सीन**—त्यांचेजवळ त्यांचे मित्र बाबासाहेब बोलत बसले आहेत, असा. ]

**बाबासाहेबः**—आपल्या चिरंजिवास आजपर्यंत कोणीच कशाबद्दल नांवें ठेवलीं नसून हल्लीं कांहीं त्यांचीं स्थिति बदलली आहे. याबद्दल मी कांहीं लोकवार्ता सांगत नाहीं, तर प्रत्यक्ष मलाच त्यांचें पत्र एका गोष्टीबद्दल आलें, त्यावरून मी आपणांस सांगत आहे. तेव्हां आपण त्यांस कांहीं लिहिल्याशिवाय त्यांची स्थिती सुधरेल असें मला वाटत नाहीं. [ जवळ जाऊन कानांत कांहीं मजकूर सांगतात.] ही गोष्ट कोणाजवळ आपण सांगण्याची गरज नाहीं. कारण, आपला लौकिक आणि आमचा लौकिक कांहीं दोन नाहींत. म्हणून स्पष्ट आपणाजवळ सांगतों.

**नारायणरावः**—वाः ! मुलगा शहाणा असून अशी कशी त्याला आपल्या कुलशीलाची विस्मृति झाली? किंवा त्यांत तरी काय नवल? ज्याजवर प्रसंग येतो, त्याचे विचार असेच या मोहिनीमंत्रापुढें गळून जातात. व्यास, वशिष्ठ, विश्वामित्रादिक ऋषी, दुष्यंत, श्रीकृष्ण विक्रमादिक राजे, पेशवाईतील वीरशिरोमणी पहिले बाजी यांची जेथें शक्ति हीन झाली, तेथें अल्प स्वल्प

मनुष्याची कथा काय? कोणी म्हणतात मागील जन्माचे संस्कार; कोणी म्हणतात इह जन्माचेच संबंध; परमेश्वराच्या सृष्टिलावण्याच्या अनेक चमत्कारांचा अंत कोणालाच लागला नाहीं. कोणाला रूपवती स्त्रिया विवाहित असून त्या टाकून देण्याइतकें उत्कट वैराग्य उत्पन्न होतें, तर कोणाला आपल्या रूपवती स्त्रिया पुरेशा न होऊन इतर ठिकाणीं तितकेंच प्रेम उत्पन्न होतें. एखाद्याला मुळींच प्रेम उत्पन्न होत नाहीं. अशा नानाविध कामवासनेच्या प्रती ज्या जगांत दिसतात, त्यांत अमका सदाचार आणि अमका दुराचार असें ठरविणें किती गहन आहे? प्रेमाच्या झऱ्याला बंधन घालणें म्हणजे विजेला किंवा पर्जन्याला बंधन घालण्यासारखें आहे. सर्व रसामध्यें पहिली जागा शृंगाराला! षड्रिपूंच्या गणनेंत पहिली जागा काम रिपूला! सर्व संसारांत महत्त्वाचा संस्कार विवाह! असें असून त्याचें नियमनच इष्ट. पहा! स्त्रियांच्या सर्व सद्गुणांत पातिव्रत्य गुणश्रेष्ठ. सर्व विद्येचा उत्कर्ष ब्रह्मचर्यावर! ह्यासाठीं कामाला घालवेल तितकें नियमन घालणें हेंच पुरुषाचें मुख्य भूषण. मी मुलास पत्र लिहित आहे कीं, त्यानें कांहीं गोष्टी केल्या असल्या तरी ज्यांत आपला लौकिक रहात नाहीं, अशा कायम ठेवूं नयेत. आपण कांहीं मोठे धनशेट नाहीं किंवा राजे नाहीं. आपल्यासारख्या स्थितीच्या लोकांस ह्या गोष्टी शोभत नाहींत. शिवाय,

माझे जे व्यापारांतील मुख्य भागीदार त्यांसही या गोष्टी आवडत नाहींत. तेव्हां त्यांस समजलें म्हणजे मुलाचा उद्योग देखील ते काढून टाकतील.

बाबासाहेबः—आपल्यासारख्या सुज्ञ मनुष्यास आम्हीं काय जास्त सांगावयाचें आहे?

नारायणरावः—पण मला एका गोष्टीबद्दल खात्री व्हावयास पाहिजे आहे. ती झाली म्हणजे किती जरी मुलाच्या आचरणाबद्दल बोभाट ऐकूं आला तरी तो बंद होईल. व मग मला विशेष काळजी वाटणार नाहीं.

बाबासाहेबः—अशी गोष्ट कोणती?

नारायणरावः—अहो! मुलाचें वर्तन त्याच्या बायकोशीं जोंपर्यंत प्रेमाचें आहे, तोंपर्यंत हे बोभाट विशेष लक्ष्यांत घेण्यासारखे नसतात. परंतु त्यांत अंतर पडलें म्हणजे संसार, उद्योग, मैत्री, सर्व बिघडली म्हणून समजावें.

बाबाहेबः—आपलें म्हणणें अगदीं यथार्थ आहे. परंतु मला वाटतें कीं, अशी नवी प्रेमग्रंथी झाली म्हणजे मागील प्रेमांत कांहीं अंतर यावयाचेंच. आपण चवकशी करावी. मला कांहीं आपल्या मुलाबद्दल या संबंधानें माहिती नाहीं. परंतु सार्वजनीक सिद्धांत वाटला तो सांगितला.

**नारायणराव**—आपला सिद्धांत कांहीं चुकीचा नाही. परंतु स्वतःच्या स्त्रीशीं निष्ठुरपणा करण्यापर्यंत, सर्वांचीच मजल येते असें नाहीं. तितकी ज्यांची मजल आली त्यांच्या दुराचाराचा धिःकार करवेल तितका थोडाच! आणि ज्यांची स्त्री संतुष्ट आहे, त्यांचें वर्तन दुराचाराच्या व्याख्येंत येणेंच कठीण. पहा! श्रीकृष्णाबद्दल ज्या अनेक समजुती आहेत, त्यांत त्यानें गोपींवर बळजोरी केल्याचीं उद्वेगजनक वर्णनेंही आहेत. आणि केवळ भक्तिवात्सल्यासाठीं त्यांस दर्शन दिल्याचेंही सांगण्याचा पाठ आहे. कोणतीही गोष्ट खरी असली तरी, त्याचे विवाहित स्त्रियांशीं कांहीं बिघडलें नाहीं. हा मुद्दा लक्षांत आणला म्हणजे कृष्णचरित्र दुराचारांत कसें दाखल होत नाहीं, ह्याचा थोडासा अर्थ लागतो. या दृष्टीनें मला या गोष्टीचा विचार करणें आहे. बापूची बायको त्याच्याजवळ बरेच दिवस नव्हती. तेव्हां हा नवीन संबंध सुरू झाला, म्हणून समजतें. आतां बायकोशीं त्याचें वर्तन कसें राहतें हें पाहिलें म्हणजे नवीन संबंधाचा हेतु लक्षांत येईल. हा हेतु स्वसुख मूलक किंवा परोपकारमूलक जसा असेल तसें त्या आचरणाचें रूप ठरतें. यासाठीं मी कांहीं दिवसांनीं आपणांस याबद्दल जास्त कळवूं शकेन. मला तर वाटतें कीं, माझा मुलगा तात्कालिक स्वसुखासाठीं आपल्या किंवा आपल्या कुटुंबाच्या उत्तरफलाकडे दुर्लक्ष्य करील असा मूर्ख नाहीं.

**बाबासाहेबः**—अहो! हा तरुणपणांतला अविचार! याला जरा आपली सूचना गेली कीं, तेथल्यातेथें व्यवस्था बरोबर लागेल. यांत मला देखील संशय वाटत नाहीं.

**नारायणरावः**—त्याची बायको जरी लहान आहे तरी, ती मोठी दक्ष, शहाणी नवऱ्याच्या अत्यंत प्रेमांतली असल्यामुळें नवीन लक्षण फारसें टिकणार नाहीं असें मला वाटतें.

**बाबासाहेबः**—वहिनी साहेबांची काय गोष्ट सांगावी? अशी गृहलक्ष्मी वारंवार दृष्टीस देखील पडावयाची नाहीं. असें असून त्यांच्या सुखांत व्यत्यय येणार असें जेव्हां दिसलें, तेव्हां आपणांस कळवावें, राहूंच नये असा निश्चय केला.

**नारायणरावः**—आपले नेहेमीं उपकार आठवले पाहिजेत. उपकाराचें मूळ मित्रत्व; तें आपल्याठिकाणीं आहे, असें ह्यावरून निश्चित होतें.

### पद.

सर्वसुखाचें साधन मैत्री दिसते मजलागीं ।
अमित्रत्व दुःखाचें कारण; असें विषाच्या जागीं १
प्रेमबंधनें असतीं जितकीं प्रकार मित्रत्वाचे ।
जातीचे किति गुणावरुनि किति उपजत किंवानुभवाचे
मनुजामध्यें असतीं जैसीं तैसीं हीं प्राण्यांत ।
वनस्पतींतहि निर्जिवांतहि प्रेमबद्ध हें जगत ॥२॥

आकर्षण अनिवार असें हें उपकारातें करवी ।
नानापरिच्या सृष्टींतिल सौंदर्यासी दाखवी ॥ ४॥
रूप प्रभुचें आनंदात्मक म्हणती जें हें तें ।
ओळखुनी स्मरुनी या दृढतर वाढविजें हेतें ॥५॥

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळः—**धनाजीराव ह्यांचा वाडा.

[ **सीनः—**धनाजीराव आपल्या दिवाणखान्यांत बसले आहेत, व बाहेर परिचारक बसला आहे. असा. ]

**परिचारक-ग्यानुः—**महाराज ! आपल्याकडे गोविंदराव मास्तर भेटीसाठीं आले आहेत.

**धनाजीरावः—**येऊं दे आंत.

**परिचारकः—**मास्तरसाहेब आंत चलावें.

(गोविंदराव आंत जातात. धनाजीराव उठून रामराम करतात.)

**गोविंदरावः—**रामराम ! कशी काय आहे स्वारीची खबर ? मला पुष्कळ दिवसांत येण्यास झालें नाहीं. परंतु आठवण बहुत वेळां झाली. तेव्हां म्हटलें सुटींचे दिवस आहेत यावें भेटून.

**धनाजीरावः—**आपली फार मेहरबानगी. आम्हांस आमच्या कामकाजांतच सुटी घ्यावी लागते. आपलें बरें आहे मोजकें काम. आटपलें कीं कोणाची परवा नाहीं. तसें आमचें कोठें आहे ?

**गोविंदरावः—**वः ! आपली आणि आमची बरोबरी कशी होणार ? आपण कांहीं कोणाचें चाकर थोडेंच आहांत ! आपण स्वतः मालक. जी घ्याल

ती सुटी, आणि जें कराल तें काम. सेवाधर्म म्हणजे योग्यांच्या धर्मापेक्षांही गहन म्हणतात तो कांहीं खोटा कां?

**धनाजीराव:**—मिळून संसारांत कोणासही झालें तरी आपल्या स्थितीचा वीट आलेला दिसतो. सावकारी कांहीं बरी का आहे? चालेल तितक्या दिवस सरळ, नाहींतर अखेर गरळ खाण्याचीच पाळी येते. आमच्या कनिष्ठ भागिदाराचा मुलगा आपण असतां तेथेंच आहे. त्याचें कामकाज कसें चाललें आहे?

**गोविंदराव:**—आपण विचारण्या पूर्वींच मला ही हकीगत आपणास कळवावयाची होती. कारण, आपला आमचा परिचय पुष्कळ दिवसांचा. परंतु आपणच आधीं प्रश्न केला तेव्हां तसें झालें तरी अर्थ एकच. मी जी गोष्ट सांगणार त्यांत काय अंतर होणार? आपण खरी गोष्ट सांगण्यास कांहीं कोणास भीत नाहीं.

**धनाजीराव:**—कां? आपण इतकी प्रस्तावना करतां तेव्हां बापूसाहेबांचें कामकाज लक्ष्यपूर्वक होत नाहीं कीं काय? तसें असेल तर आपण त्यास तेथून दुसरीकडे पाठवूं. कारण, माझें काम कांहीं एकाच ठिकाणीं नाहीं. परंतु कशामुळें त्यांचें दुर्लक्ष्य होत आहे, हें समजलें तर उपाय योजण्यास बरें.

**गोविंदराव:**—अहो! तरुणास तारुण्य सुखासारखी उन्मत्त करणारी मदिरा आहे कोठें? त्यांत संगीत,

सुस्वभाव, भक्ति ह्या मिळाल्या म्हणजे त्या मदिरेचा पेला बाजूस सारण्याचें धैर्य कोणाचें होणार? असाच मासला आपल्या गुमास्त्यासंबंधानें झाला आहे. मला वाटलें कीं मजल पुढें जाण्याचें पूर्वींच आपणास सावध केलें म्हणजे आपल्या कामकाजालाही बरें. गुमास्त्याचेंही बरें. नाहींतर या छंदाचे परिणाम फार भयंकर होत असतात.

**धनाजीराव**:—अहो! बापूसाहेबाला असा छंद लागेल अशी आमची तर कल्पना नव्हती.

**गोविंदराव**:—आपली कल्पना नव्हती, आणि आमचीही नव्हती. पण त्याचा उपयोग काय? प्रत्यक्षा पुढें कल्पना काय करणार? आपणास वाटेल ती जास्त चौकशी करून नंतर योग्य दिसेल तें करावें.

**धनाजीराव**:—[ स्वतःशीं ] अशा स्त्रीचा आणि विवाहित पुरुषाचा समागम होणें, किती दुःखाची गोष्ट आहे! तोच जर एखाद्या अविवाहित किंवा विधुराचा झाला असता तर, किती आनंदाची गोष्ट झाली असती? कारण, संगीतज्ञान, सुस्वभाव आणि भक्ति हे गुण स्त्रियांच्या ठिकाणीं लहान सहान नाहींत. त्यांत लावण्याची जोड असल्यावर मग काय विचारावें? माझा मुलगा विधुर स्थितींत येऊन ३।४ वर्षें झालीं. त्याला सुद्धां अशी एखादी स्त्री मिळाली तर लग्न करावें असें माझ्या मनांत येतें. परंतु तसें घडेल तेव्हां खरें.

( उघड ) बरें आपण या स्त्रीस पाहिलें आहेच. ती रंगारूपानें कशी काय आहे ?

गोविंदरावः—मी प्रत्यक्ष कोठें तिला पाहिली आहे ? आणि मला इतकी चौकशी तरी कशाला ?

धनाजीरावः—मग आपण आतां 'प्रत्यक्षापुढें कल्पना काय' म्हणून ह्मणाला तें कसें ?

गोविंदरावः—तें तसलें थेट प्रत्यक्ष नव्हे.

धनाजीरावः—मग पर्यायाचें प्रत्यक्ष म्हणजे ऐकीवच म्हणाना.

गोविंदरावः—होय. तसें ह्मटलें तरी चूक होणार नाहीं.

धनाजीरावः—बरें, हिचें कुल वगैरे काय ? हें तरी आपणास माहीत आहे ?

गोविंदरावः—वारांगनेला कुल कशाचें ?

धनाजीरावः—(स्वगत) वाः! ही वारांगना जर उच्च कुलांत दाखल झाली, तर हीन जात्युद्धाराचें प्रत्यक्ष उदाहरण होईल. नाहींतर, सभेचा आणि व्याख्यानाचा सुकाळ आणि इतर बंदोबस्त कडेकोट ! (उघड) बरें आहे. आपण कळविलेल्या हकीगतीचा मी लौकरच विचार करतों. आपण त्याविषयीं निभ्रांत असावें.

गोविंदरावः—बरें आहे, तर मी रजा घेतों. [ उठून जातांना स्वतःशीं ] धनाजीरावाची मर्जी बापूसाहेबां-

वरून फारशी उतरल्यासारखी कांहीं दिसत नाहीं. उलट ते त्या स्त्रीविषयीं अधिक माहिती मिळविण्यासाठीं उत्सुक दिसतात. हा सुधारणेचा काळ कोणाला कसा फिरवील याचा नेम नाहीं. हरी इच्छा. (जातो.) राम राम !

**धनाजीराव**:—(उठून) राम राम. (कांहीं वेळानें) (दाराकडे पाहून) कोण आहे. आपल्या कारकुनाला बोलाव पाहूं.

**परिचारक**:—जी. ( जाऊन कारकुनासह येतो. )

**दत्तोपंत**:—काय महाराजांचा हुकूम ?

**धनाजीराव**:—आपल्या बापूसाहेबांस धारवाडाहून बंगलूरला पाठविण्याचा हुकूम लिहा आणि बंगलूरच्या गुमास्त्याला धारवाडास कामाच्या सोईसाठीं म्हणून नेमा.

**दत्तोपंत**:—होय. जसा हुकूम. लिहून हजर करतों. ( जातो ) राम राम.

**धनाजीराव**:—राम राम. गोविंदरावांनीं आणलेल्या निरोपाची व्यवस्था झाली. त्यांनींच जर प्रथम गोष्ट मला कळविली असती तर विशेष चौकशींत वेळ घालविणें भाग होतें. परंतु ही गोष्ट इतर मनुष्यांकडून देखील पूर्वीं समजलीच होती. मग आणखी विलंब करण्यांत तात्पर्य नव्हतें बापूसाहेबांचे हातून अविचार होणार नाहीं, अशा विषयीं माझी खात्री

आहे. परंतु झालाच तर, त्यांतून त्यास मुक्त करण्यास केलेली योजना पुरी होईल यांत संशय नाहीं.

### पद.

( राग—देश; रेरे—म—प—सा नी—सा—या चालीवर. )

नलगे फार करणें विस्तार-सुमति-समजती ऐकुनि एक वार ॥ नलगे० ॥ धृ. ॥

चुकति जरि तरि सावध होती ।
समजुनि लवकरि सत्पथ धरिती ॥
दुःख सोसण्या तयार होती ।
कष्ट जरि अनिवार ॥ नलगे० ॥ १ ॥

बरें, परंतु जी गोष्ट अझून घडून आली नाहीं, त्याबद्दल फार खात्री बाळगणें देखील बरोबर नाहीं. मी जी बदलीची योजना केली आहे, त्याचा परिणाम पाहून नंतर प्रशंसा करणें हेंच योग्य. तेव्हां हल्लीं आपण आपल्या इतर कामाला जावें.

[ निघून जातो. ]

---

### प्रवेश २ रा.

**स्थळः**—बापू साहेबांची बंगलूर येथील जागा.

[ **सीनः**—एकांतीं विचारांत आहेत असा. ]

**बापूसाहेबः**—मला तर सुखदुःखाचा आणि पापपुण्याचा किंवा लोकांच्या समजुतींचा आणि वास्तविक नीति-अनीतीच्या तत्त्वांचा संबंध जुळवितां येत नाहीं.

अथवा जर मनुष्याची स्थितीच सारखी बदलत चालली आहे, तर नीतिविचार तरी एकाच स्थितींत कसे कायम रहावेत? परंतु, ज्या त्या कालांतले हट्टी लोक नेहेमीं नीतितत्त्वें शाश्वत रूपाचीं असें समजून दुसऱ्याशीं यत्किंचित् उल्लंघनासाठीं देखील भांडतात. एका काळीं अप्सरा नीच कोटींतल्या मानल्या जात नव्हत्या. तर त्यांच्यापासून झालेलीं अपत्यें प्रमद्वरा, शकुंतलादिक राजपत्नीच्या योग्यतेला जात होत्या. जातिजातींत विवाह होत होते. त्यालाही अडथळा नव्हता, एका स्त्रीला अनेक पति, एका पुरुषाला अनेक स्त्रिया ह्यांचींही उदाहरणें आहेत. यांपैकीं चांगला मार्ग कोणता, व वाईट मार्ग कोणता, ह्याचा निर्णय सोपा नसून हट्टी लोक कोणत्या तरी तत्कालीन बलवत्तर समाजाच्या समजुतीलाच प्रमुखत्व देउन बाकीच्या रितींचा धिःकार करतात. धर्माच्या नांवावर जितकें जितके मनुष्यजातींत छल झाले आहेत, तितके कामक्रोधादिक शत्रूंपासूनही झाले नाहींत असें एका विचारी मनुष्याचें मत आहे. त्यांतील रहस्य इतकेंच कीं, धर्माच्या नांवावर हट्टीलोक जीं दुष्कृत्यें करतात, त्यांच्या बरोबरीनें कामक्रोधादिक दोषांपासूनही होत नाहींत. देहस्थ रिपूंची गणना झाली, तेव्हां हट्ट, किंवा दुराग्रह, हा सातवा रिपु कसा टाकला गेला? मला वाटतें, हा रिपु जर कामाच्या खालोखाल

ठेवला तर कांहीं चूक होणार नाहीं. कोणाचा वारांगनां-विषयीं धिक्कार कमी होऊं शकत नाहीं; तर कोणाचा विधवांविषयीं होऊं शकत नाहीं; तर कोणचा हीन जातिविषयीं होऊं शकत नाहीं. मद्य, मांस ह्याविषयींही तोच मासला आहे. एकदां एक समजूत घट्ट धरली, कीं मग या अभिमानी लोकांस, काळें आणि पांढरें यांतील देखील अंतर समजेनासें होतें. त्यांना जें पाप वाटेल तेंच लोकांस पाप वाटलें पाहिजे. आणि त्यांना जें पुण्य वाटेल तेंच लोकांस पुण्य वाटलें पाहिजे. मग शास्त्र, इतिहास, अनुभव कांहींही असोत. आमच्या हट्टी लोकांच्या पुढें सर्व विद्या आणि कला हात टेक-तात. ही झाली मानवी समजुतीची स्थिति.

प्रभुसत्तेचे खेळ तर इतके विपरित आहेत कीं, मनुष्यावर संकटें येणें हा अनुग्रह समजावा किंवा सुखाचा वर्षाव होणें हाच अनुग्रह समजावा, हेंच ठर-वितां येणें कठीण आहे. सुखांत दुःखाचें आणि दुःखांत सुखाचें बीजारोपण! अशी अन्यथा कर्तृत्वशक्ति जिकडे तिकडे पसरली आहे. यासाठीं सुखाच्या वेळेस दुःखाची भीति आणि दुःखाच्या वेळेस सुखाची आशा, ह्या दोन वेत्रयष्टींचे अवलंबन करून मनुष्यानें चालावें म्हणून शिष्ट लोक सांगत असतात.

**सरस्वती बाईः**—( बाजूनें पतीकडे पाहून ) यांची वृत्ति नेहेमींचीच गंभीर. त्यांत हल्लीं विरक्तपणाची

भर. यामुळें स्त्रीपुत्रादिकांची फारशी आठवणच नाहीं. याचें कारण, नवीन जुळलेली प्रेमग्रंथी तुटली; किंवा तुटली तरी म्हणावें कशावरून ? पुनः जुळली तर. बरें आपण जवळ जाऊन तर पहावें कसले विचार चालले आहेत ते. [ जवळ जाऊन ]

अलीकडे या कानडी देशांत मला मुळींच करमत नाहीं. आपल्याकडे पाहून कांहीं समाधान करावें तर आपली अगदीच उद्विग्न वृति झाल्या सारखी दिसतें. ही वृत्ति बदलणार केव्हां हें कांहीं समजत नाहीं. येथें आपली स्नेही मंडळीही चौकशींत असतात. परंतु माझी उदासवृत्ति आपल्यापुढें जशी व्यक्त होते, तशी दुसऱ्या कोणाही मनुष्यापुढें होत नाहीं. आपली सखेद वृत्तीही मला कळते. आपल्या मनांत वांकडे-पणा नसून मला तर बरें वाटावें असें आपलें वर्तन नाहीं याला म्हणावें काय ? माझी कांहीं चूक झाली असेल तर मला कळवावी.

**बापूसाहेबः**—आपली चूक काढणारे मनुष्य आहे कोठें ! माझ्या चुका लोक काढतात, त्याबद्दल मला खेद झाल्याशिवाय राहील कसा ? याचा दोष आपले-कडे नाहीं. जगाकडे आणि माझ्याकडे आहे. मनाला कांहीं नवीन संस्कार जडलें म्हणजे ते एकाएकी दूर होत नाहींत. तर आपण जशी इतके दिवस माझ्या वागणुकीबद्दल शांतवृत्ति धरलीत तशीच कायम राहिली

म्हणजे कांहीं कालानें सर्व यथास्थित होईल. दुसऱ्यावर केलेला उपकार जर चुकींत मोजला गेला, तर तो उपकार देखील टाकून देणें भाग होतें. तेव्हां अशा गोष्टी पाहून मनाला समाधान वाटावें कसें? हें कांहीं मला समजत नाहीं. परंतु रामालासुद्धां सीतेचा त्याग करण्यास लावणारे लोक कोणास काय करावयाला न लावतील! वारांगनांनीं प्रतिष्ठितपणानें राहण्याचें युग संपलें. आतां ज्यांना आपली स्थिति सुधारणें असेल त्यांनीं लोकरीतीस अनुसरून विवाहस्थिति पतकरावी. याशिवाय प्रतिष्ठितपणाचा मार्ग नाहीं. यासही आणखी एक अडचण पूर्वीं नव्हती. पूर्वीं जातिभेद विवाहाच्या आड येत नव्हते. परंतु हल्लीं येतात. त्याही मोडण्याची खटपट कांहीं उदार लोक करित आहेत. परंतु भाषणांत आणि सभेंत कळकळ दाखविण्यापलीकडे बहुतकरून मजल जात नाहीं. ती गेली म्हणजे या हीन जातीच्या लोकांचा प्रतिष्ठित समाजांत समावेश होऊं लागेल.

**सरस्वतीबाईः**—शांताबाईशीं कोणी समाजांतील प्रतिष्ठित लोक विवाह करतील असें आपणांस वाटतें काय?

**बापूसाहेबः**—हो; त्याचा काय नेम? संयुक्तजाति आणि हीन जात्युद्धार या दोन गोष्टी कबूल-केल्या म्हणजे असें होणें अशक्य दिसत नाहीं. दोन

तरी कशाला? एका संयुक्त जातींतच सगळीं कामें होतात. मी तशीच तजवीज केली आहे.

**सरस्वतीबाई:**—मला तर दोन काय एक काय आणि अर्धी काय, मुळींच या गोष्टींचा परिणाम बरा दिसत नाहीं. मला जर कोठें पहावयाला जावयाचें असतें तर एक विचार माझ्या प्रत्यक्ष अनुभवास एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, तीन दिवस नाहीं, महिनेंच्या महिने जर गृहस्थाश्रमांत वानप्रस्थाश्रमाचीं चिन्हें होऊं लागलीं, तर हे परोपकार, हे उद्धार आणि ही सुधारणा दृष्टीस काय पण स्वप्नांत देखील नकोशा झाल्या आहेत. मनासारखें बोलावें किती दिवस! त्याला कांहीं अंत असेल तर मनुष्य सोशील. पण अंतच जर दिसला नाहीं तर मग दुभंग झाल्याशिवाय कसें राहील? आतां मला या स्थितींतून पार पडणें कठीण दिसतें.

[इतकें बोलून मूर्छित होते.]

**बापूसाहेब:**—हा काय अनर्थ! असें मी काय केलें? [जवळ जाऊन मानेखालीं हात घालून सांवरून धरतो.]

पद.

जें तुझें दुःख तें शतगुण या दासाचें।
मम वचन हें सदा साचे॥ १॥

अपराध हातुनि घडले । पारि मंद मी न जाणीले।
समजूत तुझी बहु थोर करी निर्धोर बोलुनि वाचे ॥२॥
जें तुझें दुःख तें शतगुण० ॥
दुखविलें न तुजला स्वप्नीं । मग कोठुनिये तें मनीं ।
अंतरीं पाहि सुंदरि होत कितितरी हाल जीवाचे॥३॥
जें तुझें दुःख ते शतगुण० ॥
तूं दीपशिखा संसारीं । हें वचन सत्य निर्धारी ।
तुजवीण असे मज कार्य सुतनु वद काय तरी देहाचें।
जें तुझें दुःख तें शतगुण० ॥

टप्पा.

पाही एक वेळ दीनाकडे । विसरुनि अपराधातें । माझ्या रत्युत्सुख होउनि मजशीं खेळ । सखये एक वेळ ॥ सर्वांगीं तूं अससी माझ्या । अद्वैत अखंड प्रेम तुझें निर्भेळ । दावी एक वेळ । दीनाकडे पाही एक वेळ ॥

**सरस्वतीबाईः**—[ उठून बाजूला होते.] हें काय? आपण कशासाठीं इतके विव्हल झालां आहां? मला तर कसलीच आठवण नाहीं, परंतु आपणांस कांहीं चुकून मी बोलून गेलें असेल तर त्याबद्दल आपण खेद करूं नये, माझ्याकडून जर कांहीं सेवा घेणें असेल तर ही मी हजर आहे. आपल्या विलासस्थानीं चलावें.

( दोघे निघून जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ—धनाजी रावांचा वाडा.

[ सीन—धनाजीराव बसले आहेत व परिचारक उभा आहे. असा. ]

**परिचारकः**—आपल्याकडे एकबाई भेटण्यासाठीं आल्यात.

**धनाजीरावः**—कोण? कोठली बाई? कशासाठीं आली आहे? बरें येऊंदे हिकडे. ( मनांत ) समजेल काय काम आहे तें आल्यावर;

[ परिचारक व बाई येतात. ]

आपण इकडे बसावें. आपल्याला काय येतें, माझ्या हातून आपला काय उपयोग होण्यासारखा आहे. आपण खुशाल सांगावें. ( मनांत ) बाई तर रूपानें, तशीच विनयानें पूर्ण दिसत आहे. मग गुणही तसेच असले तर आमच्या मुलींस शिकविण्यास ठेवण्यास फार सोईचें होईल. ( उघड ) परिश्रम केल्याचीं चिन्हें तर आपल्या तोंडावरच दिसतात.

**गीताबाईः**—मला लिहितां वाचतां येतें व गायनाचीही थोडीशी समजूत आहे. आपला लौकीक, परोपकारी स्वभाव, व उदारपणा ऐकून आपली गांठ घ्यावी असें मनांत आलें. आपल्या येथें जर माझ्या हातून सेवा घडेल तर मला वेतनाची देखील फारशी गरज

नाहीं. कारण, माझी वागणूक आपल्या नजरेस यावी येवढाच माझा हेतू आहे.

**धनाजीराव**:—फार उत्तम. आपणास मी महिना ५० रुपये देईन. व आपण मी सांगतों तेथें आमच्या एका बागेंत रहावें, व मुलींस शिकवावें. आपल्या बरोबर कोणी मनुष्य आहे का?

**गीताबाई**:—होय; माझा भाऊ आहे. तो सर्व व्यवस्था करील.

**धनाजीराव**:—विठूजी! तुम्ही जाऊन ह्या बाईची सर्व व्यवस्था लावून द्या ऐकलेंत?

**परिचारक**:—जी, होय.

[ बाई व परिचारक निघून जातात. ]

**दुसरा सेवक**:—आपल्याकडे नारायणराव साहेब आले आहेत.

**धनाजीराव**:—येऊं देत.

**नारायणराव**:—रामराम.

**धनाजीराव**:—रामराम. यावें नारायणराव. बरेच दिवस इकडे येण्याची मेहेरबानी केली नाहीं.

**नारायणराव**:—विशेष कारण कांहीं नव्हतें. आणि आपलीं कामें सारीं यथास्थित चाललीं आहेतच. मग आपला वेळ घालविण्यांत तरी काय उपयोग?

**धनाजीराव**:—आपणांस मला सांगण्यास आनंद वाटतो कीं, आपल्या चिरंजिवांनीं बंगलूरच्या कामाची

व्यवस्था पूर्वीपेक्षां फार चोख ठेविली आहे. त्यामुळें व्यापारांत जास्त किफायत होऊन आपल्या पेढीचें वजन लोकांत वाढत्या प्रमाणावर आहे.

**नारायणराव**—मुख्य मालकाची नजर आणि त्याचें नशीब हींच व्यापारांत प्रधान आहेत. नाहींतर यशाचें अपयश होण्याला वेळ लागत नाहीं.

**धनाजीराव**:—आपण म्हणतां तें कांहीं खोटें नाहीं, परंतु ज्या त्या ठिकाणच्या व्यवस्थेचे मनुष्यच चांगले पाहिजे, नाहीं तर आमची नजर आणि नशीब हीं किती सांभाळणार? या त्याच्या चांगल्या कामासाठीं मीं त्याची पगारांत बहडतीही केली आहे.

**नारायणराव**:—आमच्या मुलास कामाला लावून या योग्यतेस जर आपणच आणिले आहे, तर त्याच्या मेहनतीबद्दल योग्य मोबदला देणेंही आपलेंच काम आहे. माझा सर्व भागच त्याच्याकडे देऊन टाकावा असें माझ्या मनांत येतें. कारण, मला या कामाची दगदग आजपर्यंत कांहीं थोडी झालेली नाहीं. आतां तीच ती नेहेमीं करण्यांत काय अर्थ आहे? मुलें काम करण्यासारखीं झालीं म्हणजे त्यांचे कडूनच काम करवावें तें बरें.

**धनाजीराव**:—कांहीं दिवसांनीं आपलें सर्व कामकाज सांभाळण्याजोगाच आपला मुलगा होईल, ह्यांत शंका नाहीं. मला तरी माझें काम स्वतः कोठें इतकें पहावें लागतें! सर्व काम यशवंत करतो.

**सेवकः**—आपल्याकडे केशवराव व दुसरे एक वकील आले आहेत.

**धनाजीरावः**—येऊं देत. ( दोघे आंत येतात. ) ( उठून ) रामराम बसावें असें. काय आज स्वारींनीं आम्हांवर मोठीच मेहरबानी केली म्हटली पाहिजे.

**केशवरावः**—अहो ! या सामाजिक सुधारणेच्या गोष्टी नुसत्या चालून किंवा नवीन नवीन पंथ निघून कोठें समाजाचें एकीकरण होणार आहे कां? आपण या कामांतील पुढारी म्हणून आपल्यास कांहीं विचार कळवून आपल्या सल्ल्यानें कांहीं एकीकरणाची खरी खरी सुरवात करावी असें मनांत आल्यावर आपणांस तसदी देण्याचें मनांत आणलें.

**धनाजीरावः**—मला तर या गोष्टीची फार हौस. पण आपलें जेथें पहावें तेथें अडचणीशिवाय कांहीं नाहीं. कोणी प्रार्थनासमाजांत तर कोणी ब्राह्मसमाजांत, कोणी आर्यसमाजांत तर कोणी थिऑसफींत, परंतु हिंदु मतांत राहून त्यांतील अनेक स्मृतींतून आणि शास्त्रांतून हिंदुमात्रास लागू पडणारे असें शास्त्रग्रथन कोणी करील, तर आपण म्हणतां तसें होणें शक्य आहे. आतां कोणी म्हणतील कीं, आर्यसमाजानें तसें केलें आहे. परंतु त्यांत वेदप्रामाण्याबद्दल जो दुराग्रह आहे, त्यामुळें त्याचें आणि अनाग्रही मतवाल्यांचें मुळींच जुळत नाहीं. ब्राह्मसमाज, थिऑसफी यांनीं

वेदाबद्दल जरी दुराग्रह धरला नाहीं तरी, हिंदुधर्मोचा पाया जितका धरला पाहिजे तितका धरला नाहीं. इतर धर्मांकडे त्यांची दृष्टि बरीच दिसते. हें सनातन-धर्मीयास तर पटावयाचें नाहींच, परंतु सुधारकांतही बऱ्याच लोकांना पटावयाचें नाहीं. यामुळें कांहीं हिंदु नांवानेंच प्रगतिपर वर्ग निघाला पाहिजे.

**केशवराव**:—काय लाख रुपयांची गोष्ट आपण सांगितलीत! या आशयानेंच संयुक्त हिंदुजातीचा वर्ग काढण्याचें योजिलें आहे. हें बरें आहे कीं नाहीं?

**धनाजीराव**:—आहे उत्तम. पण त्यांत जातो कोण? आणि त्यानें कोणत्या गोष्टींचा स्वीकार केला आहे, कोणत्याचा नाहीं, हें समजावयास नको का? बरें, जरी एखाद्या गोष्टीचा स्वीकार केला, आणि त्यास कायद्यानें आणि कोर्टानें अडचणी येऊं लागल्या म्हणजे आपली मान अडकावून दोरीची बळकटी पहाण्याचें शहाणपण करावें कोंणी?

**दुसरे वकील—विश्वासराव**:—ज्यांना सुधारणेची हौस आहे, त्यांनीं मान अडकवून घेण्याचें धैर्य जर केलें नाहीं, तर त्यांना सुधारणा पाहिजे आहे हें तरी खरें कशावरून? आणि अशा अडचणींचा प्रतिकार कायद्याच्या दुरस्तीनें किंवा नवीन कायद्यानें सरकारानें करावयाला लागावें तरी कशाला?

**नारायणराव:**—मला वाटतें कीं, एखादी विवाह पद्धति ठरविली पाहिजे आणि त्यास कायदेशीरपणाविषयीं सरकारचें अनुमोदन घेतलें पाहिजे. नंतर ज्या लोकांना त्या पद्धतीनें विवाह कर्तव्य असेल त्यांनीं त्याप्रमाणें करावा. असें झाल्यानंतर ज्यांस धैर्य असेल व गरज वाटेल ते तसे विवाह करतील. त्याच्या पूर्वी धैर्याची किंवा गरजेची परीक्षा होणें शक्य नाहीं. कांहीं लोकांनीं पुढारीपणानें अर्ज करणें योग्य होईल, व तसा यत्न जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत सभेंतलीं बोलणीं सभेंत व घरांतली बोलणीं घरांतच रहावयाचीं.

**दुसरे वकील:**—ब्राह्मसमाजानें तसें केलेंच आहे. ज्याला ब्राह्मसमाजपद्धतीनें विवाह करणें असेल त्यानें तसा केला, किंवा आर्यसमाजानें जी विवाहपद्धति चालविली आहे. त्यास अनुसरून विवाह केला म्हणजे झालें. मग ही तिसरी आणखी विवाहपद्धति कशाला?

**केशवराव:**—याचें कारण येवढेंच कीं, ज्यास हल्लींचे हिंदुसमाजांतील इतर कोणत्याही समजुतींची ढवळाढवळ न करतां फक्त जातिभेद मोडून टाकावयाचा आहे, त्यास या ब्राह्मसमाज किंवा आर्यसमाजांतील पद्धति उपयोगी पडत नाहींत.

**दुसरे वकील:**—अशा समजुती कोणत्या, कीं ज्यांत आपण ढवळाढळ करूं इच्छित नाहीं?

केशवरावः—यांतील मुख्य मूर्तिपूजा. याचें विरुद्ध झाल्यानें हिंदूंतील लोक शेंकडा सुमारें ८० किंवा ९० लोक आपणाबरोबर राहण्यास तयार नसतात. यासाठीं आणि इतर कारणांसाठीं याविषयांत ढवळाढवळ करावयाची नाहीं.

दुसरे वकीलः—इतर कारणें कोणतीं? तीं तरी कळलीं पाहिजेत.

केशवरावः—मूर्तिपूजक असून तुळशीदास, तुकाराम इत्यादि महासाधु जर उत्पन्न होतात, तर मूर्तिपूजेस वाईट म्हणण्याचे भरीस आपण कां पडावे? त्यांत हलके हलके दुरस्ती झाली तर इतकें वाईट तें काय?

दुसरे वकीलः—बरें, मूर्तिपूजेशिवाय अशा कोणत्या आणखी समजुती आहेत? कीं ज्यांत आपण ढवळाढवळ करूं इच्छित नाहीं.

केशवरावः—अवतारासंबंधी विश्वास. पूर्वापरजन्माविषयींचें ग्रह; हे लोकसमाजांत इतके वाढले आहेत कीं, त्यांच्यांत ढवळाढवळ केली तर, हिंदुधर्माची ओळखच बुजून जाईल. शिवाय, यांचें अंशतः ग्रहण इतर सर्व धर्मांत असल्यानें त्यांजविषयीं विशेष कटाक्ष ठेवणेंही शोभत नाहीं.

दुसरे वकीलः—मग विवाहपद्धति तरी पहिली राहिली म्हणून काय बिघडतें?

**केशवराव**:—वाटेल त्या हिंदूजातीचे विवाह एकमेकांत चालू पद्धतींत नाहींत म्हणून. आणि हे जोंपर्यंत न होतील किंवा होण्यास मोकळिक नसेल, तोंपर्यंत जातिभेद मोडण्याविषयींची इच्छा आणि व्याख्यानें केवळ बाह्यात्कारींच रहावयाचीं. असे विवाह करूं लागण्यापूर्वीं सरकारचे अनुकूल मत असे विवाह-कोर्टांत कायम राखण्याचें असलें पाहिजे. त्याशिवाय लोकांनीं करूं लागणें शक्य नाहीं. आणि सरकारचें असें मत मिळविण्याची खटपट कोणी केल्याशिवाय तेंही मिळणें शक्य नाहीं. ही खटपट कशी करावी, कोणी करावी याविषयीं जर मार्ग सुचत नसेल तर, सोपा मार्ग सह्या घेण्याचा आहे आणि त्या घेऊन अर्ज करणें. एरवीं नुसती इच्छा एक दोन वर्षांआड दाखवून पुनः स्तब्ध राहून कांहीं व्हावयाचें नाहीं.

**दुसरे वकील**:—बरें; ह्यावरून आपण हिंदूपैकीं सर्व जातींत विवाहाची मोकळीक देणार आणि मूर्ति-पूजा, वेदाचें ईश्वरप्रणीतत्त्व, अवतार व जन्मांतराच्या समजुती ह्यांच्या वाटेस जात नाहीं.

**केशवराव**—होय, असेच. आणि यासाठींच नारा-यणरावजींनीं विवाहपद्धति नवी ठरविली पाहिजे म्हणून सांगितलें. परंतु हें काम देखील कांहीं सोपें नाहीं. कारण, ह्यांत एक तर वयाचें मान ठरविण्याचें आहे. दुसरें, विवाहविधि पुरोहितवर्तीनें करावा किंवा

रजिष्ट्रारपुढें व्हावा, हें ठरविण्याचें आहे. आणि तिसरी गोष्ट अशी आहे कीं, एकपत्नी असल्यास दुसरी करतां यावी किंवा नाहीं, आणि एखादी टाकणें असेल तर ती टाकतां येईल कीं नाहीं, हीही गोष्ट ठरली पाहिजे.

**नारायणराव**—विवाहाचे वेळीं स्त्रीचें वय १४ च्या आंत असूं नये व पुरुषाचें वय १८ च्या आंत असूं नये. इतकें ठरलें म्हणजे वयाचा प्रश्न सुटला. पुरोहितवर्गानें विवाह लावण्याची चाल कायम राहून शिवाय विकल्पानें रजिष्ट्रारपुढें नोंदविण्याची चाल जर सरकारानें मंजूर केली तर हाही प्रश्न सुटेल. आणि तिसरी गोष्ट राहिली, त्याचा चालत आलेला रिवाजच कायम ठेवला म्हणजे सारे प्रश्न सुटले.

**धनाजीराव**—नारायणरावजींची योजना माझे मनास फार पसंत पडते. कसें काय विश्वासराव? आपलें मत कसें काय आहे?

**विश्वासराव**—असें समजा कीं, आपण सह्या मिळविल्या, अर्ज केला, आणि सरकारानें कदाचित् संयुक्त हिंदुवर्ग म्हणून कबूल केला; व त्यासाठीं विशेष संस्काराची योजनाही कबूल केली. परंतु अमुक मनुष्य या संयुक्त वर्गांपैकीं आहे किंवा नाहीं, हें ठरवावयाचें कोणी?

**केशवराव**:—ज्याचें त्यानें.

**विश्वासराव:**—कोणासमोर ?

**केशवराव:**—जर रजिष्ट्रार पुढें जाण्याचा प्रसंग आला तर त्याच्यापुढें सांगावें. व इतर प्रसंग पडल्यास या वर्गानें नेमलेल्या विशिष्ट मंडळी पुढें.

**विश्वासराव:**—उपनयनादि संस्कार तसेंच श्राद्ध-कर्मादिक व प्रेतसंस्कार यांचीही व्यवस्था होण्यास नको का ? हे करावेत कोणी ? कसे ? कांहीं अगदीं सोडले तर चालेल कीं नाहीं ? फेरबदल कोणचा करणें शक्य आहे ? सोडल्यानें किंवा फेरबदलानें हिंदुधर्माच्या वारसपणाच्या हक्कास बाध येईल त्याजबद्दल निकाल काय ? परंतु या प्रमाणें कायद्यानें स्पष्टता होण्यास फार जोराची खटपट व अर्ज झाले पाहिजेत.

**केशवराव**—मला त्या खटपटीस लागावयाचेंच आहे. परंतु प्रथम धनाजीराव ह्यांचा विचार घेऊन मग काय तें करावें म्हणून त्यांच्याकडे आपणांस घेऊन आलों होतों.

**विश्वासराव**—मला तर कांहीं या खटपटीचा चांगला शेवट होईल असें दिसत नाहीं. कारण, सल्ला देण्यापूर्वीं अनेक शंका निघतात. आणि त्यांचीं उत्तरें देण्यास एखादी मंडळी नेमलेली असल्याशिवाय व त्यांचीं मतें प्रगट झाल्याशिवाय, आधार असा कांहींच दाखवितां येत नाहीं. संस्कारासंबंधी जी अडचण येते,

तशीच भक्ष्याभक्ष्य विचारासंबंधींही निघावयाची. आपल्या संयुक्त वर्गात याबद्दल काय निर्णय करण्याचें योजिलें आहे ? व कोणत्या मंडळीचा निर्णय म्हणून लोकांनीं ऐकावा ?

**धनाजीराव**:—आपण जें इतका वेळ बोललों त्यावरून जाति मोडून संयुक्त वर्ग काढण्याचे बरोबर विवाहपद्धति, इतरसंस्कार, भक्ष्याभक्ष्य इतक्या गोष्टींविषयीं विचार करून निर्णय करणारी मंडळी नेमली असली पाहिजे. त्याशिवाय आम्हांला जाति नको, इतक्या म्हणण्यांत कार्य होत नाहीं असें झालें. केशवराव, आपण जर अशी मंडळी स्थापून कांहीं उद्योग करण्याचें मनावर घेतलें तर मी आपल्या श्रमाचा योग्य मोबदला देईन.

**केशवराव** —बरें आहे. माझ्या मनांत यत्न करण्याचें आहेच. आपला त्यावर दुजोरा झाल्यावर उत्तमच. जातों तर, रामराम.

**नारायणराव व विश्वासराव** --आपणही आतां जावें.

( रजा मागून रामराम करून निघतात. )

[ धनाजीराव सर्वांस रामराम करतात. ]

## अंक ३ रा.

### प्रवेश १ ला.

**स्थळः**—जज्जसाहेबांचें घर.

[ **सीनः**—ते व एक वकील बोलत बसले आहेत. असा. ]

**केशवराव**—[ पाहरेकऱ्याकडे पाहून ] मी आलों आहे असें सांग.

**पाहरेवाला**—जी होय. आपल्या नांवाची चिठ्ठी आहे का ?

**केशवराव**—[ खिशांतून काढून ] ही घ्या.

[ पाहरेवाला घेऊन जातो आणि दाखवितो. ]

**जज्जसाहेबः**—अरे! येऊं दे वकिलांला.

**पहारेवालाः**—जी. आपल्याला बोलावलें आहे. चलावें.

**केशवरावः**—[ आंत जाऊन नमस्कार करतात. ]

**जज्जसाहेबः**—[ उठून नमस्कार करून ] यावें. असें बसा आपण. कशी काय आपली खटपट आतां चालली आहे ?

**केशवराव**—जातिभेद मोडण्याचा मार्ग कोणी सुचवील तर त्याबद्दल खटपट करावी असें मनांत आहे.

**जज्जसाहेब**—वाः ! ही तर समाजसुधारणेची पहीली पायरीच आहे. आणि त्याविषयीं आपल्या सारख्यांनीं खटपट केल्यास काय पाहिजे ?

**केशवराव**—जातिभेद कोणत्या गोष्टीसंबंधानें मोडावयाचा, याचा विचार आपला काय आहे हें समजलें पाहिजे.

**जज्जसाहेब**—प्रथम खानपानासंबंधानें मोडवा.

**केशवराव**—नुसता तेवढाच मोडून इतर व्यवहार पूर्वींचे कसे कायम रहातील? जर उघड उघड सर्व जातींत खानपानादि व्यवहार झाले तर प्रत्येक गृहकार्यांत प्रायश्चित्ताखेरीज कोणी पूर्वींची रीति कायम ठेवूं शकणार नाहीं. प्रत्येकवेळेस प्रायश्चित्त घेणें आणि पुनः त्याविरुद्ध वागणें हें कोणाही समंजस मनुष्यास पसंत पडणार नाहीं.

**जज्जसाहेब**—ब्राह्मसमाजविवाहपद्धति बरी नाहीं का?

**केशवराव**—त्यास हिंदुधर्म सोडल्यावांचून चालत नाहीं असें ह्मणतात. निदान नवीन पंथ स्वीकारल्याचा देखावा होतो. तसें न करतां हिंदुधर्माचीच पद्धति एखादी ठरली तर ती जास्त बरी नाहीं का?

**जज्जसाहेब**—बाह्य पद्धतीच घेतली म्हणजे झालें.

**केशवराव**—ती पद्धति साधारण हिंदुसमाजाचे लोकांस कायद्यानें लागू केल्याशिवाय लागू होणार नाहीं.

**जज्जसाहेब**—तशी लागू करण्याबद्दल हिंदुसमाजाकडून अर्ज वगैरे खटपट झाली पाहिजे.

**केशवराव**—मग आपली सही त्याच अर्जावर पाहिजे म्हणजे इतर कांहीं पुढारी मंडळीच्या सह्या घ्यावयास बरें पडेल. [ अर्ज दाखवितो. ]

**जज्जसाहेब**—आपण कसा काय अर्ज केला आहे ? [ हातात घेऊन वाचून पाहतो. ]

" ज्याअर्थी कांहीं प्रगतिक हिंदुसमाजाच्या पुढाऱ्यांनीं संयुक्त हिंदुवर्ग काढण्याच्या हेतूनें एक सभा स्थापन केली आहे. व त्या वर्गानें, दाखल होणाऱ्या लोकांसाठीं विशेष संस्कारपद्धति ठरविली आहे, त्या अर्थीं सरकारची संमति इतकीच पाहिजे कीं, या पद्धतिप्रमाणें वागण्यानें साधारण हिंदुधर्माप्रमाणें प्राप्त होणारे सामाजिक किंवा मिळकतीसंबंधाचे हक्क कोणाचे कमीजास्त होणार नाहींत, कायम राहतील. समाजानें अवश्य संस्कार किती याबद्दल नियम ठरविले आहेत तेः—

" प्रथम संस्कार हिंदुत्वाचा, दुसरा विवाहाचा आणि तिसरा प्रेत." हें तर आपण फार थोडक्यांत आणिले आहेत. मला देखील या पोकळ वाढलेल्या संस्काराच्या भारुडाची अशीच छाटाछाट करावयास पाहिजे होती.

**शंभुराव वकील**—मग उपनयन राहिलेंच नाहींतर ?

**जज्जसाहेब**—अहो ! तो संस्कार हल्लींच्या कालमानाप्रमाणें अगदीं फुकट आहे. पुरोहितवर्गाचे जरी पोट चाललें, तरी गृहस्थास त्यापासून कांहीं

उपयोग नाहीं. सोयरे-धायरे यांस निमंत्रणें, त्यांस येण्याजाण्याचा त्रास आणि गरिबगुरिबांस तर जरूर तो खर्च करणें देखील जिवावर येतें.

**शंभुराव**—तर मग आपण पारशी लोकांच्याही पुढें जाणार ! त्यांच्यात तर अझून 'कस्ती' म्हणजे उपनयना दाखल जानवें घालतात. मराठे लोक तर उपनयनादि वैदिक संस्कारासाठीं जुने उपाध्ये बदलून नवे करतात. मग हे उपनयन अज्जी टाकून देण्याचें धाडस वाजवीपेक्षां फाजील नव्हे काय ?

**केशवराव**—अहो ! आमची या संयुक्त हिंदुवर्गाची योजना बहुतेक ऐच्छिक आहे. ज्यांना वाटेल त्यांनीं पाहिजे तर उपनयन चालू ठेवावें. परंतु तो विधि अवश्य असा समजला जाणार नाहीं. आलीकडे फाजील शोकी लोक जुबिली नाहीं का करीत ? ही कोणत्या धर्मांत सांगितली आहे ? परंतु हौसेला बांध घालावा कोणी ? ज्याची जशी हौस, तशी त्यांनीं ती फेडावी बापडी. ना कोणाची आहे ? परंतु धर्मानें अवश्य म्हणून ज्या विधींचा संग्रह करावयाचा आहे, त्यांत उपनयन नको. कारण तर उघडच आहे. पूर्वींचे शिक्षणक्रमही राहिले नाहींत, गुरूही राहिले नाहींत, आणि त्यांची मानमान्यताही राहिली नाहीं. मग हे विनाकारण खर्चाचें चाक लोकांच्या गळ्यांत अडकविण्यांत अर्थ काय ?

**जज्जसाहेब**—कांहीं नाहीं. मला तर वाटतें कीं, संस्कार कमी करण्याची आणि ऐच्छिक ठेवण्याची योजना फार उत्तम. अर्थशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें तरी, ही योजना ज्यांना थोडें तरी स्वहित समजत असेल त्यांस किती हितावह होईल?

**शंभुराव**—आमची समजूत आजपर्यंत अशी होती कीं, हिंदुधर्माच्या रीती सर्व जशाच्या तशा ठेवून जुन्या शास्त्राचे आधारें होतील तितक्या सुधारणा करावयाच्या. परंतु उपनयनासारखा श्रेष्ठ विधि जर अनवश्यक मानला, तर मोठेंच धर्मांतर होईल. शिवाय, ऋषिप्रणीत नियमांमध्यें जर कांहीं सूक्ष्म फलप्राप्ती असली, तर ती एकदम टाकून देणें योग्य कसें होईल?

**जज्जसाहेब**—म्हणूनच ऐच्छिक ठेवल्यानें ज्यांस वाटेल त्यांनीं तो विधि पाहिजे तर करावयास मोकळीक ठेवलीच आहे. ही योजना कांहीं गैर नाहीं. [ अर्ज पुढें वाचतात. ]

" हिंदुत्वाचा संस्कार जन्मापासून ६ महिन्याच्या आंत वाटेल तेव्हां करावा."

हें तर उत्तम. नाहींतर १२व्या दिवशींच नाहींतर महिन्याचे आंत वगैरे तातडीनें मुलास किती तरी त्रास होतो!

**शंभुराव**—मग कान टोंचण्याचें संपलेंच. तर मग, अविंध म्हणून लोकांस म्हणण्याचें कारणच राहिलें नाहीं.

**जज्जसाहेब**—नाहीं नाहीं. त्या रीती घालून भेद वाढविण्यांत मतलब काय ? शिवाय मुलांचें हालही कमी होतील.

"विवाह पुर्वींच्या रितीप्रमाणें अगर रजिस्ट्रारासमोर व्हावा. ज्या जातींत काडी मोडण्याची रीत आहे, त्यांनीं ती कायम ठेवल्यास हरकत नाहीं. परंतु हे निकाल बायकोकडील दोन व पुरुषाकडील दोन पंचांनीं मिळून करावें. त्यांजकडून बहुमतानें न होईल तर जातीनें सरपंच नेमून त्यानें करावा."

**जज्जसाहेबः**—पंचासंबंधानें स्त्रीपुरुषाच्या बरोबरीच्या हक्काची योजना फार योग्य दिसते. परंतु विवाहपद्धति पूर्वींची कायम राहिली म्हणजे एकाचवेळीं एक पुरुष दोन दोन तीन तीन बायकांही करूं शकेल. आणि काडी मोडण्याचा हक्क फक्त पुरुषांचाच राहील. मला वाटतें बायकांचाही हक्क योग्य कारणानें विवाहसंबंध तोडण्याचा कबूल करणें योग्य होईल.

**केशवरावः**—होय तसा त्यांत ठेवला आहे. आपण पुढें पहावें.

**जज्जसाहेब**:—होय, होय. आणि कारणेंही दिलीं आहेत. [ अर्जाकडे पहातो ]

"क्रूरपणानें वागविणें, किंवा इतर योग्य कारणासाठीं याचा निकाल स्त्रीपंचांनीं करावा."

वाः! ही तर स्त्रियांचें हक्क सांभाळण्याची अपूर्व खुबी आहे!

**शंभुराव**:—हें तर स्त्रीराज्याचें पूर्वरूप दिसते. परंतु पुरुषाला पसंत पडावें कसें?

**जज्जसाहेब**:—जसे पुरुषांनीं केलेले निकाल बायकांस कबूल होतात तसे.

**शंभुराव**:—ही सुधारणा तर यूरप, अमेरिका, किंवा जपान ह्यांच्याही पुढे गेली म्हणावयाची. असें झाल्यास येथें स्त्रियांस आपलें हक्क मिळविण्यासाठीं विलायतेसारखी मुळींच यातायात पडावयाची नाहीं.

**केशवराव**:—अहो, आमच्या खटपटींत राजकीय हक्काची भांडाभांडी मुळींच नाहीं. तेव्हां सरकाराशीं विरोध होण्याचा प्रश्न आटोपला. समाजातील लोक जर आपणांत भांडतील म्हटलें तर मुळीं त्या सुधारणेसाठीं वर्गच स्वतंत्र काढावयाचा आहे तर समाजांतील लोक तरी कसे भांडतील? परंतु कोणी कलहप्रियच असतील तर त्यांची समजूत घालणार आहे कोण? बाकी आपण म्हणता कीं, यूरप वगैरे

देशांपुढें आम्ही जातों, तर त्यांत कांहीं गैर आहे कीं काय? नेहेमीं दुसऱ्याच्या मागून चालणें हेंच कांहीं चांगलें का? स्वतः एखादी गोष्ट नवीन केली तर, त्यांत कांहीं बिघडतें का? चांगली किंवा वाईट ह्याची परीक्षा तरी केल्यानंतरच होणार का आधीं?

**जज्जसाहेबः**—माझें आपल्यास या कामीं फार धन्यवाद आहेत समजलात? अगदीं पहिल्या प्रतीचे काम आपण करीत आहां. स्त्रियांचे हक्क उत्तम रीतीनें जगापुढें आणण्यास ही योजना फारच मजेदार आहे. स्त्रियांच्या फिर्यादींचा निकाल स्त्री पंचांनीं करावा. वाः! काय आपलें वर्णन करावें! असेंच पाहिजे म्हणजे दुसऱ्यावर हक्क चालवून त्यास किती कठिण पडतें याची कल्पना होते. [ अर्ज पुढें वाचतात. ]

“ असंतति किंवा अतिसंततिसाठीं पुरुषानें दुसरी स्त्री केली तर चालेल. परंतु होतां होईल तों ह्याहून अधिक करूं नयेत.”

ही तर गोष्ट व्यवहारिक सोयीच्या विरुद्ध दिसते. दोन दोन स्त्रिया एखाद्या वेळीं सलोख्यानें राहतात खऱ्या, परंतु बहुतेक अशा राहणें कठीण? आणि खर्च झेपणें कठीण. यासाठीं या कलमाला एकदम संमति देतां येत नाहीं.

**केशवरावः**—अशी मोकळीक नसली तर मग वारांगना शोधणें किंवा दुसऱ्याचीं घरें बाटविण्याच्या

खोडी रहातील. तेव्हां आपल्यास या खोडी आवडतील तर कलम काढून टाका. न आवडतील तर कायम ठेवा. बाकी विवाहधर्म हा अत्यंत सूक्ष्म विषय आहे यामुळें अमुक पद्धति चांगली आणि अमुक वाईट हें ठरविणें फार कठीण आहे.

जज्जसाहेबः—आपण म्हणतां याचा गूढार्थ लक्षांत घेऊन मी याविषयीं विशेष वाटाघाट करीत नाहीं.

शंभुरावः—बरें, ह्यांत विधवाविवाहाविषयीं काय नियम झाला ? हें कांहीं मला बरोबर समजलें नाहीं.

केशवरावः—अहो ! जिला पति नाहीं, आणि कर्तव्य आहे, तिला करण्यास नको म्हणणारें शास्त्र आम्हीं मुळीं जाणतच नाहीं. ती मुळींच स्वभावाविरुद्ध बडबड ! याबद्दल आपल्यास शंका कशाची आहे.

शंभुरावः—असें असेल तर मग आमची मुळींच तक्रार रहात नाहीं. बरें मग पुढें प्रेतसंस्कारांतील श्राद्धादिकाची काय व्यवस्था आहे ?

जज्जसाहेबः—[ अर्जाकडे पाहून ] हे सर्व ऐच्छिक ठेवले आहेत. मला तरी हेंच पसंत आहे.

शंभुरावः—बरें ही सर्व गोष्ट झाली या तीन संस्कारांची. आतां संध्या, पूजा यांजविषयीं कांहीं या अर्जांत विचार केला आहे कीं काय ?

केशवराव:—मला कांहीं गरज दिसली नाहीं. कारण अर्ज आहे सरकारांतून हल्लींचे अवश्य मानलेले संस्कार न केल्यानें विवाहवारसा यासंबंधानें येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठीं. सरकार कांहीं अमुक प्रकारानें संध्या करणें किंवा पूजा करणें अगर न करणें यावर हिंदुत्व किंवा वारसा ठरवीत नाहीं. मग त्यासंबंधीं उल्लेख या अर्जांत कशासाठीं पाहिजे ?

जज्जसाहेब:—बरोबर. धर्म आहे परमार्थिक व व्यवहारिक. अर्जांत आहे गोष्ट व्यवहारिक धर्मासंबंधानें संध्यादिकाची गोष्ट आहे पारमार्थिक. आपणास पारमार्थिक धर्मासंबंधानें नियम करणें जरूरच नाहीं. त्यांत अनेक समजुती आणि अनेक रीती. जसा ज्याला रस्ता आवडेल तसा त्यानें अनुसरावा कोणी त्रिकाल पूजा करतील, कोणी एक वेळ करतील, कोणी नुसती प्रार्थनाच करतील, तर कोणी प्रार्थना करणेंच गैर समजतील. परमात्मस्वरूप कसें आहे याविषयीं जशा अनेक समजुती, तशाच त्याच्या आराधनेच्या रीतीही अनेक. या समजुतींचा इतिहास पाहिला म्हणजे जसजसे मनुष्याचे विचार वाढत गेले, तसतसे त्याचे परमात्म स्वरूपाचे विचारही बदलत गेले. परंतु मूळांत पाहिलें असतां मनुष्याला आपली शक्ति नियमित आणि जगाचे व्यापार चालविणारी शक्ति त्याच्याहून मोठी. तेव्हां त्याचा आधार कोणी तरी समजून

त्याच्या आराधने विषयीं त्याचें मन यत्न करूं लागले. यामुळेंच प्रथम अग्नि, वायु, आणि पर्जन्य यांचें स्तवन, नंतर या तिन्ही शक्ति एकाच परमेश्वराच्या मानून त्याचें स्तवन, नंतर प्रार्थनेनें वश होणें परमेश्वरास गौणत्व आणतें अशा समजुतीनें निष्काम भक्ति इत्यादि विचार पालटत गेले. तेव्हां ज्याचे ज्या तऱ्हेचे विचार कायम असतील, त्यांनीं त्या तऱ्हेनें आराधन करावें ह्यांत दोष मानून भांडण करणें कांहीं बरें नाहीं. यासाठीं परमेश्वराराधनेचे मार्ग ऐच्छिकच राहिले म्हणजे कोणाही हिंदुसमाजाचे मन दुखविण्याचा प्रसंग येत नाहीं.

शंभुरावः—जसजशी समजुत सुधरेल तसतशी सर्व लोकांची समजूत सुधारण्याचा यत्न नको का करावयाला ?

केशवरावः—यत्न करणें योग्यच आहे. परंतु त्यांत जुलमाचा प्रकार उपयोगी नाहीं. आगगाडीचा प्रवास निघाला म्हणून बैलगाडी किंवा इतर वाहनें कांहीं रद्द होत नाहींत. व ज्याठिकाणीं जाणें आहे, तें ठिकाण चुकतें असेंही नाहीं. इतकेंच कीं लौकर उशिरा. "येयथा मां प्रपंद्यते" वगैरे वचनांत तरी हेंच रहस्य आहे. चित्तशुद्धि ही मुख्य गोष्ट. ती कोणत्याही मार्गानें झाली म्हणून हरकत नाहीं.

**शंभूरावः**—बरें, हें झालें पारमार्थिक धर्माविषयीं. आतां भक्ष्याभक्ष्य विषयांविषयीं काय विचार केला आहे? याबद्दल तरी कांहीं थोडें रण माजलेलें नाहीं. आणि हा विषय आहे व्यावहारिक.

**जज्जसाहेबः**—आपले अर्जांत याविषयीं कांहीं उल्लेख दिसत नाहीं. इतकी गोष्ट ह्यांत दाखल झाली पाहिजे कीं, भक्ष्याभक्ष्य दोषांनीं हिंदुत्वास कोणत्याही तऱ्हेनें बाध येणार नाहीं.

**केशवरावः**—असें आपणास जरूर दिसत असल्यास तें आह्मांस कबूल आहे. भक्ष्याभक्ष्य विषय खरोखर म्हटला म्हणजे वैद्यशास्त्राचा. परंतु त्याचा समावेश प्राचीन कांहीं धर्मांत झालेला आहे. तो काढून टाकण्यासाठीं आपण ह्मणतां तसें कलम दाखल करून त्यास सरकारी संमति मिळविली म्हणजे संयुक्त वर्गाच्या प्रतिष्ठेस पुरें होईल. अर्ज मजकडे द्यावा.

[जज्जसाहेबांकडून अर्ज हातांत घेऊन त्यांत लिहितो आणि वाचतो.]

" संयुक्त हिंदुवर्गांतील लोकांस पूर्वींचे भक्ष्याभक्ष्य नियम लागू होणार नाहींत. या गोष्टी त्यांचे स्वमतावर राहतील. त्यामुळें त्यांच्या हिंदुत्वास कमीपणा येणार नाहीं.

**जज्जसाहेबः**—हें बरोबर झालें. आतां ही मोठीच गोष्ट मिटली म्हणावयाची. नाहींतर यामुळें किती-

तरी वैमनस्यें चालतात. तीं जर सर्व बंद झालीं, तर समजावर कितीतरी उपकार!

शंभुरावः—समाजावर उपकार होतात, पण प्राण्यांच्या जिवावर घाड येते.

केशवरावः—वन्यप्राण्यांच्या जिवावर घाड ही केव्हांही आहेच. परंतु पाळीव जनावरें मारणें हें मात्र पसंत नाहीं. परंतु हे सर्व रिवाज ज्या त्या देशाच्या स्थितीवरून प्रथम सुरू होतात आणि नंतर संवयीमुळें अपरिहार्य होतात. यांत जुलमानें बदल करणें योग्य नाहीं. जसजशी स्थिति पालटेल, जसजशी संवय मोडेल, तसतसे व्यवहार बदलतील. याविषयीं दुराग्रह व कलह उपयोगीं नाहींत. रुंद पायावर रचना म्हणतात तशी या संयुक्त वर्गाची करावयाची आहे. यासाठीं मद्यपानासंबंधानें जरी पुष्कळ लोक कट्टा विरोध धरतात, तरी आम्ही त्यासंबंधानें सर्व पक्षांस सारखेच मोजतों. कोणत्याही प्रकारच्या दुराग्रहास आम्ही थाराच देत नाहीं.

जज्जसाहेबः—अतिरिक्त पानामुळें होणारा दोष दाखवून निषेध सिद्ध करणें म्हणजे अति विषयासक्तीच्या दोषापासून नित्य ब्रह्मचर्य सिद्ध करण्यासारखें नव्हे कां? जर हेंच व्यसन वाढतें असें म्हटलें तर तसें कांहीं नाहीं. सर्व व्यसनें वाढतात, आणि सर्व ताब्यांतही राहतात. याचाच तेवढा अतिरेक

मनांत घेणें आणि इतरांना सोडणें हें कांहीं बुद्धिवादाचें लक्षण नव्हे. हा हठवाद झाला. यासाठीं आपण जो याचा विचार केला आहे, तोच मला बरा दिसतो.

शंभुराव—कांहीं लोक विलायतेचें आणि अमेरिकेचें उदाहरण देतात, कीं पिढ्यानुपिढ्या पिणारे लोक देखील अगदीं न पिण्याविषयीं जारीनें यत्न करतात, मग आपल्यांत तर शास्त्राचा निषेध असून आपण कां निषेधाची बाजू धरूं नये?

केशवरावः—म्हणजे या कोटिक्रमांत एका ऐवजीं दोन चुका होतात. पहिली जज्जसाहेबांनीं सांगितली ती आणि दुसरी दोन समाजस्थितींतील अंतर लक्ष्यांत न घेणें ही जेथें अतिरेकाचीं दुष्ट फळें समाजाचे दृष्टीस पडूं लागतात, तेथें निषेधवाद उत्पन्न झाला तर कांहीं नवलही नाहीं परंतु तोच निषेधवाद सर्वत्र लागू करूं लागलों तर समाजस्थिति लक्षांत न घेण्याचा दुसरा दोष होतो.

शंभुरावः—याप्रमाणें आपण बहुतेक गोष्टींविषयीं विचार केला, आतां काय राहिलें?

केशवरावः—आपल्या उभयतांच्या सह्या या अर्जावर मिळाल्या म्हणजे एक दोन संस्थानिकांकडे जाण्याचें मनांत आहे. त्यांच्याही सह्या अशाच मिळ-

वून अर्ज सरकारांत पाठवू व त्याविषयीं संमति मिळाली म्हणजे हिंदुसमाजासंबंधानें नेहमीं दाखविला जाणारा व खरा एकलकोंडेपणाचा दोष दूर होईल, आणि त्यांतील लोकांची इतर लोकांचे बरोबर व आपसांतील व्यवहारपात्रता अधिक होईल.

**जज्जसाहेबः**—ही घ्या सही माझी. ( लेखण घेऊन दौतींत बुडवून सही करतो व अर्ज केशवरावाकडे देऊन ) हं करा शंभुराव आपण सही. बघतां काय ?

**शंभुरावः**—( हातांत अर्ज घेऊन सही करतो. ) हं ही घ्या सही. आतां लागा उद्योगाला. पाहूंद्या या आपल्या यत्नास कसे यश येतें तें. आमची तर प्रार्थना " विश्वानि देवसवितर्दुरितानिपरासुय " अशी आहे.

**केशवरावः**—वाः आपला मी फार ऋणी आहे.

( नमस्कार करून दोघांची रजा घेऊन जातो. )

**शंभुराव व जज्जसाहेबः**—आपणही आपापल्या कामास जावें. ( असें म्हणून निघून जातात. )

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—संस्थानिकांचा महाल.

**सीनः**—(दोन मित्र जवळ असून बोलत आहेत असा.)

**केशवरावः**—(पहारेवाल्यास) कसें काय शिपाई-बोवा? महाराजसाहेब काय करताहेत.

**पहारेवालाः**—आहेत. दोन मंडळींजवळ बसले आहेत कांहीं विचारांत.

**केशवरावः**—मग आमची वर्दी लागेल का?

**पहारेवालाः**—होय. [घड्याळाकडे पाहून] ही आहे भेटीची वेळच. परंतु आपलें नांव वगैरेची चिट्ठी असली म्हणजे दाखवायला बरी.

[केशवराव चिट्ठी काढून शिपायाजवळ देतो. शिपायी आंत जाऊन रामराम करून चिट्ठी देतो.]

**संस्थानिकः**—[चिट्ठी पाहून] होय. या म्हणावें. (मित्रमंडळीकडे पाहून) आपला परिचय आहे का केशवरावजींचा?

**सदाशिव शास्त्री व पं. भागचंदः**—आहे थोडा.

[केशवराव रामराम व नमस्कार करून बसतात.]

**संस्थानिकः**—बरें आपलें येणें वेळेवर झालें. हे गृहस्थही कांहीं धर्मविषयक गोष्टीच बोलत बसले आहेत. आपण कांहीं यासंबंधीं करण्याचें मनांत आणलें

आहे काय ? माझ्या मनांत तर हिंदूंचें ऐक्य वाढेल अगर दुसऱ्या तऱ्हेनें ह्मटलें म्हणजे भेद मोडतील असा मार्ग कोणी सांगितला तर, त्यास होईल तितकी मदत करावी असें आहे. पण असा मार्गच कांहीं दिसत नाहीं. ह्मणावयाला एक हिंदुस्थान, परंतु जातिभेद, आचारभेद, भाषाभेद, व परिधानभेद ह्यांचें झालें आहे अग्रस्थान. आमच्या सारख्यांनीं कांहीं खटपटी केल्या तर त्याविरुद्ध सल्ला देणारी, भांडणाला तयार होणारी मंडळीच पुष्कळ. मला वाटतें, शास्त्राची दुरुस्ती झाल्याशिवाय या कामीं कोणतेही प्रयत्न सफल होणें शक्य नाहीं.

**पंडित भागचंदः**—आर्यसमाजवालोंने दुरुस्ती कर छोडी हए. अबी इस देशके महाशयों की सहायता चाहिये. और कुछ बात बाकी नही. जो महाराज साहेब इसकू सहायता करें तों आर्यसमाजसे देशका हित बहुत सत्वर हो जाएगा.

**सदाशिवशास्त्रीः**—प्राचीन हिंदुधर्माची या आर्यधर्मीयांनीं ओळख देखील नाहींशी केली आहे.देवालयें तर ह्यांनीं सोडलींच,आणि पूजाही पण सोडलीच. आणि विशेष हें कीं अन्य धर्मांत गेलेल्या लोकांना देखील हे परत घेतात! आतां नवीन मात्र घेण्याचें बाकी राहिलें.

**संस्थानिकः**—आजपर्यंत हिंदुधर्मांत मोजले जाणारे लोक केव्हां तरी एक वेळ दाखल झालेच

असले पाहिजेत. नाहींतर हिंदुधर्माची जितकी व्यापक स्थिति वाटते तितकी कधींच वाटणार नाहीं. कार ण, मूळ धर्म प्रचलित करणारे लोक कांहीं सर्व हिंदुस्थान भर मूळचे राहणारे नव्हेत. जसे जसे इतर लोक या वेदधर्मांत सामील होऊं लागले तसतशी त्यांची व्याप्ति वाढली.

**सदाशिवशास्त्री**—अहो, चार वर्ण हे मूळापासूनच आहेत. मग दाखल झाले असें कोणास म्हणावें? 'ब्राह्मणोस्य मुखमासीत्' वगैरे श्रुति हेंच सांगतें.

**संस्थानिकः**—हल्लींच्या कालाशीं या श्रुति वाक्याची मुळींच समन्वितता दिसत नाहीं. कारण, मुखाची उपमा ब्राह्मणाला दिली तर, पुष्कळ ब्राह्मण अशिक्षित दृष्टीस पडतात. आणि अब्राह्मण शिक्षित दृष्टीस पडतात. तसेंच इतर वर्गांतही झालें आहे. शिवाय यवन, म्लेच्छांस या रूपकांत मुळींच सोडलें आहे. परंतु हल्लीं ते या चारही वर्णांहून फार प्रबल आहेत. तेव्हां ह्या रूपकाची सार्थकताच राहिली नाहीं असें वाटतें.

**केशवरावः**—आर्य समाजाचे लोकांस तर श्रुति-प्रमाण धरल्याशिवाय चालत नाहीं. मग या गोष्टीचें उत्तर ते काय देतील हें समजत नाहीं.

**पंडित भागचंदः**—ये श्रुतिवचनमे भारतवर्षके वास्ते व्यवस्था हुए न अन्य देशोंकेवास्ते; इसमे आप समजलीजिए.

**संस्थानिकः**—अशी एकदेशीय आणि एकशाखीय वचनें हल्लींच्या पालटलेल्या स्थितीला उपयुक्त राहिलीं नाहींत. या वर्णविभागानें किंवा वर्णविशिष्ट कर्मानें समाजाचें हित झाल्याचें दिसत नाहीं.

**केशवरावः**—माझा तरी विचार असाच आहे कीं, यापुढें हिंदुमात्राचा संयुक्त वर्ग समजावा. आणि त्यांतील कर्माप्रमाणें ज्याची त्यांस योग्यता मिळावी. वर्णविभाग आणि वर्णसंकर यांचा उच्चारच नको. 'हिंदु' येवढी संज्ञा सर्व हिंदवासीयांस एकवटण्यास पुरें आहे.

**पंडित भागचंदः**—हिंदु संज्ञा तो परदेशीयोनें रखी हए. हमारी मूल संज्ञा आर्य है. सो छोडके य दुसरी संज्ञा कायकू हमने स्वीकृत करना?

**केशवरावः**—घेण्याचें कारण मिळून येवढेंच कीं, इतकी सर्वत्र प्रसिद्ध व वहिवाटलेली दुसरी संज्ञा नाहीं. आणि यांत फक्त या देशाचें नांव असल्यानें त्यांत कमीपणाही कांहीं नाहीं. जैन, लिंगाइत, ब्राह्मो, थिऑसफिस्ट कोणत्याही मार्गांत असले तरी, मूळ जे हिंदु ते हिंदुच समजले जातात. जैन, लिंगायत हे असें कोणी म्हणणार नाहींत कीं, आम्ही हिंदु नाहीं. परंतु अमुक एक आर्य आहे किंवा ब्राह्मो आहे किंवा थिआसफिस्ट आहे असें म्हटल्यानें त्याचे मूळ धर्माचा बोध होत नाहीं. तात्पर्य हें कीं, हिंदु हा शब्द शेंकडों

वर्षे रूढ झाल्यामुळें एकंदर हिंदुस्थानांत चालणाऱ्या पंथांच्या लोकांस तो लागू होतो, तसा दुसरा शब्द सोईचा नाहीं.

**संस्थानिकः**—मलाही हाच शब्द चांगला वाटतो.

**सदाशिवशास्त्रीः**—केशवरावजींनीं कांहीं नवीन समाजरचना करण्याची कल्पना काढली आहे कीं काय?

**केशवरावः**—होय. आतां आम्हांला या वर्ण-भेदाचा अनुभव पुष्कळ झाला. या शिवायच सर्व साधारण संस्कार ठेवावे म्हणजे हल्लींच्या स्थितीला तशा समाजाची पुष्कळ अनुकूलता दिसून येईल. इतर देशांत असे वर्ण आणि आश्रम नाहींत; त्यामुळें त्यांचें काय अहित झालें आहे? उलट पहावें तों हितच आहे. आपणही किंचित् समाजरचना निराळ्या रूपाला आणली तर काय बिघडेल? या कामीं महा-राजासारख्यांचें अनुकूलमत असल्यानें आम्हांसही फार उत्साह वाटतो. परंतु एक दोन गोष्टी या कामीं प्रथम आपणांस सांगून नंतर या प्रकरणास कृतींत आणण्याविषयीं जो विचार केला आहे तो कळवितों.

पहिली गोष्ट अशी आहे कीं, जातिभेद मोडण्याची खटपट वरच्या वर्णाशीं खालच्या वर्णाची असते. परंतु वरच्याची खालच्याशीं नसते. या आक्षेपास आधार नाहीं, असें म्हणतां येत नाहीं. म्हणून या खटपटी दोन्ही बाजूंनीं होणें इष्ट आहे.

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, समाजरचना होण्यास कायद्याची अनुकूलता पाहिजे. तशी होण्यास ज्या दिशेनें खटपट झालेली पाहिजे होती, तशी झाली नाहीं. ज्यांनीं अशी अनुकूलता मिळविली, त्यांनीं हिंदुधर्माचें रूप बदललें. त्यामुळें समाज जशाचा तसाच राहिला. आणि एक नवीन पंथ मात्र स्थापन झाला. आम्हाला नवे पंथ कशाला पाहिजेत? आहेत तेच जर कमी व्हावेत असें वाटतें तर, यासाठीं जे हिंदुलोक संयुक्त वर्गाच्या समजुतीनें राहूं इच्छितात, त्यांनीं केलेला विवाह, अगर प्रेतसंस्कार ह्यापासून त्यांचे सामाजिक किंवा सांपत्तिक हक्कास बाध येणार नाहीं असें आश्वासन सरकारचें म्हणजे कायद्याचें पाहिजे. तसें मिळण्यास बरेच पुढारी लोकांचा अर्ज झाला पाहिजे. यासाठीं अर्ज तयार करून त्यावर सह्या मिळवाव्या असा विचार केला आहे.

**संस्थानिकः**—अर्ज तयार करावयाचा आहे किंवा झाला आहे?

**केशवरावः**—केला आहे. हा पहावा. [ अर्ज काढून देतो. ]

**संस्थानिकः**—[ हातांत घेऊन पाहून विचार करतात. ] पहिला संस्कार हिंदुत्वाचा; दुसरा विवाहाचा; आणि तिसरा प्रेत. याशिवाय इतर संस्कार आणि विवाह देखील मर्जीवर. आपल्या पतीच्या

वर्तनाविरुद्ध बायकोची फिर्याद असेल तर, त्याचा निकाल स्त्रीपंचांनीं करावा. [ हासतात. ]

**केशवराव:**—कां? आपल्यास हें पसंत नाहीं किंवा फार पसंत आहे, हें कांहीं समजलें नाहीं.

**संस्थानिक:**—आपण ही गोष्ट फार पुढें ढकलली आहे. बाकी मी कांहीं अशा गोष्टीच्या विरुद्ध नाहीं. जर पुरुषांनीं केलेले निकाल बायका कबूल करतात, तर त्यांच्या पंचांनीं त्यांच्या जातीनें आणलेल्याच फिर्यादीचा निकाल केला तर तो आम्हांस कां कबूल होऊं नये? हें म्हणणें अगदीं बरोबर आहे. असूं द्या. आपण केलेली योजनाच कायम ठेवूं.

**सदाशिवशास्त्री:**—आतां या नवीन समाजरचनेबरोबर जुनीं शास्त्रें समुद्रांत कीं एखाद्या तलावांत बुडवावयाचीं याचाही कांहीं नियम केला आहे का?

**केशवराव:**—अहो; आम्हीं कोणतींच शास्त्रें बुडवीत नाहीं. फक्त तीं सोडून चालणें जेथें प्रशस्त दिसतें, तेथें तीं सोडण्याचा अधिकार व्यक्तीचे मर्जीवर आणि नवीन नियमानुसार ठेविला आहे.

**पंडित भागचंद:**—पहिले ऋषि-मुनी तो भूत भविष्य जाननेवाले थे. क्यौं की वो योगाभ्याससे परमात्माकु जानते थे. फिर उनके मतोंकूं छोडना कैसा प्रशस्त होगा?

**संस्थानिकः**—मला तर परमात्मज्ञानाचा, योगाभ्यासाचा आणि व्यावहारिक नियमांचा संबंध फारसा दिसत नाहीं. व्यावहारिक नियमांची रचना व्यवहारज्ञांनींच केली पाहिजे. तेथें योगाभ्यास आणि परमात्मज्ञान यांचा संबंध फार थोडा आहे. शिवाय योगाभ्यासानें होणारें भूतभविष्यज्ञान फारसें अनुभवास येत नाहीं. परमात्मज्ञान तर मनुष्यानें कितीही यत्न केले तर त्याचे शक्ती बाहेरीलच दिसतें. यासाठीं व्यवहारनिपुणतेनेंच व्यवहारनियम झाले पाहिजेत.

**पंडित भागचंदः**—तो आप वेदका प्रामाण्य तो मानते हए या नही ?

**संस्थानिकः**—हे प्राचीन ग्रंथ कधीं कसे तयार झाले, हें समजणेंच आधीं कठीण. शिवाय त्यांत नानाप्रकारच्या कथा, इतिहास, वर्णनें आहेत. शास्त्रनियम असे थोडेच. परंतु त्यांतून ज्या चालीरीतींविषयीं उल्लेख सांपडतात त्याबद्दल ते प्रमाणच म्हटले पाहिजेत. परंतु एकमेकांविरुद्ध श्रुति पुष्कळच आहेत. तेव्हां त्या सर्वच प्रमाण होऊं शकत नाहींत.

**केशवरावः**—आतां या वादांत राहण्यापेक्षां हातांत घेतलेल्या कामाचा निकाल लावूं म्हणजे मला आपली रजा घेणेस ठीक पडेल. पंडितजीच्या समाजाची व्यवस्था झालेली आहेच. आमची योजना जरा निराळी आहे. आणि त्याचें रूप अद्यापि जगापुढें येणें आहे,

सबब या अर्जावर आपली सही झाली म्हणजे जास्त मिळविण्याचे खटपटीस लागेन.

**संस्थानिकः**—आपण जज्जसाहेबांची व इतर कांहीं मंडळीच्या सह्या घेतल्याच आहेत. मीही करून देतों. आपणाला या कामीं पूर्ण यश येईल असें इच्छितों.

[ हातांत अर्ज घेऊन सही करून परत देतो. ]

**केशवरावः**—आतां मला रजा मिळावी. मग जेव्हां पुनः कारण पडेल तेव्हां तसदी देईन.

**संस्थानिकः**—बरें आहे. यावें आपण.

**केशवरावः**—[ उठून नमस्कार करून ] जातों. [ जातांना पंडित व शास्त्रीबोवांस विचारतो. शास्त्रीबोवा व पंडित उलट नमस्कार करून निरोप देतात. ]

**शास्त्रीबोवाः**—महाराजांनीं असल्या सुधारकी पंथास जवळ केल्यावर पूर्वींच्या धर्माचा त्राता कोण?

**संस्थानिकः**—पूर्वींचा धर्म आणि हल्लींचा धर्म असे कांहीं निराळे नाहींत. धर्म हा येथून तेथून एकच. त्याचीं तत्वें सारखीं. मात्र मनुष्यास कळण्याची वेळ निराळी. आपणाला सृष्टी उत्पन्न कशी झाली, हें जरी पहाण्यास मिळालें नाहीं, आणि लय कसा होईल हेंही पाहण्यास मिळणार नाहीं, तरी आपल्या आयुष्यांतीलच सुरवातीच्या स्थितीचा आणि ५० वर्षांत बदललेल्या स्थितीचा जर विचार केला तरी देखील आपणास कळेल कीं, मनुष्याला ५० वर्षी-

पूर्वीं ज्या गोष्टी कळत नव्हत्या त्या आतां कळूं लागल्या आहेत. असें जर आहे तर, सृष्टीच्या आरंभीं या-पेक्षांही पुष्कळ अधिक अज्ञान असून पुढील कालीं हल्लींपेक्षां ज्ञानांत पुष्कळ भर पडेल, हें अनुमान सहज होतें. शिवाय, जितका इतिहास विश्वसनीय सांपडतो, त्यावरून देखील हेंच अनुमान निघतें. मग पूर्वींच्या धर्मांतील चांगलें तेवढें राखून नवीन जें जें चांगलें आढळेल तें त्यांत दाखल करीत गेल्यास वाईट काय?

**शास्त्रीबोवाः**—पूर्वींपेक्षां तर आचार कमी, श्रद्धा कमी, विद्वान् लोक कमी; मग ज्ञानांत भर कोणती पडली आहे? आपण म्हणाल कीं, आगगाडी, तारा-यंत्र, गिरण्या आणि छापखाने या व अशा इतर गोष्टी कल्पकतेवांचून आणि ज्ञानावांचून निघाल्या नाहींत. हें सर्व जरी खरें आहे, तरी ब्रह्मज्ञानापुढें शिल्पज्ञान कांहींच नाहीं. ज्या साधनानें चंद्र, सूर्य, तारे यांचें क्षणामध्यें ज्ञान होतें, त्याच्यापुढें ह्या लोखंडी चक्राचें आणि खिळ्यांचें किंवा वाफेचें आणि विजेचें ज्ञान कः पदार्थ आहे! तसेंच देहस्थ रिपूंच्या दमनापुढें चोर, लुटारू, यांच्या शासनाची किंमत काय? आमच्या पूर्वजांनीं ब्रह्मज्ञान व आत्मज्ञान ह्यांत जो काळ घाल-विला, तो कांहीं गैर घालविला असें म्हणतां येत नाहीं.

**संस्थानिकः**—चंद्र, सूर्य, तारे यांचें यथार्थ ज्ञान, पूर्वींच्या ऋषिमुनींना झालें होतें असें मुळींच दिसत

नाहीं. कारण, हल्लींच्या गणितापुढें पूर्वींचें गणीत आणि कल्पना या बऱ्याच चुकलेल्या दिसतात. तसेंच आत्मज्ञानाविषयींचा शोध शरीरज्ञानावर अवलंबून असल्यामुळें त्यांतीलही हल्लींचे शोध मागील कल्पनेस बाध आणितात. देहस्थरिपूंचें दमन जरी इष्ट आहे, तरी ह्या रिपूंचें शासन झाल्याशिवाय व्यवहार चालणार नाहीं. ह्यासाठीं व्यवहार किंवा विद्या याकडे दुर्लक्ष करून चालणे अनुभवावरून योग्य दिसत नाहीं. भक्तीपासून ईश्वर साध्य आहे हें खरें; परंतु ज्ञान हें भक्तीच्या विरुद्ध आहे असें नाहीं. उलट तें त्याला वाढवितें असें मला वाटतें.

**पंडित भागचंदः**—आपने बहुत विचार किया है ये विषयोंके बारे मे हमतो आपकु कुछ कहने नही सकते हे. लेकिन स्वामीजीके बनाये हुए ग्रंथोके देखनेसे आपकू प्रत्यय हो जाएगा के हमारे ऋषि मुनिओकू आत्मज्ञान पूर्ण हो गयाथा. ये पुस्तक मेरे पास एक हए. इसकु आप यथावकाश देखना. फिर मै कभी आवुंगा तो बात करना. इसवक्त मेरेकु रुखसत् देना. [ उठून नमस्कार करून जातो. ]

**संस्थानिकः**—[ रामराम करतात. ] बरें आहे. आपण आणखी केंव्हां तरी विशेष बोलूं .

**शास्त्रीबोवाः**—मलाही रजा द्यावी. बराच वेळ झाला आहे. मीही पुन्हां एखादे वेळेस येऊन बोलेन. [ आशिर्वाद देतो आणि जातो. ]

**संस्थानिक**—[ उठून नमस्कार करतो. ] यावें आपण शास्त्रीमहाराज. आपणही आपल्या कामास लागावें. [ निघून जातो. ]

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**स्थळः--बाग**

**सीनः**—[यशवंतराव व त्याचा खेळगडी एक लहान मुलगा शंकर प्रवेश करतात. यशवंतराव एका बाकावर बसतो. जवळ खेळगडी बसतो असा. ]

**यशवंतरावः**—कायरे शंकर! तुझी आणि गीताबाईची ओळख तर आहेच, मग मी निरोप सांगतों तो त्यांस कळीवशील कां? [ मनांत ] मला माझा मित्र बापू यानें त्यांजबद्दल सर्व हकीगत कळविली आहेच. पहावें प्रत्यक्ष भेटून.

**शंकर**—काय निरोप आहे? सांगण्यासारखा असला तर सांगेन. माझें काय जातें? पण त्यांना राग येईल असें तर कांहीं नाहींना?

**यशवंतराव**—राग येण्यासारखें कांहीं मी सांगत नाहीं. फक्त माझी त्यांची येथें भेट झाली म्हणजे मी त्यांस काय विचारणें तें विचारीन.

**शंकर**—फक्त मी त्यांस येथें आपण बोलावलें आहे म्हणून सांगतों.

**यशवंतराव**—परंतु त्यांच्याजवळ माझ्या धाकट्या बहिणी आहेत, त्यांस न कळेल अशा रितीनें सांगितलें पाहिजे. नाहींतर त्या मुली आहेत तर्कवान्.

म्हणतील दादानें कशाला बोलावलें आहे ? तर त्या बरोबर आल्यावर मला कांहीं बोलावयाचें आहे तें बोलतां येणार नाहीं.

शंकर—असें आपल्याला गुप्त कांहीं बोलावयाचें आहे तर ? बरें पाहतों तशी वेळ जमली तर. आणि नाहीं जमली तर तसाच येईन. त्या पहा, बागेंतच आपल्या दोघी बहिणी ताईसाहेबांच्या बरोबर हिंडत आहेत.

[ तिघी प्रवेश करून हळूहळू फिरतात. ]

यशवंतराव—मी तोंपर्यंत एका बाजूस असतो. तूं त्यांना हिकडे पाठीव आणि मुलींच्या बरोबर जरा खेळत बैस.

[ यशवंतराव एका बाजूस जातो. व शंकर गीताबाई व मुली असतात तिकडे जातो. ]

शंकर—अक्कासाहेब ! ही बघा पिंवळी चिमणी त्या झाडावर.

यमुताई—अरे ! मला दाखीव शंकर.

शंकर—ती पहा. [ दोघीजणी पहातात तों गीताबाई जवळ जाऊन निरोप सांगतों. ]

गीताबाई—[ मुलीस ] मी तिकडून जाऊन येते. तुमचेजवळ शंकर आहेच.

[ मुली व शंकर चिमणीच्या नादांत बाजूस निघून जातात. ]

[ गीताबाई पुढें येते. ]

**यशवंतराव**–[पुढें येऊन स्वगत] बरेच दिवस मनांत घोळत असलेले विचार बाहेर काढण्याचा निश्चय तर केलाच आहे. मग आतां लाजावें कशाला? किंवा प्रथम कांहीं दुसऱ्या गोष्टी बोलाव्या. असल्या कामीं स्त्रियांस काय आणि पुरुषांस काय, प्रथम गोष्ट काढण्याचा विचारच पडतो. बहुधा स्त्रिया असल्या गोष्टी प्रथम काढीतच नाहींत. परंतु कित्येक ठिकाणीं तशा काढल्याची कथानकें आहेत म्हणून म्हणावयाचें. [ पुढें होऊन ] आपणांस मुलींनीं बरें सोडलें. मला तर वाटलें कीं, शंकर कांहींतरी सबब सांगेल. आणि आपणांशीं बोलावयाचें तसेंच राहील.

**गीताबाई**—आपल्याला असें काय बोलावयाचें होतें? मुली जवळ असल्या तर त्यांना काय समजतें.

**यशवंतराव**—तसें साधारण बोलण्यांतील असतें म्हणजे कांहींच हरकत नव्हती.

**गीताबाई**—मग काय, माझ्या विरुद्ध कांहीं आपल्या तीर्थरूपांस किंवा मातुश्रीस कोणी सांगितलें किंवा माझे हातून कांहीं अपराध घडला? कोणती गोष्ट अशी मुलीच्या देखत न बोलण्यासारखी आहे?

**यशवंतराव**—आपल्या विरुद्ध तर नाहींच. उलट उभयतां वडील आपल्या वर्तणुकीवर फार खुष आहेत. व आपली हकीगत मला एका मित्राकडून कळली आहे.

गीताबाई:—मग माझें दुर्दैव याच दिशेनें पुढें येऊं पहातें कीं काय? हें कांहीं मला समजत नाहीं.

यशवंतराव:—दुर्दैव किंवा सुदैव आपणां दोघांचें एकच, अशी माझी झालेली वृत्ति आपणास कळवावी ह्मणून निश्चय केला होता, तेव्हां सांगतों.

पद.

[ कांते फार तुला—या चालीवर. ]

कांते कांति तुझी भुलवी मज चित्त उंचवळतें।
पूर्णेंदु पाहुनि जलधीचें जल न शांत रहातें॥

गीताबाई:—

प्रीतिविवाहाचें युग सरुनी गेलें कां विसरतां?
जातीकुल पाहुनि भार्या हो वरा तुम्ही आतां॥
मातुःश्रीची तशी पित्याची मित्राचीहि सल्ला।
मिळेल जरि तरि करा मजवरी प्रेमाचा हल्ला॥
तोंवरि नियमन वृत्तीचें करणें हें भूषण मोठें।
परिणामीं सुख तेंच करावें कठिण जरी वाटे॥

यशवंतराव:—

सुस्वर ही जाति थोर सुस्वभाव सत्कुल हे।
प्रत्यय दे शुद्ध चित्त हा सल्ला आहे॥

गीताबाई:—

व्यवहारा सोडुनीया हें सगळें बोलणें।
नचचाले लौकिकाच्या रीतीतें सोडणें॥
धीरानें बरें दिसतें यासाठीं चालणें।
आहे हें शुद्धबुद्धीचें माझें सांगणें॥

[ शंकर व मुलगी चिमणी घेऊन येतात. ]

अक्का:—ताई! ही पहा सांपडली आम्हांला चिमणी. [शंकरजवळ असलेल्या चिमणीकडे बोट दाखविते.]

यमुताई:—मी दाखविली तरी.

शंकर:—पण मी धरली म्हणून.

अक्का:—आईला नेऊन दाखवूं आणि पिंजऱ्यांत ठेवूं.

यमुताई:—मी दाखवीन.

अक्का:—बरें, तूं दाखीव. तुझ्या हातांत घेतेस कां?

शंकर—[द्यावयाला लागतो.] घेतां का?

यमू—[द्यावयाला लागते आणि पुनः हात परत घेते.] आपण दाखवूं. मी कशाला द्यावयाला पाहिजे?

अक्का—बरें, मग आम्ही कोठें नाहीं म्हणतो? आपणच दाखवूं.

यमू—[दादाकडे पाहून] दादा! कशी आहे चिमणी पाहिलीस का? आम्ही घेऊन जातों आईकडे.

यशवंतराव—अगदीं उत्तम आहे बोवा. पण हें चिमणीचें बच्चें आहे. त्याची आई त्यास पाहील आणि म्हणेल, माझें बच्चें कोणी नेलें?

यमू—शंकरानें धरलेन. आम्ही कांहीं धरलें नाहीं.

शंकर—धरावयाच्या वेळेस मी आणि दाखवायच्या वेळेस तुम्ही! वाः! तुम्ही तरी यमूबाई हुशार आहां!

**यमू**—मग आम्हीं धरलें नाहींच. दाखवावयाला काय झालें ?

**शंकर**—मग मी देऊं तर सोडून? धरल्याचें नांवही माझ्यावर नको, आणि दाखविण्यास न्यायलाही नको. का कबूल आहे ?

**अक्का**:—आई म्हणेल तर देऊं सोडून. त्यांत तुला कोण वाईट म्हणेल?

**यशवंतराव**:—अक्कानें ही तोड बरी काढली. म्हणजे धरण्याचें व दाखविण्याचें भांडणच नको. मग तुम्ही जा पुढें ताई मागून येतील.

**अक्का**:—हं; आम्हांला आहे ठाऊक, तुम्ही कशाला बसला आहां तें. आम्हीं येतांना गाणें ऐकिलें. तेंच आम्हीं पुन्हां ऐकलें म्हणून काय झालें ?

**यशवंतराव**:—तुम्हाला येत असेल तर, आम्हालाच म्हणून दाखवा. आम्ही ऐकतों.

**गीताबाई**:—अक्का, तुम्ही आणि यमुबाई बरोबर म्हणा पाहूं गाणें येतें आहे तें. मी म्हणूं लागते.

[ अक्का आणि यमू म्हणतात. आणि गीताबाई त्यांस मदत करते.]

## पद.

[ नमुनि ईशचरणा–चालीवर. ]

**ब्रह्म विष्णु ईश्वरा स्मरा सावित्री लक्ष्मी उमा ।**
**अनंत नामें ऐशा वर्णिति करुनि अलंकारा ।**
**बद्धांजलि आम्ही होउनि वंदु त्या जगदाधारा ॥**

नरनारी रूपांत ऐक्य भेदासि ठेवि जो मनोहरा।
गत्याकर्षणि स्थिति साधुनि जो चालवि चराचरा १
जडचिद्रूपें ज्यानें ठेवुनि परस्पराधारा।
केला अद्भुत सृष्टपदार्थांचा हा सर्व पसारा ॥२॥
सुखदुःखाचें चक्र कसें फिरतें हें न कळे चतुरा।
समत्त्व धरुनी सोडुनि देऊं सर्व अहंकारा ॥ ३ ॥
अभ्यासीं मन नित्य राहो कर्तव्यांत सदा।
हीच विनंति करतों आम्ही तुजपाशीं प्रभुवरा ॥४॥

**शंकर**—हे पहा! वडील मातुश्री इकडेच येत आहेत.

[ सगळेजण उठून पहातात. तों ते दोघे कुंजगृहांत येतात. ]

**धनाजीराव**ः—अरे! येथें बरीच मंडळी जमली आहे. आणि तुम्ही काय खेळतां आहां कीं, गोष्टी सांगतां का गाणी ह्मणतां आहां? काय चाललें आहे?

**यमुताई**—हें पहा! हे गाणीं ह्मणत होते. आणि आह्मी ही चिमणी धरली आहे. बोटानें दाखविते.

**अक्का**—हे येथें बसले होते. आणि आह्मांला बागेंत चिमणी सांपडली.

**यशोदाबाई**—आणि आतां प्रार्थना कोण ह्मणत होते?

**धनाजीराव**ः—खरें कीं काय? तुम्ही प्रार्थना ह्मणत होता काय? आह्मला ऐकूं दे बरें ती प्रार्थना. वेळही पण बरी संध्याकाळचीच आहे. चिमणी आपण ठेवूं मग दुसऱ्या पक्ष्यांसारखी पिंजऱ्यांत.

[ यमु–अक्का–व गीताबाई पूर्ववत् ह्मणतात.]

ही प्रार्थना तर फार उत्तम. कोणी जुळली आहे? गीताबाईनीं स्वतः कीं काय?

गीताबाई:—मी अशीच एकली आहे. मला कोठें जुळवितां येतें? माझें काम गाण्याचें. जुळिवण्याचें काम विद्वानांचें.

धनाजीराव:—बरें, कोणी का जुळवीना? मुलींनों दुसरी कविता ह्मणा.

मुली व गीताबाई:—

पद.

जग हें कौतुकांनीं भरलें, अंतर्बाह्य मनोहर दिसलें,
इतुकें कष्टांनीं केलें, कां मिथ्या मानावया ॥ १ ॥
चंद्र, सूर्य, पृथ्वी, ग्रह तारे विद्युज्जल तेज आणि वारे।
शिकण्याकरितां किंवा सारे मिथ्या मानावया ॥२॥
आईबाप बहिणबंधु पतिपत्नी प्रेमसिंधु ।
मित्रजन साधुही कांहो मिथ्या मानावया ॥ ३ ॥
सर्व ब्रह्म म्हणती जरी पोटासाठीं फिरती दारी।
कामक्रोधादिकीं सोडिले संसारीं कासया ॥ ४ ॥
विद्याकला संपादणें कलहावांचूनी राहणें।
मनुष्यजन्म घेणें आहे अर्थ साधावया ॥ ५ ॥
स्वर्गनरक याच लोकीं अधिक काय नाकीं नरकीं ॥
जाणुनि करा यत्न नकीं अर्थ साधावया ॥ ६ ॥
फळें पुष्पें गोड उदक उपभोग्य वस्तु अनेक।
सयंम नियम करा सेवक अर्थ साधावया ॥ ७ ॥

धनाजीराव:—आपलें पद्य तरी किती उदात्त विचारांनीं भरलेलें आहे! आपण कोणाच्या सहवासांत

इतके खोल विचार शिकला, मला कांहीं अनुमानच करतां येत नाहीं. विचारांनीं लोक वागतील तर त्यांस जगाचा आलेला कंटाळा, वेदांताविषयाचा व्यवहारांत होणारा अतिक्रम, आणि त्यापासून समाजास भोगावीं लागणारीं दुष्ट फळें क्षणैक देखील टिकणार नाहींत. परंतु आमचा वृथाभिमान आणि शुष्क वादविवादांत गोंधळण्याची सवंय हीं जातात कोठें? आमच्या लोकांस समाजाऐवजीं स्वर्ग हा मुख्य विषय झाला आहे. परंतु बापडे प्रत्यक्षास अंतरतात, व अप्रत्यक्ष हें तर अप्रत्यक्षच! हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्याची आमच्या लोकांची अवस्था झालेली आहे. यांतून सुटण्याचा मार्ग कांहीं सोपा दिसत नाहीं. जग मिथ्या म्हणण्यांत फक्त पालटणारें इतकेंच समजलें तर कांहीं अनर्थ नाहीं. परंतु जर खोटें असें समजलें तर मात्र अनर्थ आहे. रूढ समजूत अशी अनर्थात्मकच झाली आहे. त्यामुळें उद्योगाचीं मूळेंच खणून काढल्यासारखीं झालीं आहेत, त्यांस आपलें पद्य अगदीं औषधाच्या जागीं आहे.

मी आपल्या पूर्वस्थितीविषयीं कांहीं चौकशी केली नाहीं. कारण, केव्हां केव्हां मनुष्य पाहूनच सर्व खात्री होत असते. परंतु मला वाटतें, आपण चांगल्या जातींत विवाह केला असतां चांगलें. कारण लग्नाचें वय हेंच.

**यशवंतरावः**—( पुढें येऊन, जनान्तिक) आम्ही उभयतां तीर्थरूपांच्या येण्यापूर्वी जें कांहीं गात-बोलत होतों, त्यांतील मजकुराचा अजमास कांहीं झाला आहे, किंवा मजकूर कानीं गेला कांहीं समजत नाहीं. बरें; लग्नाची योजना झालीच तर येथेंच योजना व्हावी, असें कोण म्हणणार? कां मीच स्पष्ट सांगावें? बरें; पण पुढें काय बोलणें होतें ते तर पहावें.

**गीताबाईः**—माझी पूर्वस्थिति कांहीं सांगण्या-सारखी नाहीं. आणि माझे मनांत योग्य वरावांचून लग्न करण्याचेंही नाहीं.

**यशवंतरावः**—( जनान्तिक ) काय सोन्यासारखी वेळ चालली आहे? अरे ! योग्य वर माझ्या सारखा उत्सुक असून त्याच्यानें तोंडानें स्पष्ट बोलवत नाहीं. अहाहा ! मदनशरांनो ! तुम्हांला आंत शिरतांना किती सोपा रस्ता मिळतो? परंतु बाहेर पडतांना तुह्माला किती कठीण जातें? मन विद्ध होण्याला वेळ लागत नाहीं, परंतु विद्ध झालें असें उघड रीतीनें सांगण्यास किती विचार पडतो?

**धनाजीरावः**—योग्य वर पहाता येईल. मग जातीची देखील अडचण नाहीं. फक्त आपली इच्छा आहे असें समजलें म्हणजे मी तपास करीन.

**गीताबाईः**—आपण या कामांत सर्व विचार आपल्या चिरंजीवांचे विचारें करावा तो मला कबूल आहे.

यशवंतराव:—( जनान्तिक ) वा: गीताबाई ! तूं तर मला गीतेसारखीच प्रिय झाली आहेस. याहून काय अधिक प्रियकर तूं बोलावेस? बरें आहे. विचारूंद्या बाबांना. मग विषय निघालाच म्हणजे सांगणें काय कठीण आहे ?

धनाजीराव:—चिरंजिवाच्या विचाराबाहेर मी नाहींच पण या कामीं केशवराव म्हणून माझे एक स्नेही आहेत त्यांचीही मदत पुष्कळ होईल असें वाटतें. बरें तर आम्ही जातों.

यशोदाबाई:–(धनाजीरावाची स्त्री) तुम्हाला यायचें आहे कांग मुलींनों ?

यमु:—आम्ही बागेंत खेळून येतों.

यशोदाबाई:—आतां रात्र होत आली. खेळ-ण्याची वेळ आहे तरी कां अजून.

यमु:—मग आम्ही या कारंजाच्या तळ्यांतील लाल मासे पाहून येतों.

यशोदाबाई:–आतां सगळे रंग एक होण्याची वेळ आहे. आतां लाल काय आणि पिंवळें काय ?

यमु:—नाहीं. अजून दिसतय थोडेसें.

यशोदाबाई:—बरें, मग उठा. लवकर पाहून तरी या घरीं.

[ सगळे उठतात आणि जातात. ]

## प्रवेश २ रा.

स्थळः—[ सनातन धर्मवाले लोकांची सभा ]

**गोविंदरावः**—वेळ तर फार झाला असून मंडळीचा ठिकाण नाहीं. ही लोकांला धर्माची कळकळ! शास्त्रीबोवांनीं तर वेळेवर यावें. त्यांचाही ठिकाणः–

[ इतक्यांत शास्त्रीबोवा प्रवेश करितात व म्हणतात. ]

**शास्त्री०ः**–आहे, असें म्हणा. भले गोविंदराव! तुह्मीं तर अगदीं आपल्यासच कायती चळवळखोरांची खोड जिरविण्याची गरज आहे असें समजता. पण शास्त्राची मदत असल्यावांचून तुमच्या नुसत्या बुद्धिवैभवास विचारतो कोण?

**गोविंदरावः**—बरें झालें. आपण आला. पहा बरें! अशा प्रसंगीं आपल्या मंडळीला कांहीं अगत्य वाटूं नये का? परंतु आपले सर्व प्रसंग सारखेच. एखादी व्यापारी उद्देशाची सभाही सारखीच, वक्तृत्वोत्तेजक सभाही सारखीच आणि असली धर्मसंबंधाची सभाही सारखीच. मग धर्माचें प्राधान्य रहावें कसें?

**गो. व शा.**—कसें?

५।६ मंडळी प्रवेश करूनः—कसें म्हणजे, असे. हें पहा! आह्मीं आलों कीं नाहीं? मग आतां आपलें काय म्हणणें आहे?

**गो. व शा.**—या, या. अहो! पण आपले असुधारक संस्थानिक कोठें आहेत?

**मंडळी**:—हे आलेच पहा. आपण जरा व्यवस्था करूं. कागदपत्र जुळवूं तों ते येतील.

**गोविंदराव**:—अहो, कागदपत्र जुळविण्यास उशीर काय? हे पहा (खिशांतून कागद काढून) पहिली गोष्ट; प्रेसिडेंट म्हणजे अध्यक्ष नेमणें. संस्थानिक अध्यक्ष व्हावेत म्हणून सूचना शास्त्रीबोवांची; त्यांस अनुमोदन वैद्य व दीक्षित यांचें. नंतर पहिल्या ठरावाची सूचना याज्ञिक यांची—"हिंदुधर्मांत पूर्वीं जरी असवर्ण विवाह होत असले, तरी हल्लीं ते २००० वर्षांपासून चालत नसल्यानें तसें होण्याविषयीं किंवा तसले होण्यास सरकारचें अनुकूल मत मिळविण्याविषयीं जी खटपट होत असेल त्याविषयीं ही सभा फार तीव्र निषेध करिते." या सूचनेस अनुमोदन पुराणिक व वैदिक भटजींचें.

**असुधारक संस्थानिकांचें भाषण**:—"या देशांत राजक्रान्त्या जरी अनेक झाल्या तरी धर्म कायम आहे. या धर्माचें मूळतत्व वर्ण व जाति या ज्या शहाण्या धर्मशास्त्रकारानें काढल्या, त्याचेंच आपण सर्व ऋणी आहों. त्याच्याच ह्या अपूर्व कल्पनेमुळें या देशाची प्रजा इतर देशाच्या प्रजेप्रमाणें नष्ट होऊन गेली नाहीं. यासाठीं जातिवर्णाचे निर्बंध जितके कायम रहातील तितकें सरकारानें कायम ठेवावे किंवा लोकांनीं होऊन मोडले तर मोडूं द्यावे, पण आपण कोणतीही मदत करूं नये" या अर्थाचें. नंतर सूचना मंजूर.

दुसरी सूचना कथेकरी व भिक्षुकवर्गाची.

" पाहिजे त्या जातीनें पाहिजे तो धंदा करावा ही जी या राज्यांत मोकळीक मिळाली आहे, ती देखील हिंदुधर्माचे तत्वाचे विरुद्ध आहे. परंतु सरकारानें ज्याअर्थी ती दिली आहे, त्याअर्थी हिंदु समाजाचा इलाज नाहीं. परंतु योग्य दिसेल त्यावेळीं सरकारानें ही मोकळीक देखील बंद करावी; म्हणजे सनातन धर्माप्रमाणें वर्णव्यवहार कायम रहातील." अशी विनयपूर्वक शिफारस—यास अनुमोदन शामराव धर्माधिकारी यांचें. नंतर ठराव मंजूर.

झालें. तिसरा ठराव बादशहाचें नांवानें जयजयकार, परमेश्वरास नमस्कार व अध्यक्षाचें उपकार मानणें व सभा बरखास्त.

**शास्त्रीबोवाः**—वाः! वाः! काय गोविंदरावाची योजना तरी! सर्व अगदीं दोरींत धरल्यासारखें!

**इतर मंडळीः**—वाः वाः काय गोष्ट सांगावी? (एकजण) याचें नांव व्यवस्था! (दुसरा) याचें नांव हुषारी! (तिसरा) याचें नांव दक्षता! (चौथा) याचें नांव योजकपणा! (सर्व) नसतात.

**परिचारकः**— महाराज साहेब येतात.

**पुराणिक वगैरे मंडळीः**—महाराज सनातन धर्माचे कैवारी कीं संहारी?

गो०:—अहो! संहारी, येथें कशाला येतात? हें आमचे धर्मध्वज बभ्रुवाहनसिंह. (संस्थानिक प्रवेश करतात.)

(सर्व मंडळी स्वागत करते. महाराज बसतात नंतर इतर मंडळी बसतात.)

गो०:— ज्या अर्थीं कांहीं लोक हिंदु धर्मांत राहून तद्विरुद्ध विवाहपद्धति सरकाराकडून कायम करविण्याचे खटपटींत आहेत, त्या अर्थीं सर्व सनातन धर्माभिमानी लोकांची ही सभा जुळविली आहे. यांत अध्यक्षस्थान कोणी स्वीकारावें याबद्दल सूचना शास्त्रीबोवा करणार आहेत. त्यांनीं करावी म्हणजे सभेचें काम पुढें चालेल.

शास्त्री०—मला फार आनंद वाटतों सूचना करण्यास कीं, आमच्या सनातन धर्मतत्वाचे अभिमानी महाराज बभ्रुवाहनसिंह यांणीं या सभेंत अध्यक्षस्थान स्वीकारावें.

(वैद्य व दीक्षित अनुमोदन देतात.)

(महाराज अध्यक्षस्थान स्वीकारतात. टाळयांचा गजर व कांहीं लोक अक्षता टाकतात. कांहीं 'ओम्' म्हणतात.)

याज्ञिकभट—मजकडे या सभेंतील पहिल्या ठरावाची सूचना पुढें मांडण्याचें काम आहे. ती अशी आहे कीं, हिंदुसमाजांत राहून प्रचलित समाज-पद्धतीविरुद्ध विवाह म्हणजे भिन्न जातींच्या लोकांनीं नोंदणी करणारासमोर हजर राहून विवाह कायम कर-

विणें. हें सरकारानें मजूंर करूं नये. जर कोणा एका पुरुष व स्त्रीस फक्त नोंदणीदारासमोर हजर राहून विवाह कायदेशीर कायम करविणें असेल, तर त्यांनीं साफ आम्हीं हिंदु नाहीं असेंच म्हटलें पाहिजे; हें जें हल्लींच्या कायद्यांत कलम आहे, त्यांत फेरफार होऊं नये. असें न झालें तर, हिंदुसमाजाची व्यवस्था मोडेल. म्हणजे पाहिजे त्या धर्मांचे लोक हिंदुसमाजांत दाखल होतील व प्रसंगीं दोन विरुद्ध धर्मांच्या व्यक्ति निरनिराळ्या धर्मांप्रमाणें हक्क दाखवितील आणि एक धोरणानें निर्णय करतां येणार नाहीं. यासाठीं हिंदुधर्म कायम ठेविणारांनीं हिंदुप्रचलित पद्धतीचेच अनुसरण केलें पाहिजे. नोंदणीदारासमोर हजर राहून प्रतिज्ञा करून उपयोग नाहीं.

**पुराणिकभटजी**—आमचे असेंच म्हणणें आहे.

**वैदिकभटजी**—आमचे सदर्हुप्रमाणेंच म्हणणें आहे.

**असुधारक संस्थानिक**—हिंदु जातीजातीची किंवा अन्यधर्मीयांची हिंदुसमाजांतील जातींशी विवाह पद्धति कायदेशीर ठरविणें म्हणजे हें समाजांत पेटविलेलें कारतूस टाकण्यासारखेंच आहे. असा अविचार सरकारांनीं कदापि करूं नये. ज्याला वाटेल त्याणें खुशाल हिंदुधर्म सोडून पाहिजे त्या जातींशी आणि पाहिजे त्या धर्मवाल्यांशीं लग्नें लावीत सुटावें. आमची

कांहीं त्यास मनाई नाहीं. या देशची प्रजा, वर्णव्यवस्थेमुळें आणि धर्माच्या नियमांनीं आजपर्यंत टिकली आहे. नाहीं तर, केव्हांच नाहींशी होऊन जाती. यासाठीं ही व्यवस्था आणि हीं बंधनें चिरकाल आम्हीं कायम राखिलीं पाहिजेत. व दयाळु सरकारानें आम्हांस ती कायम राखण्यास मदत केली पाहिजे. असें सरकारास कळवावें.

सूचना मंजूर. (टाळया, अक्षता व ओंकाराची गर्दी.)

**कथेकरी**—धंदा ज्या जातीचा त्या जातीनेंच करावा. हा नियम आजपर्यंत या देशास फार हितावह झालेला आहे. हल्लीं हा मोडत चालला आहे. परंतु या समाजाची शिफारस आहे कीं, हा नियम पूर्ववत् सरकारानें कायम ठेवावा म्हणजे सर्व धंद्यास उत्तेजन मिळून त्यांची भरभराट होईल. [ भिक्षुकबोवांचें अनुमोदन. ]

**शामरावधर्माधिकारी**—माझें म्हणणें असें आहे कीं, आपण बोलून पाहिजेल तितके उदारमत दाखवावें. पण आचरणांत फेरफार करूं नये. (सूचना मंजूर पूर्ववत गजर ).

**गोविंद०**—या सभेस महाराजांनीं येऊन अध्यक्षस्थान स्वीकारण्याचा जो अनुग्रह केला, त्यांचे आभार मानावें. ( पूर्ववत् गजर ) बादशाहाचे नांवें जयजयकार करावा. ( जयजयकार करितात ) परमेश्वरास

हात जोडावे. (सर्व हात जोडतात) आतां सभेचें काम आटोपलें.

(प्रथम महाराज व नंतर इतर मंडळी निघून जाते.)

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळः**—सरकारी अधिकारी यांची विश्रांतीची जागा.

**स. अ.:**—(प्रवेश करून) अलीकडे हिंदुसमाजांत प्रगति, मध्यगति आणि परागति या तिन्हींचे पक्ष चालू झाले आहेत. कोणी समजतात कीं, जपानसारखे आपणही नवीन चांगल्या सर्व गोष्टी एकदम घ्याव्या. कोणी समजतात, कालानें जेवढें होईल तेवढेंच घेत जावें आपण होऊन कांहीं यत्न करूं नये. म्हणजे तंटाभांडण झाल्याशिवाय जेवढें चांगलें आहे तेवढें समाजांत दाखल होतें. तिसरापक्ष असा आहे कीं, आम्ही आमच्या जुन्या चाली टाकिल्या, त्यामुळें आमची स्थिति बिघडली. आपण जप, तप, यज्ञयाग, मंत्र, सूक्त, यांचे पाठीमागें लागले पाहिजे. नवीन विद्येंत काय आहे? हल्लीं या मध्यम गतिकांचें कोणतेंच म्हणणें सरकारापुढें नाहीं. परंतु प्रगतिकांचेकडून एक मोठा थोरला अर्ज आला आहे कीं, आम्ही संयुक्त हिंदु-समाज काढूं इच्छितों, त्यास सरकारनें त्याणीं योजिलेल्या आचार विचारांनीं त्यांचें हिंदुत्वास कायदेशीर बाध येणार नाहीं म्हणून ठरवावें. परागतिकांची सभा होऊन

त्यांणीं ठरावाच्या नकला पाठविल्या आहेत कीं, हिंदुत्व ज्या तऱ्हेनें आजवर संभाळलें जात आहे, त्याच तऱ्हेनें पुढें संभाळलें जावें. यांत बदल करून हिंदुसमाजांत कोणास राहतां येऊं नये. आतां सरकारास सल्ला देण्याचें माझें काम. परंतु तशी सल्लादेण्याचे पूर्वीं त्या पक्षाचें मुख्य लोकांशीं प्रत्यक्ष वाटाघाट करून पहावी म्हणजे कांहीं विशेष गोष्ट समजण्या सारखी असेल तर समजेल. आणि नंतर सरकारास या नाजुक प्रश्नासंबधानें आपला अभिप्राय कळवावा असें मनांत आणून मी ही वेळ व जागा नेमिली होती. जरावेळ पहावी वाट.(घडयाळाकडे पाहून) होय, वेळतर झाला. परंतु ही मंडळी येतात केव्हां काय समजावें? बरें, आपलें दुसरें काम पाहिलें तर काय हरकत आहे? (असे म्हणून बसून फैली, कागद, इकडे तिकडे चाळिवतो. )

**पहारेकरीः**—( ताटांत दोन चिठ्या आणून ठेवितो. )

**स. अ.**—( पाहून ) सांग. मी वाटच पहात आहे म्हणून.

( गोविंदराव व केशवराव आंत येतात )

**स. अ.**—( उठून ) नमस्कार करून जागा दाखवितो.

( दोघे नमस्कार करून बसतात स. अ. बसतो. )

गो०:—आपल्याकडील भेटीस येण्याविषयींचें पत्र पावलें व मी जो आपाल्या घरीं येतों, तों केशवरावजीही आलेले दिसले. तेव्हां म्हटलें आपण दोन्ही पक्ष एकदम बोलाविले आहेत.

स. अ.–होय. तसें झाल्यानें समक्ष दोन्ही पक्षांच्या पुष्कळ गोष्टी संबंधाच्या गैर समजुती वगैरे दूर होतात. आणि आपणासारख्यास एखादा प्रश्न करणें झाल्यास उभयतांचे समोर करण्यास सांपडतो.

केशवराव:—ही आपली योजना फार उत्तम! मला फार आवडली.

स. अ.:—बरें आतां हा आपला अर्ज आणि ही या सभेच्या कामाची नक्कल या दोहींचा विचार करूं लागले म्हणजे एक गोष्ट प्रथम ठरवावी लागते कीं, हिंदुधर्म म्हणून जो म्हणतात तो कोणत्या मुख्य गोष्टीवर अवलंबून आहे? वेद हे ईश्वरप्रणीत आहेत असें समजणें हें मूलतत्व जर मानलें तर, असें हिंदुधर्मांत मोजले जाणारे पुष्कळ मताचे व अज्ञान लोक आहेत कीं, ज्यांचे मतानें वेद हे ईश्वरप्रणीत आहेत असे मानले जात नाहींत किंवा ज्यास या गोष्टीची पुरी समजूतही नाहीं. पहा; ईश्वरप्रणीत मानणें किंवा न मानणें याचा अर्थ शहाणें लोक देखील एकमतानें करूं शकत नाहींत. जे प्रणीत मानतात, ते देखील प्रत्यक्ष ईश्वर पुढें उभा राहून बोलला असें म्हणत

नाहींत. तर मनुष्याचेंच मनांत तद्विषयक प्रेरणा केली असें म्हणतात. बरें, प्रेरणा देखील विचाराअंतीं झाली, म्हणजे ज्याचे त्याचे मनास अमुक गोष्ट मला ईश्वरानें सांगितली असें वाटलें. प्रणीत नाहीं असें मानणारे लोक काय म्हणतात? तेही अमुक मंत्र अमुक अमुक ऋषीच्या मनांत उत्पन्न झाला. प्रत्यक्ष ईश्वरानें काहीं सांगितला नाहीं असें म्हणतात. तेव्हां या दोन्ही मतांचा विचार केला तर, वस्तुस्थितीसंबंधानें फारसें अंतर नाहीं. शिवाय, मंत्रकृद्दर्षींचीं नांवें असल्यानें ईश्वराचा प्रत्यक्ष संबंध कोणाही पक्षास सांगतांच येत नाहीं. तेव्हां प्रणीत, अप्रणीत यासंबंधानें वाद न घालतां, हें पुस्तक या धर्माचें मूल म्हणून मानणें इतकें योग्य होतें. आणि ही गोष्ट ज्या लोकांस कबूल असेल, त्यास हिंदु समजण्यास हरकत नाहीं. परंतु पुढें ज्यांनीं मुद्दाम नवीन मत काढून या मूळ पुस्तकाशीं किंवा हिंदुशीं दीर्घ विरोध केला असेल, ते अन्यधर्मीय समजले जातील. परंतु कांहीं सुधारणा किंवा फेरबदल करून तेंच मत वाढविणारे सर्व हिंदूंत गणले जातील. उदाहरण, बुद्धमत हें वैदिकधर्माचीच सुधारणा आहे. परंतु दीर्घ विरोधामुळें ते निराळे होऊन वैदिकमताचे बाह्य झालें. तसें जैन किंवा लिंगाईत बाह्य झाले नाहींत.

आतां जातिभेदाची गोष्ट पाहिली तर तशीच आहे. असवर्णविवाह पूर्वी चालू असून कांहीं दिवस बंद पडला. आणि तो जर पुनः सुरूं होईल तर, तसा सुरू करणारे हिंदुमताचे बाह्य होतील असें नाहीं.

भक्ष्याभक्ष्य विचारही त्याच मासल्याचा आहे. आणि संस्कारपद्धति कांहीं अंशीं बदलली म्हणून हिंदुत्वाला कोणी मुकतो असें नाहीं. आपलें म्हणणें काय आहे हें गोविंदराव सांगा, म्हणजे त्याबद्दल केशवरावजीस विचारीन.

गो०:—हल्लीं ज्या चालीरीति आहेत त्यांत कोणत्याही प्रकारें सुधारणा करणारे लोक मुळींच हिंदुसंज्ञेंत समाविष्ट होऊं नयेत. व ज्या कांहीं सुधारणा होतील, त्या जगद्गुरु म्हणून मानले जातात, त्यांचे आज्ञेनें व्हाव्यात. कायद्याची मदत त्यास होऊं नये. इतकेंच आमचें म्हणणें आहे.

स० अ०:—बरें; केशवराव आपलें काय म्हणणें आहे? तें मला समजूं द्या. मी अर्ज पाहिला आहे. आणि त्यावरून मला अशी सल्ला सरकारास देणें कांहीं गैर वाटत नाहीं, कीं संयुक्त हिंदुसमाज म्हणून काढणारे लोकांस त्यांचे हिंदुत्वासंबंधानें कोणताही कायदेशीर बाध येऊं नये. आतां ज्या संस्था, देवालयें किंवा तीर्थें ज्या पद्धतीनें चालत असतील, त्यांत व्यत्यय आणण्यास सरकार मदत करणार नाहीं.

उदाहरणार्थ, एखाद्या तीर्थांत स्नान करण्याचा किंवा देवळांत जाण्याचा किंवा पंक्तींत बसण्याचा ज्या चालीचे लोकांस आजपर्यंत हक्क मानला जातो, त्यासच तो राहील व त्या त्या संस्थांचे व्यवस्थापक जो नियम करतील तो सर्वांस मान्य करावा लागेल. त्याविरुद्ध कोणाची तक्रार असेल तर त्याचा निकाल न्यायाचे मंदिरांत लागेल तो खरा. ते कांहीं निकाल सर्व आधीं करतां येणार नाहींत. फक्त वारसासंबंधानें किंवा जातीच्या संबंधानें या संयुक्त वर्गाची स्थिति इतर सामान्य हिंदु कायद्याप्रमाणें कायम राहील.

केशवरावः—आमचा आग्रह असा मुळींच नाहीं कीं, कोणत्याही, तीर्थ देवालय किंवा देणगीच्या व्यवस्थेंत संयुक्त हिंदुवर्गाच्या लोकांकडून आगळीक व्हावी. फक्त जेथें कायद्याची तक्रार येईल, तेथें ते पूर्ववत् हिंदु समजले जाऊन त्यांस योग्य हक्क मिळावेत. मग ते वारसपणासंबंधानें असोत अगर समाजव्यवस्थेसंबंधानें असोत. हिंदुत्वाचा एकदा संस्कार झाला कीं, तो मग पुढें इतर संस्काराच्या फेरफारानें किंवा भक्ष्याभक्ष्य विचारांत फेरफार झाल्यानें जाऊं नये. येवढेंच काय तें. यापासून समाजाचे कोणतेंही व्यवस्थेंत बाध आणण्याचा आमचा विचार नाहीं. हीनत्व काढलें म्हणजे उच्चत्व लागलेंच येतें असें नाहीं. उच्चत्व येण्यास बाध राहिला नाहीं, इतकेंच काय ते होतें. उदाहरणार्थ, एखाद्या शूद्रस्त्रीनें ब्राह्म-

णाशीं विवाह केला आणि दोघेंही संयुक्त वर्गीत दाखल झालीं, तर त्यांचे हक्क एकंदर संयुक्त-वर्गाच्या हिंदुसारखे होतील. परंतु यामुळें एखाद्या सनातन हिंदुधर्मवाल्याच्या समाजांत ते पाहिजे तिकडे जातील असें नाहीं. कोठें जावें किंवा न जावें; हें त्या समाजाचे व्यवस्थापकांचे नियमाप्रमाणें घडेल. दुसरें उदाहरण घेऊं. समजा कीं, एखाद्या अप्सरा-वर्गांतील कन्येशी एखाद्या मराठ्यानें म्हणजे क्षत्रियानें लग्न लाविलें, आणि दोघे संयुक्तवर्गांत दाखल झाले, तर त्यांचें एकंदर संयुक्तवर्गांतील हिंदुप्रमाणें त्याचे सर्व हक्क होतील. परंतु एखाद्या सनातन हिंदुपद्ध-तीच्या समाजांत जर त्यास जाणें असेल, तर त्याच्या स्थितीवरून चालक जशी व्यवस्था ठेवितील तशी त्यास मानावी लागेल. हे सर्व प्रश्न इतके गुंतागुं-तीचे आहेत कीं, यांचा निर्णय आणि प्रचार हे कालान्तरानेंच व्हावयाचें. कायद्याच्या आडकाठ्या निघाल्या म्हणजे सरकारचें काम संपलें. तितकें त्यांनीं करावें एवढेंच अर्जांत मागणें आहे.

स० अ०:—बरें आहे. मी सर्व मजकूर ऐकला. आतां मी आपणास रजा देतो. मला योग्य वाटेल तो मी सल्ला देईन. सरकारनें केवळ चालत आलेल्या रीती चालविण्याकडेच लक्ष देऊन भागणार नाहीं, असें मला वाटतें.

( दोघेही रजा घेऊन निघून जातात. )

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

**स्थळः**—बापूसाहेबांचें घर.

**बापूसाहेबः**—या वर्ष दोन वर्षांत किती गोष्टी बदलल्या ! माझी चाकरीचीं ठिकाणें किती झालीं ? वडील, धनी इतर मंडळी व प्रत्यक्ष बायकोची देखील गैर समजूत झाली, परंतु ते पुनः पूर्ववत् प्रेम करूं लागले. माझी योग्यता पहिल्यापेक्षां जास्त होऊन लोकांत मान्यता किती अधिक झाली? बरें, आम्हांस नांवें ठेविणारी मंडळी तीही अस्तंगत झाली. असे हे जगांत फेरफार होतच आहेत. म्हणून त्याविषयीं विशेष नवल मानावयाचें नाहीं. जमीनीवरील गवत वाळून जाऊन त्या फटफटीत पांढऱ्या दिसतात, पुनः त्याच हिरव्यागार गवतानें मंडित होतात. नद्या सुकून त्यांचीं पात्रें देखील उघडीं बोडकीं दिसूं लागतात, पुनः त्याच गजबजून भरून वाहूं लागतात. उल्लंघन करण्याची देखील पंचाईत! वृक्ष केरसुण्यासारखे निष्पर्ण होऊन तेच पुनः असंख्य अरुणप्रभकिसलयानें शोभायमान होतात. हे फक्त दाखले ! बाकी, यावज्जीवांचें, यावद्वस्तूचें रूपांतर असें सतत चाललें आहे. या रहाटगाडग्यांत आमच्यामध्यें जर कांहीं फेरफार झालें तर यांत नवल काय ?

**परिचारकः**— आपणाकडे बाहेर गांवचे शेटजी आले आहेत भेटण्यासाठीं.

**बापू०ः**—हे आमचे जुने स्नेही असतील, नरोत्तमदास-येऊं दें त्यांस. (शेटजी आंत येतात बापूसाहेब उठून त्यास बसवितो. दोघे बसतात.)

**शेटजीः**—आपणास अशी उत्तरोत्तर उच्च स्थिति मिळाल्याचें पाहून आमच्या सारख्यास फार समाधान होतें.

**बापूसाहेबः**—आपला मूळ थोरपणा आणि वडिलार्जित प्रेमाची भर मग आपणास बरें वाटल्यावाचून कसें राहील ?

**शेटजीः**—आमच्या गुणापेक्षां आपणाकडून सर्व गोष्टींचा योग्य विचार होतो हेंच अधिक आहे. बरें पण, संयुक्त हिंदुसमाज आणि त्याजविषयीं नवीन कांहीं कायदा होत आहे म्हणून ऐकतों. वर्ष सहा महिने त्याबद्दल फार खटपट चालली आहे. हें काय आहे ?

**बापूसाहेबः**— पहा, आपल्या हिंदु समाजाचें मूळरूप बदलून तें फार निराळ्या स्थितीवर आलें. हेंच बदलून पुनः पूर्व स्थितीवर नेलें, तर कांहीं वाईट आहे कां ?

**शेटजीः**—पण इतके पंथ आणि जाती झाल्या आहेत त्या पुनः एक होणार कशा ?

बापूसाहेबः—एक होण्याची जी सर्व साधारण तत्वें आहेत, त्यांत एक होण्यास काय हरकत आहे? परंतु जर हरकत वाटेलच तर जे लोक आपआपल्या पूर्वींच्या जातींत आहेत त्यांच्यावर संयुक्त वर्गांत येण्याविषयीं कोणाची जबरदस्ती मुळीच नाहीं.

शेटजीः—एक तत्वें कोणती?

बापूसाहेबः—समाजसौख्य वाढविणें, दुःख कमी करणें, मनोवृत्तीवर दाब ठेवून उद्योगांत निमग्न असणें, विद्याकला वाढवून त्यांचे नियमानुसार वागणें इत्यादि गोष्टी सर्व लोकांस कबूल करण्याजोग्या आहेत. मग जाति आणि पंथ वाढवून काय करावयाचें आहे?

शेटजीः—बहुतकरून धर्मांत परमेश्वर स्वरूप, त्याची आराधना व तत्साधक आचार यांचें वर्णन व नियम असतात, तसें कांहीं या संयुक्तवर्गांत असणार कीं, नाहीं?

बापूसाहेबः—आजपर्यंत जे चालत आलेले आचारविचार आहेत त्यापैकीं कोणते चालविणें हे या वर्गांतील लोकांचे मर्जीवर आहे. यासाठीं जे लोक मग ते जैन, बुद्ध, लिंगाईत कोणत्याही मार्गाचे असोत, आपल्यास हिंदु म्हणवून घेण्यास तयार आहेत, ते सर्व या वर्गांत राहूं शकतात. व जातिभेदास सोडूं शकतात.

शेटजीः—बरें या कायदेशीर हक्कासंबंधानें हल्लीं कांहीं निकाल झाला आहे असें म्हणतात, तो काय ?

बापूसाहेबः—सरकारानें इतकीच गोष्ट कबूल केली आहे कीं, जे लोक प्रसिद्ध रीतीनें संयुक्त हिंदु-वर्गांत दाखल होतील, त्यांचे हिंदु म्हणून कायदेशीर सर्व हक्क सरकारी न्यायमंदिरांत हल्लींच्या संस्कार आचाराच्या भेदानें किंवा त्यागानें बाधित होणार नाहींत. यामुळें त्यांच्यांत जर सवर्ण, असवर्ण किंवा अवर्ण विवाह झाले तर, ते पांच संयुक्त वर्गांतील लोकांपुढें किंवा रजिस्ट्रारासमोर झाले असले म्हणजे खरे ठरूं शकतील. यामुळें नीचोच्च वर्गांतील ऐक्य होण्यास मोठें साधन झालें आहे. याचें सर्व श्रेय आमचे मित्र केशवराव यांजकडेस आहे. यांनीं सभा करून मोठमोठ्या लोकांकडे जाऊन सरकारी अधिकाऱ्यांच्या समजुती घालून इतक्या थरावर गोष्ट आणली आहे. यास विघातक लोक आहेतच. त्यांनींही सभा जमवून असे विवाह कायदेशीर न मानले जाण्याविषयीं खट-पटी केल्या. परंतु त्यांस यश आलें नाहीं. आमचे मित्र केशवराव यांचे प्रयत्न सफल झाले.

शेटजीः—बरें, आपले वरिष्ट भागीदार धनाजी-राव यांचे चिरंजीवांचें आणि एक पाळेगार राजकन्या यांचें लग्न व्हावयाचें आहे असें एकतों, ही तर गोष्ट इत्थंभूत ठाऊक असेलच.

बापूसा०—होय. राजकन्या तर खरीच; पण तुम्हीं समजता तशी नव्हे. ही राजाजवळ राहिलेल्या अप्सरेची कन्या. परंतु हल्लींच्या संयुक्त हिंदुसमाजपद्धतीनें आतां असल्या विवाहास कायदेशीर आडकाठी राहिली नाहीं. बरें पण, केशवरावाच्या अभिनंदनार्थ कांहीं मंडळींनीं सभा भरविण्याचें ठरविलें आहे, तेथें आपण आला असतां मला फार आनंद होईल. मी आपल्याकडे आमंत्रणचिठ्ठी पाठवीन. शिवाय, ह्या सभेस जो येईल त्यास मोकळीक आहेच.

शेटजीः—बरें आहे. मीही येईन. मौज तरी पहाण्यास सांपडेल काय होतें तें. (नमस्कार करून जातो.)

बापूसा०—आपणही उद्याच्या सभेचे कांहीं तजविजीस लागावें. (निघून जातो.)

---

## प्रवेश २ रा.

**स्थळः**—सभेची जागा, बागेंतील मंदीर.

(मंडळी एकामागें एक अशी प्रवेशरस्त्यानें आंत जाऊन बसत आहेत असा देखावा. शेवटीं संस्थानिक येतांच तालसुरांत स्वागत.)

**पद १ लें**—(शंकर सुखकर या चालीवर.)

**स्वागत आह्मि करितो, सज्जन हो। स्वागत०**
**विनयभावें प्रेमभावें आदरें घसवीतो॥ स्वागत०**
**शुष्कवाद वृथाभिमाना सोडुनी देउनी।**

ऐक्य होण्या युक्ति ज्यांनीं काढिली योजुनी ॥
धन्यवाद तयांसि देउनि स्वागत० ॥ २ ॥
होत नसतें कांहिं नुसत्या बडबडीनें हें मनीं
ओळखुनि जे सिद्ध झाले धैर्य लोकां दाउनी
धन्यवाद तयांसि देउनि, स्वागत० ॥ ३ ॥
निर्मुनी संयुक्त हिंदूच्या समाजाते तुह्मी
लाविले शुभ वळण लोकां जातिभेदा मोडुनी ४
ठरवुनी संस्कारपद्धति मिळवुनी संमति तया
लोकांस निर्भय करुनि शिकविति ऐक्य
करुनि घ्यावया ॥ ५ ॥
लोकहित साधावया जे स्वहित सोडिति ।
थोरजे ॥ ६ ॥
आदराहो मार्ग तो, स्वागत आह्मि करितो ॥

पद २ रें.

याहो याहो बसाहो या तयार आसनावरती
दाखविला तुह्मी सकलांसि मार्ग जाण्याचा वरती
याहो याहो० ॥ १ ॥
झाला आनंद हो प्रतिबंध सुटुन मतिमंद जनहि
अभिनंदनपर कवने करिती याहो याहो० ॥ २ ॥
खा, प्या, बोला, चाला, द्वेषा सोडुनि मनि प्रेमा
धरुनि वाढवा संगति याहो याहो० ॥ ३ ॥

( उपहाराची तयारी होते सर्व मंडळी उपहार करितात )

बापूसाहेबः—मला थोडे बोलण्यास परवानगी असावी.

संस्थानिकः—फार उत्तम आहे. आपण बोलावें.

बापूसाहेबः—रा. केशवरावजींनीं जी लोकसेवा केली आहे, त्याबद्दल सभेचे तर्फे मी त्यांचे मोठ्या

प्रेमानें अभिनंदन करितो. त्याचबरोबर सरकारचेही करतों. आतां बाकी कार्य लोकांचें. आणि यश व उपयुक्तता दिसून येणें हें काम कांहीं कालाचें आहे. तेव्हां याबद्दल जास्त प्रस्ताव करणें हल्लीं बरें दिसत नाहीं. पाया घालण्याचें काम झालें आहे आतां वर इमारत चढविणें व त्यांत सोई करणें हें अनेक कारागिरांचें काम आहे. तसे आपल्यास पुष्कळ लाभोत एवढी इच्छा दाखविणें इतकेंच तूर्त पुरें आहे.

**केशवरावजीः**—संस्थानिक बापूसाहेब व इतर मंडळीनो! आपण केलेला सन्मान हा माझ्या सर्व कृतश्रमाचे बक्षिस आहे. इतकेंच नव्हे, तर पुढील श्रमास देखील प्रवृत्त करविणारें हेतु कारण आहे. माझ्या अल्प मेहेनतीचा जो आपण गौरव करितां त्याबद्दल मी आपले फार फार आभार मानतों. ( टाळ्या ) या कामी आपल्या सत्यशोधक संस्थानिक महाराजांनीं जी मला मदत केली आहे, त्याचप्रमाणें धनाजीराव यांनीं मला जें प्रोत्साहन दिलें आहे, तसेंच सरकारचे सल्लागार यांनीं जो आधार दिला, त्यांवाचून माझ्यानें कांहींच झालें नसतें. यासाठीं या सर्व जणांचे आभार मानतों. ( टाळ्या. ) आतां लवकरच एक मौजेचा लग्नसमारंभ आपल्या पाहण्यांत येईल. व त्यावरून हल्लींच्या खटपटीचा प्रत्यक्ष उपयोगही दिसून येईल.

**संस्थानिक**—आतां ही सभा बरखास्त झाली असें समजावयाचें आहे.

[ मंडळी उठून बोलत बोलत निर्गम मार्गानें जातात. ]

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—( धनाजीरावाचें घर. )

**धनाजीरावः**—यशवंतरावाचा तर गीताबाईशीं लग्न करण्याचा निश्चय झाला. आपणही त्याच्या मताविरुद्ध नाहीं. कायदेशीरपणाबद्दलही प्रश्न राहिला नाहीं. तर आतां तयारीस विलंब कशासाठीं करावा? मुहूर्ताची भानगड नाहीं. आम्ही हिंदु नाहीं असे म्हणण्याची गरज राहिली नाहीं. दानधर्म आतिथ्यादि करण्यास आपली इच्छा हीच प्रमाण. मग टाकावा एकदाचा सोहळा पुरा करून. जातीचे लोकांसमोरही लग्न होऊं शकतें व सरकारी अधिकाऱ्यासमोरही नोंदवून होतें. आपण आपला दुसरा मार्गच स्वीकारावा. म्हणजे पौराणिक आणि वैदिक कर्म आणि क्रियेच्या भानगडींत पडणें नको. कोण आहे रे दारावर?

**परिचारक**—जी धनीसाब. काय हुकूम?

**धनाजीरावः**—आण बोलावून आपल्या कारकुनास.

**परिचारकः**—जी. ( जाऊन घेऊन येतो. )

[ कारकून आंत येतो व रामराम करून बसतो. ]

**धनाजीरावः**—रामराम. बसा बंडोपंत. आपल्या येथें एक विवाह नवीन पद्धतीप्रमाणें होणें आहे. सबब यशवंतरावाकडे जाऊन त्यास लागेल ती मदत तुम्ही करा. सरकारी अधिकाऱ्यासमोर नोंदविण्याचें काम पुरें झालें म्हणजे बंधु, आप्त, मित्र व गुणी लोकांचें आदरातिथ्याची तजवीज करावी. गांवांत कोणासही तृप्त केल्याशिवाय सोडूं नये

**कारकून:**—फार उत्तम. मालकांची नेहमींचिच व्यवस्था उदारपणाची असते. त्यांत आपले चिरंजीवाचे खुशालीचा प्रसंग! मग आपल्या हौसेस काय अटक राहणार आहे? आपल्या हुकुमाप्रमाणें सर्व धंदेवाले गरीब लोक तृप्त करून टाकतो. तसेंच यशवंतरावजीं-बरोबर जाऊन त्यांचे नोंदीचें कामही बरोबर आटपून येतों. (रामराम करून रजा घेऊन निघून जातो).

**यशोदाबाई:**—(आंत येऊन) मी ऐकिलें कीं, पूर्वींच्या वहिवाटीप्रमाणें लग्न न होतां सरकार कागदीं फक्त दाखला ठेवण्याचा आहे. हें काय? असें झाल्यानें बायकांना हळदकुंकू जेवणखाण वगैरे कांहींच कां व्हावयाचें नाहीं! असें लग्न जगाला समजणार तरी कसें?

**धनाजीराव:**—होय, नवीन तऱ्हा आहे तर खरी. परंतु आगगाड्या आणि न्यायाच्या चौकशींतले वकील नाहींत का नवीन? घरांत मेज, खुर्च्या व पोषाखांत बूट, कोट नाहींत का नवीन? मग जरासे लग्न कार्याचे पद्धतींतही फेरफार झाले, तर काय हरकत आहे? परंतु यावरून कोणाचें आदरातिथ्य करण्यास किंवा उत्साह करण्यास कांहींच हरकत नाहीं. आपण बायकांस हळदकुंकुवास जेवणाखाणास खुशाल बोलवावें. ज्यांना लुगडीं, चोळ्या देणें असतील त्यांना द्याव्यात. गाणीं, खेळणीं, वगैरे ज्या

रीति असतील त्या कराव्यात. दारूकाम वगैरे स्त्री-पुरुषांस उभयतांस पहाण्याजोग्या मौजा आहेत, त्यांची व्यवस्था उभय समाजासाठीं होईलच. व आपणांस वेळ जागाही कळविण्यांत येतील.

**यशोदाबाई:**—जातीच्या प्रश्नामुळें बायका वगैरे येणाऱ्या कमीच दिसतात. परंतु इतक्या थरावर गोष्ट आल्यावर त्यासंबंधीं वाटाघाट करीत बसण्यांत अर्थ काय? म्हणून जितका समारंभ होऊं शकेल तितका करूं. आणखी कांहीं विचारण्यारखें असेल तें जसें जसें निघेल तसें तसें विचारीन. (जाते.)

**धनाजीराव:**—(स्वतःशी.) माझ्या पत्नीचे किती गुण म्हणून वर्णन करावेत? नाहींतर अशा प्रकारच्या लग्नाला कधींच संमति कोणी स्त्री द्याव याची नाहीं. परंतु माझी यशोदा नांवाप्रमाणेंच खास. जी गोष्ट मी मनांत आणली किंवा पुत्राच्या मतानें बरी म्हणून घेतली, त्यास आपलाही संपूर्ण रुकार. बरें, तोही अविचाराचा नाहीं. खरोखरी जी गोष्ट करण्यास प्रत्यवाय नसावा, ती केवल रूढि किंवा दुराग्रहासाठीं त्याज्य समजून एखाद्या चांगल्या मनुष्याचें हित होऊं न देणें किंवा नेहमीं त्यास हलक्या प्रतीचें लेखणें असल्या कुत्सित व पोरकट विचारास थारा देणारी स्त्री ही नव्हे. अशी स्त्री मिळणें म्हणजे एक मोठेंच भाग्य आहे. नाहींतर माझ्या एकट्याच्या

समजुती कशाही असल्या तर मी काय करूं शकतो? जातिभेदानें फार नुकसान झालें आहे, ही नेहेमीं कहाणी सांगणारेच जर जे जे उत्साह होतात किंवा विवाहासारखीं कृत्यें होतात त्यांत कनिष्ट वर्गास वगळून चाललें, तर त्यांस वरिष्ट स्थिति प्राप्त कशी होईल?- अशा जातीसाठीं शाळा किंवा शाळेंत शिकण्यासाठीं देणग्या दिल्यानें कां या जातीची उन्नति होईल? नाहीं, नाहीं. धर्माच्या समजुतींत फेरफार झाले पाहिजेत आणि संयुक्त समाजपद्धति सारखेच औषध मिळालें पाहिजे. नाहींतर हा वर्ग दुर्दैवी, तो वर्ग दुर्दैवी; या गोष्टीस निरुपाय, त्या गोष्टीस निरुपाय; अशा वैभवाच्या शिखरावर बसून दैवाचे आणि निराशेचे उद्गार काढणाऱ्या लोकांपासून काय फायदा आहे बरें? आपण आतां येथें फार वेळ घालवीत बसून उपयोग नाहीं. पाहुण्या मंडळीची व्यवस्था कशी काय लागली आहे पहावें. ( निघून जातो. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळः**—( पुस्तकालय. )

( गोविंदराव, शास्त्रीबोवा, व त्यांचे २।३ अनुयायी येऊन बांकावर बसतात. )

**गोविंदरावः**—धनाजीरावांनीं तर आपल्या घरांत सुधारणा शिखरावर नेली.

**शास्त्रीबोवा**ः—समाजांतील पुढारी लोकांनीं असे प्राचीन मार्ग सोडल्यावर प्राचीन हिंदुधर्म कसा टिकणार ?

**१ अनुयायी**ः—अहो, टिकायला पाहिजे आहे कोणाला ? तुम्हा आम्हालाच कीं नाहीं ? तुम्हा आम्हांस विचारतो कोण ? या विसाव्या शतकांत देवधर्म, रीति या सर्व व्यक्तिस्वातंत्र्याखालीं आणि वाक्स्वातंत्र्याखालीं बुडाल्या म्हणाव्या किंवा ऐच्छिक झाल्या म्हणाव्या, अर्थ एकच.

**२ अनुयायी**ः—एका लेखकाच्या मतानें धर्मप्रचालक वर्गच राष्ट्र अथवा समाजचालक वर्गाचे ताब्यांत गेला पाहिजे असें आहे. आणि जोंपर्यंत याच्या उलट स्थिति असते, म्हणजे जोंपर्यंत धर्म प्रचालक वर्गाची सत्ता राष्ट्र अगर समाजचालकांवर चालते, तोंपर्यंत राष्ट्र अगर समाज हे नीट चालत नाहींत, म्हणजे मागसलेल्या स्थितींत असतात. असें आहे; तेव्हां दिवसेंदिवस, धर्म प्रचालकांचे फक्त नांव राहील. बाकी सत्ता, कर्म, सामाजिक म्हणा, राष्ट्रीय म्हणा, पण असल्या चालकांचे हातीच जाईल. या मताप्रमाणें पाहिलें म्हणजे चालले आहेत हे प्रकार सरळच आहेत !

**गोविंदराव**ः—अहो, जातिभेदासाठीं कांहीं इतर देशांतील विद्वान् लोक इच्छा करतात, तर येथें तो

असून मोडून जातो किंवा मोडण्यासाठीं प्रयत्न तरी होत आहेत. हें नवल म्हणावें किंवा '**विनाशकाले विपरीतबुद्धिः**' म्हणावी किंवा 'भालपट्टलिखितं तन्मार्जितुं कः क्षमः' म्हणून समजावें! कांहींही म्हटलें तरी अर्थ एकच.

**शास्त्रीबोवाः**--स्त्रियांस मुळी धर्मशास्त्रांत मिळकत किंवा स्वतंत्रता याचे हक्कच नाहींत. मग आपले सुधारणा शास्त्रांत असल्यास आम्हांस ठाऊक नाहींत.

**२ अनुयायीः**—असल्या समजुतींना आतां कोठें थारा राहिला आहे? या २० व्या शतकांत लोक विमानांत बसून फिरूं लागले आणि पुढें जास्ती लागतील. तेव्हां श्रीविष्णूचें गरूड बाहन आतां वाफेच्या आणि वायूच्या रूपानें साधारण लोकांस देखील आणि याच जन्मीं मिळणार. तेव्हां आतां जुन्या धर्माच्या कांहीं गोष्टी नको का बदलण्याला? अहो, या संयुक्त हिंदुसमाजानें संस्कारास व भक्ष्याभक्ष्य विचारास बहुतेक फाटा मिळाला! नव्हें, हा विचार धर्मशास्त्रांतून वैद्यशास्त्राकडे गेला. स्त्रियांची कोर्टांत न्यायासनावर योजना होऊं लागली. जातिभेदाच्या ठिकाणीं जातिसंयोग झाला. अशा एक का हजार गोष्टी बदलल्या, तेव्हां स्त्रियांचे हक्काविषयीं जुने धर्मशास्त्र कोठून कायम राहील?

**शास्त्रीबोवाः**—जर इतका फेरबदल या संयुक्त-

समाजानें केला, तर मग बाटलेल्या लोकांतच या समाजाची गणना केली पाहिजे.

१ अनुयायीः—आपण आपल्या घरीं करा पाहिजे तर; परंतु संयुक्त-समाजाचीच संख्या जास्त झाली म्हणजे आम्ही बाटलेले कीं समाज बाटलेला याचा निर्णय आमचे विरुद्धच होईल.

शास्त्रीबोवाः—काय म्हणतां? असें होईल. आणि आम्हीच बाटलेलें ठरूं! जोंपर्यंत गोविंद्रावासारखे शूर लोक आमची बाजू वर धरण्यास आहेत, तोपर्यंत आम्ही अशा हजार संयुक्त-समाजांना दाद देणार नाहीं समजलात? असुधारकमहाराजासारखे आमचे बाजूस असतां आम्ही बाटलेले कसे ठरणार?

२ अनुयायीः—अहो, बाटलेल्यांला कांहीं शिंगें कां असतात? मोठमोठ्या प्रतिष्ठित लोकांच्या समाजांत सरकार-दरबारीं मेजवान्यांत ज्यांना पंक्ति बाह्याप्रमाणें स्वतःचे हट्टानें किंवा समजुतीनें कां होईना, पण दूर बसावे लागतें, तेच बाटलेले नव्हेत का? मग तुम्ही आम्ही बाटलेले कीं जे राजरोस सर्व जातींच्या लोकांशीं खांद्याशीं खांदा लावून बसणारे बाटलेले?

गोविंदरावः—होय बाबा. आतां जग मुळींच उलट चालायाला लागलें आहे. तेव्हां तुम्ही म्हणतां हेंच खरें. सूर्य पूर्वेचा पश्चिमेस उगवत नाहीं इतकेंच काय तें.

१ अनुयायीः—तसें सुद्धा नाहीं. ज्ञानसूर्य देखील पश्चिमेसच उगवूं लागला आहे. अर्घ्यदानाचा सूर्य मात्र पूर्वेस कायम आहे खरा. परंतु तो कायम असून काय उपयोग? ज्ञान हें मनुष्यास मुख्य. तें जर इकडचें कनिष्ठ प्रतीचें राहिलें तर, या भौतिक सूर्याचें दर्शन आम्हास थोडचा घटिका प्रथम झालें म्हणून त्यापासून काय आमचा मोठेपणा कायम राहील?

गोविंदरावः—तुमच्यासारख्या अनुयायांस अशाच कोट्या सुचावयाच्या. तुमचा मुळी विश्वास सनातन धर्मतत्वांवर आहे कोठें? मग सनातन धर्मातील उच्चतत्वें तुमचे मनांत कशीं ठसावीं?

२ अनुयायीः—आम्ही नित्य ठसविण्याचा प्रयत्न करतों. परंतु गुरूचा प्रसाद नाहीं म्हणावा किंवा ग्रह आडवा समजावा किंवा प्रारब्धच म्हणावें? मनाची खात्री होऊन एखादें जुनें तत्व ठसावें म्हटलें तर ठसत नाहीं. उलट असें वाटूं लागतें कीं, ज्याचे मनांत हीं जुनीं तत्त्वें ठसलीं आहेत, तेच दुराग्रहाला पेटले आहेत आणि जसें एखादें मनुष्य एखाद्या व्यसनाच्या आधीन झाल्यावर सर्व नाहींसें होईतोंपर्यंत शुद्धीवर येत नाहीं, आणि अखेरीस शुद्धीवर आल्यानेंही उपयोग नाहीं; तद्वत् ही जुनी मंडळीं, आपलें आहे नाहीं तें घालविण्याला उद्युक्त झाली आहे कीं काय?

शास्त्रीबोवाः—वाः! हे अनुयायी तर फार मजेचे दिसतात. यांना धर्मप्रचालकांची सत्ता समाजावर

राहणार नाहीं असें वाटतें. नीचजाति व स्त्रीवर्ग हे उच्च वर्गाचे पुरुषाबरोबर आहेत असें वाटतें. इतकेंच नव्हे पण इतर जाति मोठ्या आणि आम्हीच बाटलेले! शिवाय आम्ही आहे नाहीं तें घालवूं आणि मग शुद्धीवर येऊं असें वाटतें. तेव्हां असल्या अनुयायांनीं जुन्या धर्माची वृद्धि कशी व्हावी?

**गोविंदराव:**—मी तेंच म्हणतों. परंतु अनुयायी चांगलें आणावें तरी कोठून? जे आहेत त्यांत हें सर्वांत चांगलें म्हणून आम्ही समजतों, परंतु यांची ही पहातां अशी स्थिति आहे.

१ **अनुयायी:**—आमचा विश्वास जुन्या धर्मतत्त्वांवरच आहे. परंतु जगांत ज्या गोष्टी ऐकूं येतात, त्यावरून मनावर कधीं कधीं संस्कार घडलेले गुरुसारख्या मानलेल्या लोकांजवळ न सांगावें तर सांगावेत तरी कोणाजवळ? हेतु फक्त संशय फिटावा इतकाच.

२ **अनुयायी:**—आम्हांस ज्या गोष्टी कळतात, त्या जर आपल्यापुढें मांडल्या नाहींत, तर अखेरीस रोष आमचेकडे येणार नाहीं कां? आमचें काम कळविण्याचें आहे, समजूत घालण्याचें काम आपलें आहे.

**गोविंदराव:**–'संशयात्मा विनश्यति' हें तुम्हांला कसें ठाऊक नाहीं? अरे मुलांनों, संशय संशय म्हणजे काय? जोंपर्यंत दोन गोष्टी ऐकत रहाल्या, तोंपर्यंत संशय रहावयाचाच. परंतु त्यापैकीं एक

टाकण्याची शक्ति आल्याशिवाय दोन्ही खऱ्या मानून काय उपयोग? एकच खरी मानून चाललें म्हणजे दुसऱ्या गोष्टींस मनांत शिरण्यास जागाच रहात नाहीं. हल्लीं जों पहावें तों आपलें जो तो तर्क चालवीत बसतो. आम्ही असें मुळींच केलें नाहीं. एक मार्ग धरून चालले म्हणजे बाकी सर्व सुटतात. संशय येत नाहीं, तर्क चालविण्याची गरज रहात नाहीं, आणि प्रश्न करण्याची संवय लागत नाहीं.

शास्त्रीबोवाः—लहान वयामध्यें तर्क कसले आणि प्रश्न कसले? सनातनमार्ग चालले आहेत ते काय खोटे आहेत? त्यास अनुसरून चाललें म्हणजे झालें.

१ अनुयायीः—आम्ही जरी चाललों तरी आमच्या मार्गें आमचा समाज चालला पाहिजे. तो जर सूर्यानें शोषण केलेल्या गवतासारखा किंवा दुष्काळानें पीडिलेल्या देशासारखा दिवसानुदिवस नाहींसा होऊं लागला तर धर्माची भरभराट कशी होईल?

शास्त्रीबोवाः—तुम्हाला जे मार्ग चांगले वाटतील तेच तुम्ही स्वीकारा. आम्हाला त्या भरभराटीची आणि तुमचे हे वितंडवाद ऐकण्याची मुळींच गरज नाहीं. आम्ही आपापल्या कर्माला जातों. तुमची वटवट ऐकण्यांत काय फायदा? आणि त्यापासून श्रेय काय! गोविंदरावजी, चला आतां. यांची समजूत तुम्ही काय करणार? चला आपण जाऊं? या

झालेल्या लग्नासंबंधानें धनाजीराव गांवांत उत्साह बराच करीत आहेत, त्याची काय काय मौज होते ते पाहूं आणि नंतर पुनः एखादे वेळेस आपण या गोष्टीचा विचार करूं.

**गोविंदराव:**—बरें आहे. माझ्याही मनांत तसेंच आहे. चलावें. ( दोघे निघून जातात )

१।२ **अनुयायी:**—आपणास तरी या जुन्या अडाणी लोकांशीं बोलत बसण्यांत काय अर्थ? आपणही जाऊन मौज पाहूं. (निघून जातात.)

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ:**—भिक्षुकांचा अड्डा.

[ **सीन:**—५।६ भिक्षुकमंडळी येते व आपापली आसनें टाकून बसते. ]

**गोविंदभट:**—काय थाटाचें जेवण बरें? तें तरी एक दिवस? अहो, आज आठवा दिवस! रोज पक्वान्न निराळें! आणि रोज दक्षिणा सुरती. मग भांगेला काय कमी आणि गप्पांना काय कमी?

**विष्णुभट:**—बरें, वधुवरांस तरी नांवें ठेवण्यास कांहीं जागा आहे कां? मुलगी जशी शुक्राची चांदणी.

**गोविंदभट:**—आणि मुलगा जसा मदनाचा पुतळा.

**शंकरभट:**—किंवा बृहस्पतीचा पुत्र.

**रामभट:**—दोघेही विनयानें व सौंदर्यानें तशीच वैभवानें युक्त.

**कृष्णंभटः**—मग आतां या वर्णनांत बसण्यांत अथर्ववेदवल्लीची उपासना करण्यास विलंब कां?

(२।३ शिष्य सामान घेऊन येतात व भांगेचे प्राशनास सुरवात होते.)

**गोविंदभटः**—दक्षिणा देणार असावेत धनाजी-रावासारखे, आणि चैन करणारे असावेत या गोविंद-भटजीसारखे.

**विष्णुभटः**—आपण या कल्पाचे (क्लबाचे) प्रमुख आहांत. तेव्हां आपल्या नांवाचा जयजयकार करून एकेक पेला एकेक मंडळीनें घ्यावा अशी विनंति आहे.

**शं. रा. व कृ०**—(पेले भरून घेऊन) हे पहा आह्मी हजर. (सर्वजण पितात.) आणखी बोला कोणाचे जयजयकार करावयाचे असतील ते.

**गोविंदभटः**—हें काय विचारावें? आधीं धनाजी-राव. त्याचे मागून वधुवर. (असें म्हणून एका-मागून एक असे तीन पेले झोकतात.)

**शंकरभटजीः**—अशी चंगळ कधींही उडाली नव्हती. फार बहारीचें लग्न खरें एकूण.

**रामभटजीः**—अहो वधूचा पूर्वेतिहास कांहीं गौण-पणाचा आहे म्हणतात.

**शंकरभटजीः**—कोण चौकशी करतो पूर्व आणि पश्चिमेची? हल्लींचा दिवस साजरा झाला आणि वधूवरांचा कार्यभाग उरकला. आह्मांला काय कराव-

याचें आहे त्या पूर्वेशीं आणि पश्चिमेशीं ? तसेंच आम्हाला मिळतें दक्षिणा आणि भांगेचा पेला. आम्हीं यापलीकडे शोध करा कशाला ?

**विष्णुभट**:--होय तें तर खरेंच. अमक्याचें गोत्र आणि तमक्याचा ग्रह, एकाची नाडी व दुसऱ्याचा गण, ह्या चौकश्या जर राहिल्या नाहींत तर मग मागील खेकटीं उकरून काढण्याची गरज काय ? बरें, तुमचें-आमचें काय त्यांत जातें ? विचार करणारे करतील, नाहीं तर भोगतील.

**कृष्णंभटः**---अरे, मुला, जरा देवीच्या नांवानें एखादा पेला मंडळीस दे पाहूं.

**मंडळी**--वा! काय योग्य आठवण केलीत कृष्णंभटजी. ( भांगेच्या तारेंत ) आम्ही जरा विसरूनच गेलों. पण आपली निगा फार आहे कृष्णंभटजी या कामांत.

( यानंतर सर्व मंडळी एक एक पेला झोंकतात व जागच्याजागीं कांहीं बरळत घोरूं लागतात. )

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळः**—गवई लोकांची बैठक.

**वामनबोवा**:--कशी काय-मौज झाली खासाहेब ! बसा.

**अहमदखाः**—अजी क्या कहेना ! गाना तो जिदर उदर है, पर ऐसा शराब किदर नही पीया. क्या मिठास और जोस, फिरगानेके मजाकु क्या पुछना !

**वामनबोवाः**—अहो, शराबानें तर गाणें बिघडतें म्हणतात. लक्ष चंचल होऊन रागाचें चित्र सफाइदार रेखाटलें जात नाहीं.

**अहमदखाः**—अजी आपतो गवैये हो, पर शराबकी कदर आपकु नहीं. जिसबातकु जो समजताहै उसका ख्याल उसी बातपर लगाताहै. बाकी आप पंडत लोकके समजकु हम नही पोंहोच सकते है.

**वामनबोवाः**—बरें; तान, स्वर, बिलंपद याची कशी काय मौज झाली?

**अहमदखाः**—तान लेने वाले तो हमएक देखें है ऐसे किदरबी नहीं. जिस जानवरकी कहोसो तान दिखला देतेथे ऐसा इलमतो हमकु याद नहीं. पर सुद्ध और गमक कीताने यादहै.

**वामनबोवाः**—बरें, स्वरांत कसकसे भेद दाखविलेत? कोमल, अति कोमल, तीव्र, अति तीव्र सम, मृदु किती साधून दाखविले?

**अहमदखाः**—जो लेनेवाले हैं वोतो स्वरोंका शुमारइ रखते नहीं. जिस उस रागकी बनावटकु देखते है असलतो तीव्र और कोमल दोहै फिर जिसतरकी बसे लगाओ तो वो अपनी अपनी शिकल अलग बताताहै. फिर ५ कहोके १० कहो जितने मानो उतने परकार एक एक सुरमे बनते है.

**वामनबोवाः**—बिलंपद कसें काय, कोणाचें चांगलें झालें?

अहमदखाः—बिलंपद है खास हथियारके वास्ते. गानेवाला फकत शुरुमे रागकी तसबीर कंठसे बतायगा और फिर चीजपर झट चढेगा सो हाथियारके उस्ताद तो आपही है. फिर क्या कहेना. आपकु सब मालूमइ है.

वामनबोवाः—बरें मग. एकंदर मौज चांगली झाली म्हणावयाची ?

अहमदखाः—बेशक, बेशक. ऐसा गानेवालेका कदरदार और समजदार और ल्याकतदार अब कहां कोइ है? हमारी नजरमे तो ये धनाजीराव साहब जैसा आजकल ये शहरमे कोइ नहीं. अजकल गानेके जलसे तो बहुत शुरु होगये हैं. और कोइ नोटेसन् बताता है तो कोई हारमनी करता है. हमकु तो ये बातोंका ख्याल बिलकुल नही है, आपतो सबकुछ समजते है, पर ऐसे जलसोमे नहीं हम जाते नउस किफायतकु देखते.

वामनबोवाः—ज्याला जी गोष्ट साधते, त्याच्याच कामाची ती आहे तुमचें आमचें काम नाहीं. या जलशांत जाऊन पोटभरण्याचें हें काम आहे नाटकी तें करण्यास पाहिजे स्वरूप नाटकी. हीं कामें का सर्वांचीं आहेत ?

अहमदखाः—अजी आपने ये बातका खूप सोच किया है भला, मुजकु फरमाइये कि ये चार चार सतार लेके जो कुरसीपर बैठके एक गतकु बजाते है, इसमे क्या हारमनी है ?

**वामनबोवाः**—नाहीं. पण हें समजतें कोणाला? गतीचें स्वर वाजत असतांना त्याबरोबर इतर किंवा त्याच वाद्यांनीं दुसरे दुसरे नियमित स्वर घेऊन गतीचें स्वारस्य वाढविणें यास हारमनी समजली जाते. परंतु हें स्वारस्य ऐकणारांना संवय होऊन हारमनीचे नियम ठरून तसा प्रकार वाजविणाऱ्यांनीं करून दाखविला पाहिजे.

**अहमदखाः**—भला और नोटेसन क्या चीज है? सुरावर्द तो सब गवैये लोक जानते है. पर ये होतीहै मुख्य सुरोंकीं जो गाने बजाने वाला मुर्छना गमकोंके साथ भाव करेगासो बारकाई कुछ सुरावर्द से दिखलाइ नही सकतीहै.

**वामनबोवाः**—आपण तर फार योग्य बारकाई सांगितली. परंतु इम्रजींत नोटेशन् आहे. तेव्हां आपल्यांतही करावें या अर्थानें करणारे करतात. पण हें नोटेशन् कांहीं नवीन नाहीं. आणि त्याची मर्यादा जी आपण सांगितली ती व त्यासारखींच जी आलापांत गमक, मीड, घसीट यांचें लघुत्व, दीर्घत्व व स्वराचा हलके भारीपणा हे गुण पूर्णपणें नोटेशन् मध्यें न येऊं शकणें ही आहे. बरें, आपल्यास बिदागी काय मिळाली?

**अहमदखाः**—देखिये. पटका तो गुलामने सिरकु बांधाहै. और ये दो गिनी. अल्ला धनाजीराव और उनके बेटा-बेटी सबकु सलामत रख्खे. ऐसा सरदार

नकिदर होगा. मेरे जैसे कितने गवैये और परीआंकु इनामादिये गये कुछ शुमार नहीं.

**वामनबोवा**:—बरे खंडोबा, तुमची कशी काय झाली परीक्षा?

**खंडोबा**:—काय विचारणें! ( अस्तन्या चढवून ) सुरू करताच दिला बोलांचा पाऊस पाडून न् काय? सरदार म्हणाले 'अरे! जरा गाणाऱ्याला संभाळ. मग केला हात थंड आणि पखवाज केला गाण्याशीं एक रूपन् काय? गेलों मिळून गाण्यांत. जसा कांहीं पखवाज गाणाराच्या गळ्यांतच वाजतो आहे. मंडळी राहिली बघत कीं पखवाज कसा एकदम गाणाऱ्याचे गळ्यांत गेला!

**वामनबोवा**:—मग तर तुमचे बिदागींत कांही कमीच नाहीं.

**खंडोबा**:—कमी कशाचे! अशा सरदारांचे घरीं यथेच्छ बिदागी. हा बघा रुमाल डोकीवर आणि ही गिनी.

**वामनबोवा**:—मग तुमची चंगळ झाली म्हणावयाची.

**खंडोबा**:—ही काय गोष्ट? गुणच तसा लागतो आंगांत. परंतु व्यवस्था सर्व आपलीच म्हणून ऐकतों.

**वामनबोवा**:—अहो आमची कशाची? जसा

तुमचे सर्वांवर सरदारांचा लोभ आहे, तसाच मजवर. त्यांणीं सांगितलेली चाकरी बजवायची.

खंडोबाः--हें काय सांगणें? जशाचे तसेच नोकर आपण अहां बरें. आतां घेतों रजा आपली. ( निघून जातो. )

( इतर मंडळी अहमदखा वगैरेही जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

**स्थळ**—धनाजीरावाचा वाडा.

**सीन**—धनाजीराव व केशवराव बोलत बसले आहेत असा.

**केशवराव**—कार्य तर उत्तम रीतीनें पार पडलें, आतां वधुवरास स्वस्थपणानें पाहण्याची इच्छा आहे.

**धनाजीराव**—कोण आहेरे बाहेर ?

**चाकर**—जी महाराज. हा गुलाम हजर आहे.

**धनाजीराव**--जा; आपल्या यशवंतबापूस आणि त्याची आवडती पत्नी यांस केशवरावजींच्या भेटीसाठीं बोलाविलें आहे म्हणून सांग.

**चाकर**—जी होय. ( जातो आणि यशवंतराव गीताबाईस घेऊन येतो. दोघे प्रवेश करितात, व सर्वांस नमस्कार करितात. )

**केशवराव**—यांचें आतां नांव काय ठेविलें आहे?

**धनाजीराव**—मदनिका. ती आहेच तशी.

केशवराव---वाः ! काय अपूर्व जोडी. बसावें आपण. ( दोघें बसतात.)

पद.

यशवंत तुझ्यासम कांत न या नगरांत दिसे बा मजला।
घेऊनि प्रिया हातांत सुखविसी सकला ॥
शृंगार रसाचे सार घेउनी फार दिवस बहारीचे।
घालवा करा दृढपाश तुम्ही प्रीतीचे ॥
नीचोच्च जातिचा भेद करुनिया तुच्छ दाखवायाला।
तव धैर्य बहुत वर्णनार्ह दिसतें मजला ॥

यशवंतराव—

कायदे दुरुस्त न होते बहु अनर्थ अजवरी घडते।
किती सती प्राण टाकिती पति चितेवरती
नरवध, कुमारीवध अजुनिहि होते।
विधवास तशा राखुनी सक्तिते वपनहि करिते काय०॥
हे धर्म हिंदुचे म्हणती परि अधर्म सकला दिसती।
जातिचा भेद माजविला अपसांत करुनि कलहाला।
नुकसान यांत किति होतें हें कांहिं न त्यासी कळतें।
कुशलता सर्व ही अपुली, युक्तिनें मात तुम्हि केली।
यश सर्व तुम्हांसी येतें आमुच्यानें कांहि न घडतें।
॥ कायदे० ॥

चाकर—साचिरंजीव नारायणराव, जज्जसाहेब आणि राजेसाहेब इकडे येत आहेत.

धनाजीराव—( उठून ) होय. मी बोलाविलेंच होतें. ( पुढें जाऊन आंत घेऊन येतो. )

( सर्व एकमेकांस नमस्कार करून बसतात.)

[ वधूवर सर्वांस नमस्कार करून बसतात.]

( सर्व मंडळी त्यांस आशीर्वाद देऊन बक्षिसें देतात. )

**धनाजीराव**—जे सरकार योग्य वेळीं योग्य रूपानें या विस्कळित हिंदुसमाजास जातिभेदासंबंधानें ऐच्छिकतेच्या तत्वावर एकरूपता देण्यास कायद्याची मदत करतें त्यांचा जयजयकार असो.

**मदनिका**—मला ज्या पायांनीं सन्मार्ग दाखविला त्यांचाही जयजयकार असो. ( असें म्हणून बापूसाहेबांचे पाय धरिते.)

श्लोक ( कामदा )

**हातुनी स्वयें नच घडे जरी ।**
**करविती महाजन परोपरी ॥**
**कृत्य चांगलें ज्यास समजती ।**
**एकदां तया मग न लाजती ॥ १ ॥**

( सर्व मंडळी आश्चर्तयुक्त होऊन बापूसाहेबांकडे पाहून तारीफ करतात ) [ पडदा पडतो ]

**समाप्त.**